# कविता महाजन यांच्या 'भिन्न' व 'ब्र' कादंबऱ्यांचा अभ्यास

**(Kavitā Mahājan Yānchyā 'Bhinn' Va 'Bhra' Kādambāryanchā Abhyās)**

**एम.ए. (मराठी) पदवीसाठी सादर केलेली संशोधन प्रबंधिका**

**MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION**


**मराठी अध्ययनशाखा**

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

**गोवा विद्यापीठ**

अभ्यासक

**निकिता दिपक शिरोडकर**

हजेरी क्र.: 22P0190027

ABC ID: 174917867254

PR No.: 201809196

मार्गदर्शक

डॉ. सुनिता उम्रस्कर

(सहायक प्राध्यापक)

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

मराठी अध्ययनशाखा



गोवा विद्यापीठ

**एप्रिल २०२४**

# Kavitã Mahãjan Yãnchyã 'Bhinn' Va 'Bhra' Kadambãryanchã Abhyãs

**Submitted in partial fulfilment of Masters Degree**
**MA in Marathi**

**MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION**

**Marathi Discipline**
Shenoi Goembab School of Language & Literature
**Goa University**

by

**Nikita Deepak Shirodkar**
Seat No: 22P0190027
ABC ID: 174917867254
PR No.: 2018196

Under the supervision of

**Dr. Sunita Umraskar**
(Assistant Professor)
**Marathi Discipline**
Shenoi Goembab School of Language & Literature

**Goa University**
**2023 – 2024**

## DECLARATION BY STUDENT

I hereby declare that the data presented in this Dissertation report titled, "कविता महाजन यांच्या ' भिन्न' व ' ब्र' कादंबऱ्यांचा अभ्यास" is based on the results of investigations carried out by me in the Marathi Discipline at the Shenoi Goembab School of Languages & Literature, Goa University under the Supervision of Dr. Sunita Umraskar and the same has not been submitted elsewhere for the award of a degree or diploma by me. Further, I understand that Goa University or its authorities will be not be responsible for the correctness of observations/experimental or other findings given the dissertation

I hereby authorize the University authorities to upload this dissertation on the dissertation repository or anywhere else as the UGC regulations demand and make it available to any one as needed.

Shirodkar

Date 16/04/24

Nikita Deepak Shirodkar

Place : Goa University

seat no : 22P0190027

## COMPLETION CERTIFICATE

This is to certify that the dissertation report "कविता महाजन यांच्या ' भिन्न' व ' ब्र' कादंबऱ्यांचा अभ्यास" is a bonafide work carried out by Miss. Nikita Deepak Shirodkar under my supervision in partial fulfilment of the requirements for the award of the degree of **Master of Arts** in the Discipline Marathi Discipline at the Shenoi Goembab School of Language & Literature, Gou University.

Dr. Sunita Umraskar

Date: 16|04|2024

GOA UNIVERSITY SHENOI GOEMBAB SCHOOL OF LANGUAGES & LITERATURE TALEIGAON PLATEAU

Signature of Dean of the School

Department stamp

Date: 25/04/2024

Place: Goa University

## मनोगत

नवीन अभ्यासक्रमाचा भाग म्हणून पदव्युत्तर पदवीच्या द्वितीय वर्षासाठी प्रबंध लिहावा लागतो. या प्रबंधिका लेखनासाठी "कविता महाजन यांच्या 'भिन्न' व 'ब्र' कादंबऱ्यांचा अभ्यास" हा मी विषय निवडला. कविता महाजन यांच्या 'भिन्न' व 'ब्र' कादंबऱ्यांचा स्त्रीवादी आणि महानगरीय दृष्टिकोनातून अभ्यास व्हावा हा अभ्यासाचा हेतू होता. या अभ्यासाला प्रारंभ करण्यापूर्वीपासून आजपर्यंत अनेक सहृदयांचे सहकार्य आणि मार्गदर्शन मला लाभले आहे. या सर्वांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा प्रयत्न येथे केला आहे.

एम. ए. दृतीय वर्षाच्या अभ्यासक्रमाअंतर्गत महानगरीय साहित्याचा अभ्यास या विषयाअंतर्गत अनेक महानगरीय पार्श्वभुमी लाभलेल्या सहित्यकृतीचा अभ्यास करण्यात आला होता. त्यावेळी प्रा. पूर्वा वस्त यांच्या मार्गदर्शनामुळे महानगरीय साहित्य वाचण्याविषयीचे कुतूहल मनात निर्माण झाले. प्रा. पूर्वा वास्त मॅडम यांनी मला कविता महाजन यांच्या लेखनाचा अभ्यास करण्याची प्रेरणा दिली.

डॉ. सुनीता उम्रस्कर मॅडम, गोवा विद्यापीठ या माझ्या या संशोधन प्रबंधिकेसाठी मार्गदर्शक म्हणून मला लाभल्या. त्यांनी निवडलेल्या विषयाला योग्य मार्गदर्शन केले व माझ्या विचारांना योग्य दिशा दिली. मॅडमच्या प्रेरक मार्गदर्शनामुळे या संशोधनाबाबत आत्मविश्वास निर्माण झाला. अनेक गोष्टी स्पष्ट झाल्या तसेच साहित्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण अधिक व्यापक झाला. मॅडचे अनमोल मार्गदर्शन, आणि निरपेक्ष सहकार्य माझ्यासाठी एक अमूल्य ठेवा आहे. त्यामुळे मॅडमची मनःपुर्वक आभारी आहे.

या अभ्यासासाठी मला गोवा विद्यापीठाच्या ग्रंथालयांची मदत झाली. या ग्रंथालयाचे ग्रंथपाल आणि सर्व कर्मचारी वर्ग यांचेही आभार. त्यात विशेष आभार ग्रंथपाल डॉ. संदेश देसाई त्यांनी कर्तव्यापलिकडे जाऊन केलेली मदत माझ्या नित्य स्मरणात राहील. त्याच प्रमाणे हे कार्य पूर्णत्वास नेण्यास कळत नकळत अनेकांनी मदत केली आहे. त्या सर्वांची मी आभारी आहे.

# अनुक्रमणिका


| अ. क्र | | पृष्ठ. क्रमांक |
|---|---|---|
| **प्रस्तावना** | | |
| **प्रकरण १** | **कादंबरी: संकल्पना स्वरूप व वैशिष्ट्ये**<br>**प्रस्तावना**<br>**१.१ कादंबरीची व्याख्या**<br>**१.२ कादंबरीचे स्वरुप**<br>**१.३ कादंबरीचे घटक**<br>१.३.१ कथानक<br>१.३.२ व्यक्तिरेखा<br>१.३.३ वातावरण<br>१.३.४ भाषाशैली<br>१.३.५ संवाद<br>१.३.६ निवेदन<br><br>**१.४ कादंबरीचे प्रकार**<br>१.४.१ अद्भुतरम्य कादंबरी<br>१.४.२ऐतिहासीक कादंबरी<br>१.४.३ सामाजिक कादंबरी<br><br>**१.५ विविध प्रवाह व मराठी कादंबरी**<br>१.५.१ प्रादेशिक कादंबरी<br>१.५.२ ग्रामीण कादंबरी<br>१.५.३ दलीत कादंबरी<br>१.५.४ मनोविश्लेषणात्मक कादंबरी<br><br>**समारोप**<br>**निष्कर्ष**<br>**संदर्भ सूची** | ७-२० |

| | | |
|---|---|---|
| | | |
| **प्रकरण २** | **कविता महाजन यांच्या 'भिन्न' व 'ब्र' कादंबऱ्यातून दिसून येणाऱ्या महानगरीय जाणिवा.**<br>**प्रस्तावना**<br>**२.१ महानगर संकल्पना**<br>**२.२ नव्वोदत्तरी कालखंड व महानगरीयकरणाची प्रक्रिया**<br>**२.३ महानगरीय समाज वास्तव व महानगरीय संस्कृती**<br>**२.४ भिन्न या कादंबरीतून दिसून येणाऱ्या महानगरीय जाणिवा**<br>२.४.१ महानगरातील एड्सचा प्रश्न<br>२.४.२ वैश्याव्यवसाय<br>**२.५ कविता महाजनांच्या 'ब्र' कादंबरीतून दिसून येणाऱ्या महानगरीय जाणीव**<br>२.५.१ महानगरातील आधुनिक जीवनातील ताणेबाणे<br>२.५.२ महानगरीय स्त्रीचे प्रश्न<br>**समारोप**<br>**निष्कर्ष** | **२१-३९** |
| **प्रकरण३** | **कविता महाजनांच्या भिन्न व ब्र या कादंबऱ्यातून दिसून येणारा स्त्रीवाद व स्त्रीवादी जाणिवा.**<br>**प्रस्तावना**<br>**३.१ स्त्रीवाद संकल्पना स्वरूप व वैशिष्ट्ये**<br>३.१.१ पाश्चात्य स्त्रीवाद.<br>**३.२ भिन्न कादंबरीतील स्त्रीवाद व स्त्रीजाणिवांचे स्वरूप**<br>**३.३ ब्र या कादंबरीतील स्त्रीवाद व स्त्रीजाणिवांचे स्वरूप**<br>३.३.१ ब्र कादंबरीतील आदिवासी स्त्रीचे प्रश्न | **४०-५२** |

| | | |
|---|---|---|
| | **समारोप**<br>**निष्कर्ष** | |
| प्रकरण४ | **भिन्न' व 'ब्र' या कादंबरीचे** वाङ्मयीन **मूल्यमापन**<br>**४.१ ' भिन्न' या कादंबरीचे वाङ्मयीन मुल्यमापन**<br>४.१.१ कथानक :<br>४.१.२ वातावरणनिर्मिती<br>४.१.३ भाषाशैली<br>४.१.४ निवेदन पद्धती<br>४.१.५ व्यक्तिचित्रण<br>४.१.५.१ भिन्न कादंबरीतील स्त्री – व्यक्तिरेखा<br>४.१.५.२ भिन्न कादंबरीतील पुरूष व्यक्तिरेखा<br>**४.२ ' ब्र' कादंबरीचे वाङ्मयीन मूल्यमापन**<br>४.२.१ कथानक<br>४.२.२ वातावरणनिर्मिती<br>४.२.३ भाषाशैली<br>४.२.४ निवेदन पद्धती<br>४.२.५ व्यक्तिचित्रण<br>**समारोप**<br>**निष्कर्ष** | ५३-७६ |
| प्रकरण५ | **निष्कर्ष आणि समारोप**<br>**५.१ समारोप**<br>**५.२ निष्कर्ष** | ७७-८१ |
| | **संदर्भ सूची** | ८२ |
| | **आधार ग्रंथ** | ८३ |

# "कविता महाजन यांच्या ' भिन्न' व ' ब्र' कादंबऱ्यांचा अभ्यास."

**प्रस्तावना**

१९९० नंतरच्या काळात हळू हळू बदल होत होते आणि हे बदल साहित्य व्यावहारातही जाणवण्या इतके प्रभावी होते. यामागे बरीचशी अवाङ्मयीन आणि आर्थिक कारणे आहेत. १९९० साली झालेल्या जागतिकीकरणाचा प्रभाव एकूण मराठी साहित्यावर झालेला दिसतो. खाजगीकरण, औद्योगीकरण आणि जागतिकीकरणाचे पडसाद साहित्यावर उमटलेले दिसतात. १९९० नंतरच साहित्य हे नव्या जाणिवा नव्या संवेदना व्यक्त करणार आहे. १९९० नंतर बरेचसे नवीन नवीन विषय साहित्यात येवू लागले. आधुनिक जगणं आणि एकूण आधुनिक जीवन मांडण्याचा प्रयत्न या लेखनातून झालेला दिसतो. आजचं समाजवास्तव चित्रित करणार हे लेखन आहे. मानवाचा उत्क्रांतीकडे तसाच अधोगतीकडे जाणारा हा प्रवास आहे, माणसं आज संवेदनाहीन बनत चालली आहे, भौतिक सुख अनुभवताना आंतरिक सुख कुठे तरी हरवून बसली आहे. आजच्या पिढीच्या सुखाच्या कल्पनाच वेगळया आहे. स्व: केंद्री जग त्यांनी उभारल आहे पारंपरिक मूल्यांचा ह्यास आणि आधुनिक मूल्यांचा स्वीकारही आपल्याला दिसतो.

१९९० नंतरच्या साहित्य प्रवाहात अनेक साहित्य प्रकारांच्या आकृतीबंधामध्ये अनेक बदल झाले. आशयाच्या दृष्टीने वेगळेपणा, बदलत्या जीवन जाणिवांचा वेध, नवीन सामाजिक जाण , भाषिक प्रयोग, तसेच समाज वास्तव प्रकर्षाने मांडण्यात येवू लागले.

मराठी कादंबरीबाबत १९९० नंतरचा काळ अधिक आश्वासक आणि प्रवाही आहे, अनुभवाचं व्यापक अस पट पुढे घेवुन येणारा हा काळ आहे. या काळातील समजविश्र्व अधिक ठळकपणे कादंबरीतून दिसून येत, या काळात जागतिकीकरणाचा, औद्योगीकरणाचा प्रभाव माणसाच्या जीवनावर खोलवर झालेला दिसून येतो. या काळात स्त्रियांचा स्वतःकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला.

१९९० नंतर झपाट्याने झालेल्या जागतिकीकरणामुळे मानवी मूल्य व्यवस्थेवर उमटलेल्या पडसादांचे व बदलत्या जीवन जाणिवांचा वेध स्त्री लेखिका घेतात. १९९० नंतरच्या मराठी लेखिकेच्या कादंबरीतील सामाजिक

जाणीवा आणि त्यातून प्रकट होणारी सामाजिकता अत्यंत महत्त्वाची आहे. लेखिका ज्या समजवास्त्वाचा भाग आहे, त्याच प्रत्यकारी दर्शन त्यांच्या लेखनातून घडत. या बदलत्या जीवन जाणीवांचा वेद आपल्या कादंबरीतून स्त्रिलेखिका घेताना दिसतात. त्यांनी स्त्रीवादी जाणीव तश्याच महानगरीय स्त्रीचे जीवन आपल्या लेखनातून अधोरेखित करतात यात प्रामुख्याने कविता महाजन, आशा बगे, शांता गोखले, गौरी देशपांडे, मेघना पेठे, अंबिका सरकार, प्रतिभा रानडे, व प्रतिमा इंगोले यांचा मोलाचा वाटा आहे.

त्या प्रवाहातील एक आघाडीच्या लेखिका म्हणजे कविता महाजन. कविता महाजन ह्या एक कवयित्री तश्याच एक आघाडीच्या लेखिका होत्या. त्यांनी परखडपणे लेखन करून समाजाचं वास्तव रूप मांडल आहे. आजच जग व्यक्त करण्यासाठी कविता महाजनांच्या 'भिन्न' व 'ब्र' या कादंबऱ्यांचा अभ्यास आवश्यक आहे. आजच्या पिढीला समाजाचं वास्तविक रूप दाखवून देण्याची क्षमता या त्यांच्या कादंबरीत आहे.

**संशोधन विषयक समस्या ( Research problem/Question)**

नव्वदोत्तरी कालखंडातील बदलांचे पडसाद मराठीतील अनेक स्तरांवर लिहिणाऱ्या लेखकांवर उमटले आहेत. त्यात कविता महाजन, नीरजा, मेघना पेठे, शांता गोखले, आशा बगे, गौरी देशपांडे, अंबिका सरकार इ. उल्लेख साहजिकच होतो. यात प्रामुख्याने कविता महाजन या लेखिकेचा विचार करावा लागतो. त्यांच्या लेखनामध्ये आलेले स्त्रीवादी स्वरूप, बदलत्या समाजाबरोबर बदलत्या स्त्री जाणीव, तसेच बदलत्या समाज जीवनाचा आणि महानगरीय जीवनाचा वेध घेण्याचा प्रयत्न महत्त्वाचा ठरतो.

कविता महाजनांच्या लेखनामध्ये बदलत्या स्त्री जाणिवा व स्त्रीवाद मांडण्याचा प्रयत्न केला तसेच महानगरीय जीवन जगत असताना अनेक प्रश्नांना सामोरी जाणारी स्त्री चित्रीत केली. कविता महाजन यांनी आदिवासी समाजातील स्त्री आपल्या लेखनामधून मांडण्याचा प्रयत्न केला. आधुनिक स्त्रीयांच्या प्रश्नांची तसेच आदिवासी स्त्रीयांच्या प्रश्नांची उकल करणाऱ्या या कादंबऱ्यांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

**संशोधन कार्याची उपयुक्तता/ आवश्यकता**

आधुनिक प्रश्नांना सामोरी जाणारी स्त्री तसेच आदिवासी समाजातील स्त्रिया त्यांचे प्रश्न आणि या दोन्ही स्तरावरील स्त्रियांच्या भूमिका समजून घेण्यासाठी या कादंबऱ्या महत्त्वाच्या आहेत. आरोग्यविषयक आणि स्त्री पुरुष समानतेविषयी चर्चा करण्यासाठी ही कादंबरी उपयुक्तता आहे. त्या दृष्टीने आजच्या प्रश्नांची उकल या दोन्ही कादंबऱ्यातून झालेली आहे. त्यामुळे या विषयाचा अभ्यास अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

**संशोधनकार्यामागची उद्दिष्टये ( Objectives of research proposed)**

- आधुनिक जीवनातील बदलांचे पडसाद नवोदत्तरी साहित्यामध्ये कशाप्रकारे उमटतात याचा शोध घेणे.
- कविता महाजन यांनी मांडलेल्या महानगरीय स्त्रीच्या प्रश्नांचा शोध घेणे.
- कविता महाजन यांच्या कादंबरीचे स्त्रीवादी स्वरूप स्पष्ट करणे.
- कादंबरी हा प्रकार हाताळत असताना कविता महाजन यांनी कादंबरी लेखनात आणलेली प्रयोगशीलता

**संशोधन विषयक साहित्याचा आढावा/ मागोवा ( Literary Review)**

कविता महाजनांच्या ‘भिन्न’ व ‘ब्र’ कादंबरीचा अभ्यास करत असताना या विषयावरील तसेच या विषयाच्या संबंधित झालेल्या अभ्यासाचा विचार करण्याचा प्रयत्न केलेला आहे. ‘स्त्रीवादी समीक्षा – स्वरूप आणि उपयोजन’ या पुस्तकाच्या लेखिका डॉ. आश्विनी धोंगडे यांनी स्त्रीवाद, स्त्रीवादी समीक्षा, स्त्री स्वातंत्र्य – समाज आणि मानसशास्त्र इ. संबंधित लेखन केलेले आहे. ‘स्त्रीवाद: साहित्य आणि संस्कृती’ या पुस्तकाच्या लेखिका डॉ. अरुणा देशमुख आहेत, त्यांनीही स्त्रीवादावर लेखन केलेले आहे. तसेच ‘स्त्रीवाद’ या पुस्तकाचे संपादन सुमती लांडे यांनी केलेलं आहे.  लेखक श्री. दे. इनामदार आणि विद्युत भागवत यांनी ‘ स्त्रीवादी मराठी साहित्य’ या पुस्तकाचं लेखन केलेलं आहे.

'स्त्री-लिखित मराठी कादंबरी (१९५० ते २०१०)' या पुस्तकाचं संपादन अरुणा ढेरे यांनी केलेलं आहे. या पुस्तकात नीलिमा गुंडी यांनी 'कविता महाजन ' यांच्या कादंबरी संबंधात लेखन केलेल आहे.

डॉ. शंकर विभुते लिखित 'आधुनिक मराठी कादंबरीतील सामाजिकता' या पुस्तकातही कविता महाजनांचा अभ्यास झालेला आहे. "गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी" या विलास खोले संपादित पुस्तकात 'महानगरीय जीवनाचे मराठी कादंबरीतील चित्रण' या राजन गवसांच्या लेखात कविता महाजनाचा उल्लेख महत्त्वाचा ठरतो.

'आजची कादंबरी : नोंदी आणि निरीक्षणे' या रंगनाथ पठारे लिखित पुस्तकात ' स्त्रीयांच्या काही कादंबऱ्या ' या लेखात कविता महाजन यांच्या लेखनाचा आढावा त्यांनी घेतला आहे. " मराठी कादंबरी : स्त्रियांचे योगदान" या पुस्तकात डॉ. सौ. प्रमिला भिरुड यांनीही कविता महाजन यांचा उल्लेख महत्त्वाच्या लेखिकेमध्ये केलेला आहे. "भिन्न एक आकलन" हे पुरुषोत्तम सदानंद तायडे यांचे पुस्तक आहे 'भिन्न' कादंबरी संदर्भात या पुस्तकात लेखन केलेलं आहे.

"१९९० नंतरच्या मराठी लेखिकेच्या कादंबरीतील स्त्रीवाद" या विषयावर डॉ. नीता तोरणे यांची संशोधन केलेलं आहे. " संशोधन मुद्रा" या डॉ. राहुल पाटील संपादित पुस्तकात ' १९८० नंतरची मराठी कादंबरी व संशोधन ' या डॉ. भाऊसाहेब वि. गमे लिखित लेखात कविता महाजन यांचा उल्लेख आढळतो. "नव्वोदत्तर मराठी साहित्य" या प्रा. डॉ. सत्यावन मेश्राम गौरवग्रंथ हे ही पुस्तकं अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. " नव्वोदत्तरी कादंबरीतील स्त्रीजीवन" या पुस्तकातून डॉ. विनिता हिंगे यांनी 'भिन्न' आणि 'ब्र' कादंबरीचा आढावा घेतला आहे. "स्त्रीलिखित साहित्य" या आशुतोष पाटील संपादित पुस्तकात 'स्त्रियांचे कादंबरीलेखन : आत्मशोधाच्या स्वयंप्रकाशी वाटा' या लेखातून त्यांनी स्त्री लेखनावर भाष्य केलं आहे. " मराठी कादंबरीतील स्त्रीवाद" हे डॉ. वंदना महाजन यांचे महत्वाचे पुस्तक आहे.

" जागतिकीकरण आणि मराठी साहित्य" या पुस्तकाचे संपादन डॉ. शरद गायकवाड आणि प्रा. सुनील शिंदे यांनी केलेलं आहे, जागतिकीकरणाचे पडसाद 'भिन्न' आणि 'ब्र' कादंबरीवर कसे उमटतात याचा ते आढावा घेतात.

अखिल भारतीय मराठी साहित्य महमंडळाचे अक्षरयात्रा २०२० – २१ “ २१ व्या शतकातील स्त्रियांचे लेखन “ डॉ. दादा गोरे संपादित पुस्तकातून कविता महाजन यांच्या लेखनाचा आढावा घेतला आहे. “नव्वोदत्तरी स्त्रीवादी कादंबरी” या प्रा. रुपाली कांबळे यांनी लिहिलेल्या शोधनिबंधातून कविता महाजनांच्या भिन्न कादंबरीचा उल्लेख महत्त्वाच्या कादंबरीमध्ये केलेला आहे.

१९९० नंतर झपाट्याने झालेल्या बदलांचे पडसाद अनेक लेखकांनी टिपले आहेत. स्त्रीवादी स्वरूपाचं लेखन या काळात पुढे आल, स्त्री जाणीव प्रगल्भरीतीने मांडल्या गेल्या, आणि स्त्रीसाहित्यावर लिहिलेली ही पुस्तके स्त्रीवादी स्वरूप समजून घेण्यासाठी आणि कविता महाजनांच्या ‘भिन्न’ आणि ‘ब्र’ कादंबऱ्यांचा अभ्यास करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहेत.

**गृहितकांची मांडणी**

- आधुनिक जीवनातील बदलांचे पडसाद नवोदत्तरी साहित्यामध्ये उमटलेले दिसून येतात.
- नव्वोदत्तरी साहित्यात बदलत्या आधुनिक जीवन जाणीवा दिसून येतात.
- कविता महाजन यांच्या लेखनात स्त्री हा विषय केंद्रस्थानी आलेला आहे.
- कविता महाजन यांच्या लेखनातून आदिवासी स्त्रीयांचे प्रश्न हाताळले आहेत.
- कविता महाजन यांच्या कादंबऱ्या स्त्रीवादी स्वरूपाच्या आहेत.
- कविता महाजन यांच्या कादंबऱ्यात प्रयोगशीलता असलेली दिसून येते.

**संशोधन पद्धती**

- वर्णनात्मक संशोधन पद्धत

कविता महाजन यांच्या भिन्न व ब्र कादंबऱ्यात आलेल्या आशयसुत्राचा, पात्रांचा, भाषेचा, वर्णनात्मक पद्धतीने अभ्यास करून तिच्या संदर्भातील नविन आकलनाची मांडणी सदर प्रबंधात करण्यात येईल.

- **ऐतिहासिक संशोधन पद्धती**

ऐतिहासिकदृष्ट्या स्त्रीवादाचा आढावा घेत स्त्री लिखित मराठी कादंबऱ्यांचा आढावा घेण्यासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर सदर प्रबंधात करणार आहे.

- **विगमनात्मक संशोधन पद्धती**

महानगरातील एड्ससारखा प्रश्न आणि आदिवासी स्त्रियांच्या अस्तित्वाचा प्रश्न या महत्वाच्या समस्यांचं निवारण लेखिका आपल्या साहित्यातून कश्याप्रकारे करतात याचा विचार विगमनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करून सदर प्रबंधात करणार आहे .

**संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा**

१९९० नंतर जागतिकीकरणामुळे झपाट्याने बदल होत गेले. जिवन व्यवस्थेवरही त्याचे पडसाद दिसू लागले. अनेक स्त्री लेखिका आपल्या साहित्यातून व्यक्त होत गेल्या. स्त्रीवाद सारख्या संकल्पना त्यातन उदयास आल्या. महानगरीय जीवन आणि प्रगल्भ अश्या स्त्रीजाणीवा मराठी साहित्यातन व्यक्त होत गेल्या यात आशा बगे, शांता गोखले, गौरी देशपांडे, मेघना पेठे, अंबिका सरकार, प्रतिभा रानडे, व प्रतिमा इंगोले यांचा मोलाचा वाटा आहे.

कविता महाजन ह्या ही याच प्रवाहातील एक महत्त्वाच्या लेखिका आहेत. त्यांनी बालसाहित्य, अनुवादित साहित्य, कविता लेखन, कादंबरी लेखनही केलेलं आहे, त्यांच लेखन क्षेत्र खुप व्यापक आहे. त्यांनी भिन्न, ब्र, कुहू, ठकी आणि मर्यादित पुरुषोत्तम अश्या चार कादंबऱ्यांचं लेखन केलेल आहे.

कविता महाजन यांच्या भिन्न व ब्र कादंबरीचा अभ्यास सदर प्रबंधात करणार आहे. भिन्न व ब्र कादंबरीत स्त्रीवाद व स्त्री जाणीव केंद्रस्थानी ठेवून लेखन केलेलं आहे आणि वास्तववादी स्वरुपच्या दोन्ही कादंबऱ्या आहेत. कविता महाजन यांनी अनेक विषयावर लेखन केलेलं आहे. व्यापक अनुभव मांडणार अस त्यांचं लेखन आहे. सदर प्रबंधात भिन्न आणि ब्र या त्यांच्या दोन कादंबऱ्यांचा अभ्यास केला जाणार आहे.

# प्रकरण १

# कादंबरीः संकल्पना व स्वरुप

# कादंबरी: संकल्पना व स्वरुप

## प्रस्तावना

कादंबरी हा मराठीतील आधुनिक साहित्यप्रकार आहे. कादंबरीशिवाय मराठीतील इतर सर्व साहित्यप्रकार मुद्रणपूर्व आहे. कादंबरी हा साहित्यप्रकार मुद्रणोत्तर आहे. १९व्या शतकात महाराष्ट्रात प्रस्थापित झालेल्या इंग्रज राजवटीच्या सत्तातरांचे परिणाम एकंदरीत समाजजीवनावर आणि कलाविश्वातही हळूहळू जाणवू लागले. ब्रिटिश राजवटीच्या काळी शिक्षणाचा प्रसार होत होता, युरोपियन साहित्याशी भारतीयांचा परिचय झालेला. आंग्लसंपर्कातून आपल्याला एका नवीन संस्कृतीचा परिचय झाला आणि त्या संस्कृतीतील आयुध्यांचा वापरही होवू लागला, त्यातीलच एक मुद्रणतंत्र, मुद्रणतंत्राचा वापर सहजपणे होत होता. याच पार्श्वभूमीवर साहित्य क्षेत्रात कादंबरीने प्रवेश केला. १८३८ मध्ये पाठ्यक्रमाचा भाग म्हणून सुरवातीला कादंबरी अवतरली.

कादंबरी हा वाङमयप्रकार इंग्रजीतून जरी आपल्याकडे आला असला तरी आपल्या मराठी भाषेला आणि संस्कृतीला गद्याची परंपरा सुरुवातीपासूनच होती. इंग्रजी साहित्याने आपल्या लोकांना भान दिले अस आपण म्हणू शकतो कारण सुरुवातीच्या काळात बऱ्याचश्या इंग्रजी कादंबऱ्यांचा अनुवाद मराठीसहित इतर भाषांत झाला. बरेचसे कथात्मक साहित्य आपल्या भाषेत आले. अनेक लेखकांनी कादंबरी या प्रकारात लेखन केले आणि कादंबरीला एका वेगळया उंचीवर पोहोचवले. प्रस्तुत प्रकरणात कादंबरीच्या स्वरूपाचा आढवा घेण्यात आलेला आहे.

## १.१ कादंबरीच्या व्याख्या

कादंबरी या वाङ्मयप्रकाराला व्याख्येत बांधण अवघड काम आहे. तरीही अनेक अभ्यासकांनी कादंबरी या साहित्यप्रकाराची व्याख्या केलेली आहे त्यातून कादंबरीच्या अनेक अंगांचे दर्शन घडते. कादंबरीच्या विविधतेमुळे तीची एकच एक व्याख्या होवू शकत नाही. कादंबरीसंदर्भात वेगवेगळ्या विचारवंतांनी वेगवेगळया व्याख्या मांडलेल्या आहेत.

दि. के. बेडेकर – " कादंबरी ही गद्यात सांगितलेली दीर्घ व गुंतागुंतीची कथा असते. अनेक माणसे, कुटुंब, किंवा काहीवेळा राष्ट्रेही कादंबरीच्या परिघात नांदतात. घटनांचे किंवा वातावरणाचे एकच एक सूत्र लघुकथेत असते तसे कादंबरीत नसते. परंतू सूत्र एकच एक असले तरी सर्व कादंबरीला मिळून एक रचना किंवा सलगपणा तरी असावा लागतो."[१]

भालचंद्र नेमाडे – " कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली, आशयसुत्रांचे अनेक पदर असलेली, त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी, अनेक पात्रे, प्रसंग – अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेले आहेत, अशी साहित्यकृती असते. कादंबरीत या सर्व गोष्टींमुळे एखादी मोठी कृती साकल्याने मांडता येते. सामाजिक आशय विशाल असावा लागतो. एखाद्या समस्येचा पाठपुरावा तिच्या विविध संदर्भासकट मांडलेला असतो. एखाद्या पोटसमुहाचे, पोटसंस्कृतीचे तपशीलासह दर्शन घडवलेले असते. संपूर्ण काळाचा किंवा समाजाचा छेद घेतलेला असतो. आशयसूत्रे बळकट असतात. पात्रे सलग उभी राहतात."[२]

M. Abbel chevelley – " A fiction in prose of a certain extent."[३]

" जिला काही विस्तार आहे अशी गद्य कल्पित कथा."

ई. एम. फॉस्टर – " पन्नास हजार शब्दांच्या वर लिहिलेली कोणतीही काल्पनिक गद्य – कथा म्हणजे कादंबरी होय."[४]

कुसुमावती देशपांडे –" पार्थिव संसाराविषयी आस्था ही कादंबरीची वृत्ती जीवनाचे कानेकोपरे चौकशपणे धुंडाळणे तत्वदर्शित्वाचा किंवा अद्भुताचा मार्ग धरून मूलतः मानवी प्रश्नांचा विचार करणे हा कादंबरीचा दृष्टिकोन जीवनविषयक अनुभव वा कल्पना या कादंबरीचा मूळ आधार किंवा तिची मुख्य सामग्री ही वृत्ती हा दृष्टिकोन हे अनुभव वा कल्पना जिवंत व्यक्तीचीत्रणाच्या व एका विस्तृत आकर्षक कथानकाच्याद्वारे व्यक्त करणे ही कादंबरीची पद्धती."[५]

कादंबरी हा साहित्यप्रकार जरी व्याख्येत बंदिस्त करण्याचा प्रयत्न अनेक अभ्यासकांनी केला असला तरी कादंबरीचे स्वरूप पूर्णपणे उलगडून दाखवणारी व्याख्या आजपर्यंत झालेली नाही. कादंबरीचा विशालपट व्याख्येत सामावून घेणे कठीण काम आहे यातनच कादंबरीच्या स्वरूपाची गुणवत्ता आपल्या लक्षात येते. अभ्यासकांनी

कादंबरीच्या केलेल्या या व्याख्येवरून कादंबरीच्या विविध अंगापैकी कुठ्याली एका अंगाचे दर्शन घडते या व्याख्यातून कादंबरीच्या सर्वसमावेशक अंगाचा विचार झालेला दिसत नाही. त्यातल्यात्यात कुसुमावती देशपांडे यांनी केलेली व्याख्या कादंबरीसंदर्भात परिपक्व वाटते. कादंबरी हा प्रवाहानुसार बदलत जाणारा साहित्यप्रकार आहे आणि त्याचे हे रूप उलगडण्यास व्याख्या महत्त्वाचे कार्य करतात. भालचंद्र नेमाडे यांनी केलेली व्याख्या महत्वाची आहे ते कादंबरीतील अनेकविध पैलूंचा विचार मांडतात त्याचबरोबर कादंबरीत काय अंतर्भूत असते हे ही सांगतात. तर दी. के. बेडेकर, ई. एम. फॉस्टर, M. Abbel. Chevelley या तीनही अभ्यासकांनी कादंबरीच्या गद्य स्वरूपावर भाष्य केलेले आहे. या अभ्यासकांच्या व्याख्येवरून कादंबरीचे स्वरूप अधिक स्पष्ट होण्यास मदत होते.

कादंबरी हा गद्य साहित्यप्रकार असून त्याचे स्वरूप विशाल आहे, काळानुसार विकसित होणारा हा प्रकार आहे. कादंबरीतून मानावी जीवनातील अनेक प्रश्नांची उकल तर होतेच पण त्याचबरोबर कादंबरीत मानवी जीवनाचे चित्रण काल्पनिक स्वरूपात जरी असले तरी त्यातून वास्तवाची प्रचीती येते. समाजाचे प्रतिबिंबच आपण कादंबरीतून अप्रतक्ष्यरित्या अनुभवत असतो. कादंबरीतून विषालानुभव विश्व लेखक साकार करत असतो.

### १.२ कादंबरीचे स्वरूप

कादंबरी या साहित्यप्रकाराला दीर्घ कथात्मक साहित्यप्रकार म्हणून पाहिले जाते. कादंबरीचे लेखन गद्य स्वरूपात केले जाते. इतर साहित्यप्रकाराच्या तुलनेत कादंबरीचा व्याप आणि कालपट मोठा असतो. कादंबरीचा आणि समाजाचा परस्पर संबंध आहे, लेखक हा याच समाजाचा भाग असतो. त्यामुळे बदलांचे पडसाद साहित्यावर उमटत असतात. मानवी जीवनाचे चित्रण कादंबरीतून केले जाते. इंग्रजीत कादंबरीला फिक्शन असे म्हटले जाते म्हणजे कल्पित स्वरूपाची कथा. वेगवेगळ्या पात्रा भोवती लेखकाने कथानक गुंफलेले असते. कथानकाला आणि निवेदनाला कादंबरीत महत्व आहे. कादंबरीचे एकच एक निश्चित तंत्र व स्वरूप सांगता येत नाही.

गुणधर्मांच्या वैशिष्ट्यामुळे अन्य साहित्यप्रकारापेक्षा कादंबरी हा साहित्यप्रकार वेगळा ठरतो. दीर्घ कथात्मक्ता, कथानकाला आणि निवेदनाला महत्व, व्यापक जिवनश्रृष्टीचे दर्शन, या वैशिष्ट्यामुळे कादंबरीचे स्वरूप लक्षात येते. रंजन प्रधानता, वास्तववाद, बोधवाद इत्यादी कादंबरीच्या निर्मितीमागील महत्त्वाच्या प्रेरणा आहेत. बदलत्या कालप्रवाहानुसार कादंबरीचे अनुभवविश्र्वही विस्तारत गेले. कथानकाला कादंबरीत महत्वाचे स्थान आहे. सुसंघटितता, मौलिकता, संभवनीयता, रचनाकौशल्य – कौशल्यपूर्ण गुंफण, रोचकता, रंजकता, हे कादंबरीतील कथानकाचे महत्त्वाचे गुण आहेत त्यामुळे कादंबरीच्या स्वरूपात गतिशीलता येते. प्रदीर्घ कथाआशय असलेला कादंबरी हा साहित्यप्रकार मराठी गद्य वाङ्‌मयात लोकप्रिय ठरला. कादंबरीची आस्वाद्यक्षमता सहज असते त्याचबरोबर तिच्या बांधणीत सैलपणा असतो. कादंबरी या वाङ्‌मयप्रकाराचे स्वरूप परिवर्तनीय आणि विकसित असते. इतर सहित्य प्रकारच्या तुलनेत हा साहित्यप्रकार वेगळा आहे, कादंबरीत जरी एक दीर्घ कथा असली तरी ती व्यापक अंगाने पुढे जाणारी आहे. आणि महत्वाचं म्हणजे त्याला उपकथानकाची जोड असते.

कादंबरीमध्ये प्राणी जीवनाचे, मानवी जीवनाचे तसेच मानवाच्या मनात असलेल्या वेगवेगळया विषयांचे व्यापक दर्शन व चिंतन कादंबरीतून घडवले जाते. कादंबरीला महकाव्याचा आवाका असतो असे अभ्यासकांनी म्हंटले आहे. कादंबरीतून लेखक एखाद्या गावाचा, राज्याचा, देशाचा किंवा एकद्या विशिष्ट समाज जीवनाचा, जीवन व्यवहाराचा, संस्कृतीचा व्यापक चित्रपट कादंबरीतून घडवत असतो. कलानंद, मनोरंजन आणि काल्पनिकता या दृष्टी घेवूनच कादंबरीकार लेखन करतो.

कादंबरीत कल्पनामयता, अद्भुतरम्यता, स्वप्नमयता इत्यादी गुणवैशिष्ट्यामुळे कादंबरीचे स्वरूप प्रारंभीच्या काळात मनोरंजनात्मक पातळीवर होते. कादंबरी या साहित्यप्रकाराचे स्वरूप काळानुसार बदलत असते त्याचबरोबर कादंबरीच्या अंतर्गत असलेली संरचनाही बदलते.

### १.३ कादंबरीचे घटक

कादंबरीतून मानावी जीवनाचे दर्शन घडत असते. व्यक्ती आणि भोवतालची परिस्थिती यात संघर्ष सतत चालू असतो. हा संघर्ष एकीकडे माणसाच आंतरिक जीवन तर दुसरीकडे सभोवतालचे बाह्य जीवन यात होत

असतो. व्यक्तींच्या मानसिक हालचालीचा त्याच्या कृतीचा उलट त्या कृतीचा परिस्थितीवर व एकंदर व्यक्तीमनावर होणारा परिणाम या क्रियाप्रक्रियातन अनेक घटना निर्माण होत असतात. या सगळया प्रक्रियेतून कादंबरीचे महत्वाचे घटक निष्पन्न होतात ते म्हणजे व्यक्ती आणि घटना यांनी बनलेले कथानक. कादंबरीकार नानाविध घडणाऱ्या घटनांपैकी काही घटनांची निवड तो करत असतो. यातूनच त्याला कादंबरीचा विषय, स्थळ काळ घटना यांची पार्श्वभुमी लाभते.

कादंबरी या वाङमयप्रकाराची स्वरूपनिश्चिती लक्षात घेता ज्यामुळे कादंबरीला जिवंतपणा आणि आकार लाभतो ते कादंबरीचे घटक खुप महत्वाचे आणि आवश्यक आहेत.

### १.३.१ कथानक

कथानक हा कादंबरीचा महत्वाचा घटक आहे, कथानकामुळे कादंबरीला आकार येतो आणि कादंबरीचे स्वरूप कथात्म असते. इंग्रजीत कथानकाला प्लॉट असे म्हटले जाते. कथानकात प्रसंगांची आणि घटनांची साखळी असते. कथानकाचा विकास प्रारंभ, मध्य, शेवट या तीन अवस्थेतून होत असतो. कादंबरीच कथानक आकर्षक असायला पाहिजे जेणेकरून वाचकांची उत्कंठा वाढीस लागते. कथानकात रंजनात्मक्ता असते. लेखक आपल्या कल्पनारंम्यतेतून कथा निर्माण करत असतो आणि घटना प्रसंगाच्या माध्यमाने तिला गुंफत असतो. कथा हा कथानकाचा प्राण असतो. कादंबरीच्या कथानकात मौलिकता, संभवनीयता, सुसंघटितता असणे महत्वाचे ठरते. त्याचबरोबर कौशल्य आणि रोचकता हे ही कथानकाचे महत्वाचे गुण आहेत.

### १.३.२ व्यक्तिरेखा

कादंबरीत कथानकाइतक्याच व्यक्तिरेखाही महत्त्वाच्या असतात. व्यक्तिचित्रणाच्या माध्यमातून पात्रांचे स्वभावलेखनही होत असते. कादंबरीत वावरणाऱ्या व्यक्ती ह्याच व्यक्तिरेखा बनतात. व्यक्तिचित्रण, व्यक्ती दर्शन,

पात्रचित्रण असेही शब्द व्यक्तिरेखांसाठी वापरले जातात. लेखकाला समाजात अनेक व्यक्ती भेटत असतात त्याच्या अनुभवविश्र्वावरूनच तो अनेक पात्रं रेखाटत असतो.

कादंबरी मानवी मनाचा शोध घेते असते त्यामुळे अनेक मानवी स्वभावाचे नमुने साकार होतात. व्यक्तिरेखामुळे कथानकात जिवंतपणा येतो.

व्यक्तिचित्रण करण हे कौशल्याचं काम आहे. लेखक कल्पनाविलास आणि वास्तव यांची सांगड घालून व्यक्तिरेखा उभी करत असतो. व्यक्तींच्या शारीरिक ठेवणीतून, पोषाखातून त्यांचे रूप आकारास येते. स्वभाव दर्शनावरून ही पात्रे उलगडत जातात. मुख्य व्यक्तिरेखा, गौण व्यक्तिरेखा लेखक कादंबरीत रेखाटत असतो. आणि गौण व्यक्तिरेखांच्या माध्यमातून एक वेगळे विश्व लेखक साकार करत असतो. व्यक्तिरेखांचे अंतर्बाह्य दर्शन कादंबरीतून लेखक साकारत असतो.

**१.३.३ वातावरण**

वातावरण निर्मितीला कादंबरीत महत्त्वाचे स्थान आहे. विशिष्ट स्थल – कालात कादंबरीचे कथानक घडत असते. कादंबरीत विशिष्ट्य जीवनप्रसंगाची पार्श्वभूमी कथानकाला आणि व्यक्तीचित्रणाला लाभलेली असते. या वर्णनातूनुच वातावरण साकार होत असते. विशिष्ट कालखंडानुसार, समाजानुसर तसेच जीवनपद्धती प्रमाणे वातावरण बदलत असते. स्थल – काल वातावरण निर्मितीमागे महत्वाची भूमिका बजावतात. स्थलकालाचा मानवी मनावर, जीवनावर होणारा परिणाम आणि त्याचबरोबर मानवात होणारे परिवर्तन दाखवण्यासाठी वातावरण महत्त्वाचा घटक असतो.

कथानकात एखादी घटना कुठल्या स्थल – कालात घडते हे ही महत्वाचं आहे. कादंबरीत कथानकाच्या उपयुक्ततेनुसार भौगोलिक पार्श्वभूमी, सामजिक पार्श्वभूमी रेखाटली जाते. त्या विशिष्ट काळाला जिवंत करण्याचे सामर्थ्य वातावरणात असते.

### १.३.४ भाषाशैली

भाषाशैलीचे दोन गुणधर्म म्हणजे सहजता आणि सुंदरता. कादंबरीची भाषाही सहज आणि सुंदर असते. अलंकारिक भाषेचाही वापर कादंबरी लेखनात होत असतो. कादंबरीची भाषा साधी, सोपी वाचकाला सहज कळेल अशी असते. त्याचबरोबर भाषेचे स्वरूप अर्थवाही असते. निवेदन हे भाषेच्या माध्यमातून अकराला येत असते. कादंबरीतील घटना, प्रसंग, आनंद, दुःख, यातना, उत्साह इत्यादी भाषेच्याच माध्यमातून व्यक्त केले जाते म्हणून भाषेला महत्वाचं स्थान आहे.

कथानकाला आणि पात्रांना साजेल अशी भाषा कादंबरीत वापरली जाते. भाषा ही व्यक्तीनुरुप बदलत असते. कादंबरीतील कथानक ज्या वातावरणात घडत त्याला अनुकूल अशी भाषा कादंबरीत वापरली जाते. काळानुसार कादंबरी बदलत गेली, त्यानुसार तिच्या भाषेतही बदल होत गेले.

### १.३.५ संवाद

संवाद हा कादंबरीचा महत्वाचा घटक असून संवादामुळे नाटकात नाट्यमयता येते. कादंबरीतील पात्र प्रभावी आणि जिवंत करण्यासाठीं कादंबरीकार संवादाचा वापर करत असतो. पात्राच्या संवादातून पात्रांची मनस्थिती, आचारविचार, भावभावना व्यक्त होत असतात. संवाद व्यक्तिदर्शन प्रभावी करते. कथेचा संवादाशी निकटचा संबंध असतो. वास्तविकता आणि स्वभाविकता हे महत्वाचे गुण संवादात असेल पाहिजे. संवादातून जरी कादंबरीकार पात्रांचे भावविश्व निर्माण करत असला तरी पात्राच्या तोंडी येणाऱ्या संवादातून सहजता दिसली पाहिजे त्या पात्रांचे वैशिष्ट्य संवादाच्या माध्यमातून लक्षात आले पाहिजे. संवाद जर सुटसुटीत, चटकदार आणि स्वाभाविक असेल तर त्यात जिवंतपणा येतो. ते पात्र आपल्या डोळ्यांसमोर रंगत जात.

### १.३.६ निवेदन

कादंबरीत निवेदन हा घटक खुप महत्वाचा आहे, कादंबरीतील कथानक निवेदनाद्वारे पुढे जात असते. कादंबरीला वाचकिय रूप देण्यासाठी भाषिक निवेदन गरजेचे आहे. वाचकांसमोर संपूर्ण कादंबरीचा पट उलगडण्यासाठी निवेदनाशिवाय पर्याय नाही. कदंबरीला आकार देण्याचे काम निवेदन करत असते. घटनांची मालिकाच म्हणजे निवेदन होय.

निवेदनामुळे कथनकला सुसज्जपणा येतो. कादंबरीत लेखक प्रथम पुरुषी निवेदन पद्धत, तृतीय पुरुषी निवेदन पद्धत, पात्रमुखी कथन, आत्मनिवेदन पद्धत अश्या वेगवेगळया पद्धतीचा कथानकाच्या दृष्टीने वापर करत असतो. निवेदन हा इतर घटकांच्या तुलनेत कादंबरीचा आधारभूत असा घटक आहे.

## १.४ कादंबरी वाङमयाचे प्रकार

कादंबरीच्या स्वरूपात व विषयात कालमानाप्रमाणे विकास होत गेला. नवनवीन विषय कादंबरीत येवू लागले, त्यामुळे कादंबरीचे निश्चित एक स्वरूप आणि व्याख्या सांगता येत नाही. हेच कादंबरीच्या प्रकारांच्या बाबतीतही झालं. कादंबरी लेखनात अनेक विषय आले आहेत त्यानुसार त्याची अनेक रूपे तयार झालेली असून त्यांची वर्गवारी झालेली आहे.

कादंबरीच्या व्याख्या आणि स्वरूप स्पष्ट होता कादंबरीच्या प्रकारांची माहिती करुन घेणे महत्त्वाचे ठरते.

### १.४.१ अद्भुतरम्य कादंबरी

मराठी भाषेतील सुरवातीच वाङ्मय हे बहुधा अद्भुतरम्यच आहे. आरंभीच्या मराठी कादंबऱ्यासुध्दा अद्भुतरम्य होत्या. त्याचबरोबर या कादंबरीतून कल्पनाविलास दिसतो. अद्भुतता, कल्पनाविलास, चमत्कारिक गोष्टी, स्वप्नरंजनात्मक हे महत्वाचे गुण या कादंबरीतून दिसून येतात. अद्भुतरम्य कादंबरी प्रत्यक्ष सत्यावर आधारित नसते. मनाचे रंजन करणे हा मुख्य हेतू समोर धरून कादंबरीकार लेखन करत असतो. सुरवातीच्या काळात वाचकांची मने अश्या अद्भुत गोष्टीत रमत होती. म्हणून सुरवातीला अद्भुतरम्य कादंबरीचे लेखन मोठ्या प्रमाणात

झाले. कादंबरीकार आपल्या स्वैर कल्पना विलासातूनच अद्भुततेची निर्मिती करत असतो, त्यामुळे रम्यत्वाकडे त्याचा रोख अधिक असतो. वाचकाला सभोवतालच्या सृष्टीचा विसर, सुखदुःखाचा विसर पडावा हीच लेखकाची विशेष प्रवृत्ती दिसून येते. 'मुक्तमाला' ही लक्ष्मणशास्त्री हेबळे यांची प्रथम कादंबरी मराठीतील पहिली अद्भुतरम्य कादंबरी मानली जाते. १८६१ साली या कादंबरीच लेखन त्यांनी केले. तसेच त्यांच्या रत्नप्रभा, मांजुघोष इत्यादी कादंबऱ्या अद्भुतरम्य आहे.

अद्भुतरम्य कादंबरीचे वातावरण मनोवेधक असते. सत्यापासून कुठेतरी दूर कल्पनेच्या दुनियेत विहार करून ते येत असते आणि अद्भुततेची मोहिनी ते बालमनावर घालीत असते. या कादंबरीचं स्वरूप मनोरंजनात्मक असते.

### १.४.२ ऐतिहासिक कादंबरी

ऐतिहासिक कादंबरी हा मराठी कादंबरीचा एक प्रकार आहे. 'मोचनड' ही रा. भी. गुंजिकरांनी १८६७ साली लिहिलेली कादंबरी मराठीतील पहिली ऐतिहासिक कादंबरी ठरली. ऐतिहासिक कादंबरीमध्ये घटना, प्रसंग ऐतिहासिक असतात, इतिहासाचा आधार घेऊन कादंबरी लेखन केले जाते. कादंबरीकार ऐतिहासीक कादंबरीत काल्पनिक प्रसंगाची गुंफण करत असतो. ऐतिहासिक कादंबरीतील स्थल, काल, पात्रे जरी ऐतिहासीक असली तरी तो इतिहास नव्हे. ऐतिहासीक कादंबरीकडे इतिहास म्हणून बघितले जात नाही. कादंबरीकार ऐतिहासीक वास्तवाचा आधार घेवून काल्पनिक विश्व साकार करत असतो. इतिहासातील घटना आणि व्यक्ती कादंबरीकार स्वताच्या दृष्टिकोनातून मांडत असतो. ऐतिहासीक कादंबरीत ' भूतकाळ' हा प्रत्यक्ष वर्तमानासारखा वावरत असतो. ऐतिहासीक कादंबरीत ऐतिहासीक भाषा, आचारविचार, पोषाख इत्यादी कादंबरीकार जाणीवपूर्वक वापरतो. जेणेकरून ऐतिहासिक जीवनाची जिवंत अनुभूती वाचकाला येते.

### १.४.३ सामाजिक कादंबरी

कादंबरीच्या इतिहासात मोठ्या प्रमाणात सामाजिक कादंबऱ्यांचे लेखन झालेले दिसून येते. सामाजिक कादंबरीतून समाज वास्तवाचे चित्रण केले जाते. अनेक सामाजिक संदर्भ सामाजिक कादंबऱ्यामध्ये येत असतात. आपल्या अवतीभवतीतील, रोजच्या जगण्यातील आपल्यासारखीच पात्रे कादंबरीत वावरत असतात. विशिष्ट कलखंड घेवून या कादंबरीप्रकाराचे लेखन केले जाते. मानव हा या समाजाचा, संस्कृतीचा भाग आहे, त्यामुळे आजूबाजूच्या विश्वाचे प्रतिबिंब सामजिक कादंबरीतून दिसून येते. कादंबरीतील दृश्ये, प्रसंग सहजपणे अपल्या डोळ्यासमोर उभी राहतात.

सामाजिक कादंबरीत सामाजिक प्रश्नांचे, रीतिरिवाज, संस्कृति, सामाजिक घटक, भोवतालचे वातावरण अश्या अनेकविध प्रश्नांचे चित्रण कादंबरीत होत असते. माणसामाणसातील परस्पर संबंध, नैतिकता, मानवी संबंधाचे बदलते स्वरुप, समाजव्यवस्था, विचारमूल्य अशा अनेकविध विषयांचे चित्रण कादंबरीतून होत असते. सामाजिक कादंबरी बदलत्या काळाचे भान देते. जसजसा समाज बदलतो तसतसे आधुनिक विषय कादंबरीत येत असतात.

सामाजिक कादंबरी बदलत्या काळाचे, समाजाच्या गतिशिल परिवर्तनाचे, बदलत्या मानवी वृत्तीप्रवृत्तीचे, बदलत्या मूल्यव्यवस्थेचे चित्रण करते असे सामाजिक कादंबरी विषयी म्हणणे योग्य ठरते.

## १.५ विविध प्रवाह व मराठी कादंबरी

कादंबरी या साहित्यप्रकारात बदलत्या कालखंडानुसार नविन नविन प्रवाह जुळत गेले. आणि कादंबरी ही अधिकाधिक विकसित होत गेली. नवीन जाणीवा नविन संदर्भ कादंबरीत येवू लागले. बदलत्या जीवनशैली बरोबर साहित्यातील जाणीवाही बदलू लागल्या. आणि १९६० नंतर कादंबरीत अनेक प्रवाह निर्माण झाले.

### १.५.१ प्रादेशिक कादंबरी

प्रादेशिक कादंबरीतून एखद्या प्रदेशातील जीवन, तेथील आचारविचार, भाषा , संस्कृती, जीवनशैली यांचा विचार ज्या कादंबरीत केला जातो तीला प्रादेशिक कादंबरी असे म्हटले जाते. विशेषता ग्रामीण वास्तवाचे चित्रण या कादंबरीत असते.

र. वा. दिघे यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात ‘पाणकळा’ (१९४०) मध्ये लिहून त्यांनी एक नविन प्रयोग केला. ‘पाणकळा’ ही कादंबरी प्रादेशिक स्वरूपाची आहे.

प्रादेशिक कादंबरीत कादंबरीकार प्रदेशाच्या चीत्रणासोबत त्या प्रदेशातील निसर्ग, संस्कृती, भाषा, स्थानवैशिष्टये यांचेही दर्शन घडवतो. प्रादेशिक कादंबऱ्यामध्ये अस्सल गावठीबाज, बोलीभाषा, ग्रामीण – नागरी संसकृतीची सरमिसळता इत्यादी विशेष दिसून येते. प्रदेशातील खास भौगोलिक वैशिष्टये, सर्वसामान्य संस्कृतीचे दर्शन यावर प्रादेशिक कादंबरी भर देते.

देशी भान मराठी कादंबरीत प्रादेशिक कादंबरीने रुजविला हेच तिचे श्रेय आहे.

### १.५.२ ग्रामीण कादंबरी

ग्रामीण साहित्य हा प्रवाह १९६० नंतर उदयास आलेला महत्वाचा प्रवाह आहे. ग्रामीण कादंबरीच्या प्रवाहाची सूरवात रामचंद्र विनायक टिकेकर यांच्या १९०३ मध्ये प्रकाशित झालेल्या ‘ पिराजी पाटील’ या कादंबरीपासून झाली असे मानले जाते. र. वा. दिघे यांची ‘पानकळा’, ‘सराई’, गो. नी. दांडेकरांची ‘शितू’, ग. ल. ठोकळांची ‘ गावगुंड’ ही काही ग्रामीण कादंबरीची उदाहरण आहेत.

ग्रामीण जीवनाचे दर्शन ग्रामीण कादंबरीतून घडते. ग्रामीण कादंबरीत ग्रामीण जीवन, निसर्ग, संस्कृती, रीतिरिवाज, प्रथा, शेती, तेथील आर्थिक , सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक परिस्थीती यातून ग्रामजिवनात उद्भवणाऱ्या समस्या चित्रित केलेल्या असतात. खरतर ग्रामीण समस्यातूनच ग्रामीण कादंबरी साकार झालेली आहे.

ग्रामीण कादंबरीतून कादंबरीकार एखाद्या विशिष्ट गावाचे चित्रण, तेथील बोलीभाषा, राहणीमान, गावातील समस्या या संदर्भातून व्यक्तिनिष्ठ जीवन रंगवतो. कृषिकेंद्रात हा ग्रामीण जीवनाचा महत्त्वाचा गाभा आहे.

### १.५.३ दलीत कादंबरी

अण्णा भाऊ साठे यांच्या ‘फकिरा’ या कादंबरीपासून दलित कादंबरीचा प्रारंभ दिसतो. शंकरराव खरात यांची ‘माणुसकीची हाक’, उत्तम कांबळे यांची ‘ श्राद्ध’, शरणकुमार लिंबाळे यांची ‘हिंदू’  या काही दलीत कादंबऱ्या आहेत.

दलीत कादंबरीचे स्वरूप पारंपरिक कादंबरीपेक्षा वेगळ आहे, दलीत कादंबरीतून दलितांचे प्रश्न, त्यांची दुःखे, समाजव्यवस्थेने केलेले जुलूम इत्यादी चित्रण होत असते.

दलीत कादंबरीने प्रस्थापित जातिव्यवस्थेला छेद पाडण्याचे काम केले. दलीत कादंबरीतून कादंबरीकारानी समाजाने माणूस म्हणून नाकारलेल्या दलितांचे जीवन रेखटले आहे. दलीत कादंबरीत कलात्मक पद्धतीने प्रत्यक्ष जीवनानुभवच मांडलेला असतो. जातीयव्यवस्थेवर दलीत कादंबरी अधिक प्रकाश टाकते.

दलीत कादंबरीतून कादंबरीकार सांस्कृतीक व आर्थिक मागासलेपणा, सामाजिक विषमता, जातीभेद, अंधश्रद्ध, रूढीपरंपरा, देवदेवस्की यांचे दर्शन घडते. दलीत कादंबरीतून विद्रोह व्यक्त होत असतो.

### १.५.४ मनोविषलेषणात्मक कादंबरी

१९२५ च्या सुमारास मनोविषलेषणात्मक कादंबरीची सुरवात झालेली दिसून येते.  पु. ल. देशपांडे यांची ‘सुकलेली फुले’, विभावरी शीरुरकर यांची ‘हिंदोळयावर’ या कादंबऱ्या मनोविषलेषणात्मक आहेत.

मनोविषलेषणात्मक कादंबरीत मनोविषलेषण हा घटक महत्त्वाचा आधार मानून कादंबरी लेखन केलेले असते. या कादंबरीतून कादंबरीकार व्यक्तीच्या मनाचा ठाव घेत असतो. मानवी मनाच्या अंतरंगाचे अनेक पैलू कादंबरीकार उलगडून दाखवत असतो.  मानवी मन हे या कादंबरीत केंद्रस्थानी असते. मानवी मनाचे सूक्ष्म दर्शन, मानवी मनाच्या विकृत व अविकृत छटांच दर्शन कादंबरीकार घडवत असतो.

**समारोप**

कादंबरीला ललित गध्यात्मक वाङ्मयप्रकार असे म्हंटले जाते. इंग्रजी साहित्याच्या प्रभावाने आणि मुद्रण कला विकसित झाल्याने सुरवातीला अनुकरणाच्या रूपातून कादंबरी हा साहित्यप्रकार आपल्याकडे अवतरला. कादंबरीच्या स्वरूपाविषयी अनेक विचारवंतांनी व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. कादंबरी या साहित्यप्रकाराला अमाप लोकप्रियता गवसली. कादंबरी हा साहित्यप्रकार कल्पना आणि वास्तवता याचे कलात्मक संगम घडवते. मानवी जीवनाच्या विविध पैलूंचे दर्शन कादंबरीतून घडते. कथानक, व्यक्तिरेखा, भाषाशैली, घटनाप्रसंग, वातावरण, निवेदन अश्या घटकांचा वापर करून कादंबरीचे स्वरूप घडविले जाते. कादंबरी आणि समाज यांचे अतूट नाते असते. कादंबरीतील कथानकाला उपकथानकांचीही जोड असते. कादंबरी हा प्रवाहाबरोबर बदलत जाणारा साहित्यप्रकार आहे. आज कादंबरीचे अनेक प्रवाह विकसित झालेले आहेत. आणि या साहित्यप्रकाराची लोकप्रियता ही वाढलेली आहे.

**निष्कर्ष**

1. इतर साहित्यप्रकारांच्या तुलनेत कादंबरी हा साहित्यप्रकार अधिक वाचकप्रिय आहे.
2. कादंबरीला दिर्घ गद्यात्मक कथा असे म्हटले जाते.
3. मराठी साहित्यात कादंबरीचा जन्म आधुनिक काळात झाला. सुरवातीच्या कादंबऱ्या भाषांतरित स्वरूपाच्या होत्या.
4. कादंबरीचे स्वरूप कालखंडानुसार बदलत जाते, कादंबरीचे निश्चित असे स्वरूप सांगता येत नाही.
5. कादंबरीच्या स्वरूपाविषयी अनेक अभ्यासकांनी वेगवेगळया व्याख्या मांडलेल्या आहेत. पण त्या व्याख्या परिपूर्ण नाहीत. अभ्यासकांनी मांडलेल्या कादंबरी या साहित्य प्रकाराच्या व्याख्या कादंबरीच्या वेगवेगळया अंगावर प्रकाश टाकतात.
6. कादंबरी हा साहित्यप्रकार प्रवाही असून वास्तवतेशी नात सांगणारा आहे. तसेच जीवनाशय सांगून नवीन मूल्य कादंबरी मांडत आहे.

7. कादंबरीतून व्यापक अनुभवविश्र्व लेखक साकार करत असतो. आणि त्यातुन जीवनानुभवाचे प्रकटीकरण होत असते.
8. कादंबरी मानवी जीवनाचा विशाल पट आपल्या कवेत घेते.
9. कालखंडानुसार कादंबरीचे विषय बदलत गेले, त्यात नवता आली, कादंबरीचे वर्गीकरण करण्यात आले. वेगवेगळ्या विचारवंतांनी आपल्या दृष्टिकोनातून कादंबरीचे प्रकार मांडले त्यात महत्त्वाचे प्रकार म्हणजे अद्भुतरम्य, ऐतिहासीक आणि सामाजिक त्याचबरोबर अनेक साहित्याचे प्रवाह मराठी कादंबरीत आले त्यात ग्रामीण, दलीत, प्रादेशिक इत्यादीचा समावेश आहे.
10. कादंबरीच्या स्वरूपात लवचिकता आहे, एक बंधिस्त अस रूप तिला प्राप्त झालेलं नाही. कादंबरीच्या विविध वैशिष्ट्यामुळें कादंबरी हा साहित्य प्रकार अधिक लोकप्रिय ठरला.

**संदर्भ सूची**


1. तुकदेव, रोहिणी. "मराठी कादंबरीचा प्रारंभ." डायमंड पब्लिकेशन, नोव्हेंबर २०१४, पृ. क्र. ७३
2. पठारे, रंगनाथ. "आजची कादंबरी: नोंदी आणि निरीक्षणे." शब्दालय प्रकाशन, जानेवारी २०१४, पृ. क्र. ३८
3. संत, जान्हवी. "कादंबरी एक वाङमयप्रकार." मोघे प्रकाशन, कोल्हापूर, नोव्हेंबर १९७१, पृ. क्र. ९
4. संत, जान्हवी. "कादंबरी एक वाङमयप्रकार." मोघे प्रकाशन, कोल्हापूर, नोव्हेंबर १९७१. पृ. क्र. ९
5. गंधारे, द. के. "मराठी वाङमय प्रकार : स्वरुप, संकल्पना व वाटचाल." शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, जानेवारी २०१७, पृ.क्र.४३
6. कुळकर्णी, श्री. मा. "कादंबरीची रचना" उन्मेष प्रकाशन कर्नलबाग, नागपूर, १९५६.
7. मेश्राम, नंदा. " दलित कादंबरी समीक्षा."डिंपल पब्लिकेशन, डिसेंबर २०१६.
8. कुलकर्णी,मदन."मराठी प्रादेशिक कादंबरी: तंत्र आणि स्वरुप." श्री. मंगेश प्रकाशक, १९८४.
9. कामत, सतीश. "साहित्य : आशय आणि आविष्कार" शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २०१८.

# प्रकरण २

## कविता महाजन यांच्या 'भिन्न' व 'ब्र' कादंबऱ्यातून दिसून येणाऱ्या महानगरीय जाणिवा.

# कविता महाजन यांच्या 'भिन्न' व 'ब्र' कादंबऱ्यातून दिसून येणाऱ्या महानगरीय जाणिवा.

**प्रस्तावना**

१९९० नंतर समाजात जे बदल होत गेले ते साहित्य व्यवहारातही जाणवण्या इतके प्रभावी होते. १९९० नंतर जागतिकीकरणाची, खाजगीकरणाची, औद्योगिकीकरणाची जी लाट आली त्याचे परिणाम समाजा बरोबरच मराठी साहित्यावरही झाले. याच काळात बरीच स्थित्यंतर झाली आणि शहरीकरणाच्या प्रक्रियेला सुरुवात झाली. शहरांचीच महानगरे बनत गेली. महानगरांच्या प्रक्रियेचे स्वरूप समजून घेणे महत्वाचे ठरते. महानगरीय जाणीव १९९० नंतरच्या साहित्यातून प्रकर्षाने जाणवून येते. नवीन विषय साहित्यातून मांडले जातात. पारंपरिकता आणि आधुनिकता यांची सोस असलेले अनेक विषय साहित्यात आले. नवीन जीवनजाणिवा आणि सामाजिक वास्तवाच वेध लेखकांनी साहित्यातून घेतला. त्यातीलच एक महत्त्वाच्या लेखिका म्हणजे कविता महाजन.

प्रस्तुत प्रकरणात महानगरीय संकल्पना मांडून महानगरीय संस्कृती आणि महानगरीय समाज वास्तवाचा आढावा घेतला आहे. तसेच कविता महाजनांच्या 'भिन्न' व 'ब्र' कादंबरीतून दिसून येणाऱ्या महानगरीय जाणीवांचाही शोध घेण्यात आलेला आहे.

**२.१ 'महानगर' संकल्पना**

'ग्राम', 'नागर', व 'महानगर' या तिन्ही महत्त्वाच्या संकल्पना असून सांस्कृतीक वैशिष्ट्ये असलेल्या जीवनशैलीचे आणि लोकसमूहाचे वर्णन करतात. प्राचीनकाळापासूनच 'ग्राम' व 'नागर' या संज्ञा रूढ व परिचीत आहेत. प्राचीनकाळापासून व्यापार – उद्योगाचे ठिकाण म्हणून नगराना महत्वाचे स्थान होते. नगरांना धर्मसत्तेच आणि राजसत्तेच केंद्र म्हणून विशेष महत्व आहे. 'महानगर' ही आधुनिक काळातील संकल्पना आहे. 'नागर' ही संकल्पना औद्योगिक क्रांती, वैज्ञानिक प्रगती, तंत्रज्ञान आणि पाश्चात्य जगातील प्रबोधनामुळे अधिक वेगाने रूढ झालेली आहे. अत्यंत झपाट्याने नगरामध्ये वसाहती उभ्या राहिल्या एकूण त्याचे परिणाम मानवी मनावर, समाज व्यवस्थेवर झालेला दिसतो. ग्राम समाजव्यवस्थेत औद्योगीकरणाचा आणि तंत्रज्ञानाचा अभाव जाणवतो.

ज्या शहरामध्ये ४ मी. पेक्षा जास्त लोकसंख्या आहे त्या शहरांना मेट्रोपोलिटन असे म्हटले जाते. 'महानगर' ही संज्ञा विशेष करून मुंबईसाठी वापरली जाते. मुंबई हे शहर महानरीय जाणिवांचे केंद्रबिंदू आहे. मुंबईबरोबरच नाशिक, पुणे, नागपूर, कलकत्ता, हैद्राबाद, अहमदाबाद, ही शहरेही महानगराच्या दिशेने वाटचाल करताना दिसतात. महानगर हे व्यापार, उद्योग, तंत्रज्ञान, अर्थकरण, राजकारण याचे केंद्र आहे.

नगर व महानगरात रोजगाराच्या संधी सहज उपलब्ध होतात, तिथे व्यक्तिस्वातंत्र्याला वाव असतो. प्रतिष्ठा, परंपरा, रीतिरिवाज यांना तेवढे महत्व नसते. नागरी जीवनशैलीवर सिनेमा, जाहिराती, फॅशन यांचा प्रभाव असतो. इथे स्त्री- पुरुष दोघेही नोकरी करत असतात.

महानगरातून बहुभाषिक संस्कृति उदयास आली. शहरांची महानगरे बनत चालली आहे आणि इथूनच समस्या उद्भवू लागल्या. स्पर्धात्मक्ता वाढत गेली, सामजिक विषमता आली, पैशाला अधिक महत्त्व प्राप्त झाले, भौतिक सामाजिक व सांस्कृतीक जीवन बदलले, नैतिकतेच्या व्याख्या बदलल्या, भिन्न भिन्न संस्कृति निर्माण झाल्या. बदलत्या संस्कृतीबरोबर विकृतीचाही जन्म झाला. बदलती मूल्यकल्पना आणि समाज संकेतांना सामावून घेणारी ही संकल्पना आहे.

या उलट ग्राम समाजव्यवस्थेत लोकपरंपरेला, लोक रूढींना, घराण्याच्या प्रतिष्ठेला जास्त महत्व आहे. एकत्र कुटुंब पद्धती ही ग्रामीण संस्कृतीचा भाग आहे. ग्रामीण समाजजीवनात स्त्रीयांना नोकरी व्यवसायाच्या संधी नसतात तसेच स्त्री शिक्षणाला आणि उच्चशिक्षणाला ही तेवढा वाव नसतो. उत्पादनाची साधने मर्यादीत असल्याने आर्थिक स्तर साहजिकच खालावलेला असतो. ग्रामीण जीवनात मर्यादित लोकसंख्या असते, तसेच महानगरासारखी बहुभाषिक संस्कृति नसून बोली भाषेचा वापर इथे होत असतो. ग्रामीण जीवन हे मूल्यांशी, निसर्गाची नाते जपणारे आहे.

ग्रामीण व नागर या दोन समाजव्यवस्थेपेक्षा महानगरी समाज व्यवस्था वेगळी असते. १९९० नंतर झालेले जागतिकिकरण, खाजगीकरण आणि उदारीकरण यांचे पडसाद समाज जीवनावर मोठ्या प्रमाणात झाले.

## २.२ नव्वोदत्तरी कालखंड व महानगरीयकरणाची प्रक्रिया.

१९९० साली भारताने गॅट करारावर सही केली आणि 'खाऊजा' धोरण स्वीकारले. परदेशी कंपन्यांना गॅट करारानुसार भारतात उद्योग व्यापारास चालना मिळाली. बहुराष्ट्रीय कंपन्यांना भारताची बाजारपेठ खुली करण्यात आली.

१९९० नंतर जागतिकीकरण, खाजगीकरण, व उदारीकरणाचे वारे वाहू लागले होते. त्यामुळे रष्ट्रा राष्ट्रांमधील सीमारेषा धूसर झाल्या. औद्योगिकीकरणाचा विकास झपाट्याने होत होता. बहुराष्ट्रीय कंपन्यांचे पदार्पण भारतात झाले. औद्योगिकीकरणामुळे शहरांना आधुनिक जीवनशैलीचा स्पर्श झाला. नव्वदनंतरच्या काळात मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार झालेला. सामाजिक, सांस्कृतीक, राजकीय व आर्थिक परिवर्तनशीलतेचा व स्थित्यंतराचा हा काळ होता. भारताने या काळात अर्थव्यवस्थेच्या संदर्भात जे निर्णय घेतले त्याचे परिणाम त्या काळातील जनमानसात दिसू लागले.

शहरीकरणाला वेग आला, शहराच्या लोकसंख्येत प्रचंड वाढ झाली. उपजिविकेसाठी खेड्यातून लोक शहराकडे वळले. या काळात बरीच स्थित्यंतर झाली. एकाबाजूला शहरांमध्ये विकास होत होता, तर दुसऱ्या बाजूला अमाप लोकसंख्या झपाट्याने वाढत होती. शहरे महानगराच्या दिशेने वाटचाल करत होती. मुक्त अर्थव्यवस्थेमुळे विवीध गावातील प्रांतातील लोक महानगरांत आले. या मुक्त अर्थव्यवस्थेचे बरे वाईट परिणाम भारतीय समाजजीवनावर झालेले दिसतात. पोटापाण्याचा प्रश्न सुटावा म्हणुन खेड्यातील लोक शहराकडे वळले, लहान लहान शहर हळूहळू मोठी शहर होत गेली, शहरीकरणाला वेग आला. या शहरांचेंच महानगरात रूपांतर झाले. चार मिलियनपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांचा समावेश महानगरात केला जातो.

## २.३ महानगरीय समाज वास्तव व महानगरीय संस्कृती

स्वातंत्र्योत्तर काळात औद्योगिक क्रांती, वैज्ञानिक प्रगती आणि तंत्रज्ञान यांचा बराच विकास झाल्यामुळे शहरीकरणाला वेग आला. लोकसंख्या झपाट्याने वाढू लागली. नोकरी व्यवसायाच्या, उघोग व्यापाराच्या, उच्चशिक्षणाच्या प्रचंड संधी महानगरात निर्माण होत होत्या. जसे महानगरात मोठ मोठे उद्योगपती, भांडवलदार आले तसेच नोकरशाहीही आली. उपजीविकेचा प्रश्न सुटावा म्हणून गावाकडून अनेक पाय शहरांकडे वळले,

स्थित्यंतर झाली आणि महानगरात नव्या वसाहती निर्माण होत गेल्या. महानगरात संमिश्रपणा जाणवतो. एका नव्या जीवनशैलीचा स्वीकार करून हा समूह जगत असतो.

महानगरात संमिश्र भाषा, संस्कृती, विविध समजिक स्तर, भेद, असलेले लोकसमूहाचे लोक राहतात. उपजीविकेच्या, नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने विभिन्न प्रदेशातून एकत्र आले हे लोक असतात. महानगरात उपजीविकेच्या संध्या जरी सहज उपलब्ध होत असल्या तरी त्यांना रोज अनेक आव्हाने पेलावी लागतात. जगण्याच स्वातंत्र्य तर महानगरात मिळतच त्याबरोबर मानसिक ताण, दबाव सतत जाणवत असतो. अनेक मानसिक प्रश्नही निर्माण होत असतात आणि यातूनच कुठेतरी विकृती जन्म घेत असते.

महानगरातील जीवनात गतिमानता असते. प्रचंड धावपळीचं आयुष्य इथली माणसं जगत असतात. चढाओढ, स्पर्धात्मक्ता हा रोजच्या जगण्याचा भाग झालेला आहे. नितिमुल्यांचा ऱ्हास महानगरात सरासपणे होताना दिसतो. त्याचबरोबर जगण्यात व्यक्तिकेंद्रितता आलेली आहे, भोवताली माणसांची गर्दी असून एकटेपणाची जाणीव सारखी होत असते. इथल्या माणसांचे विश्व स्वतःपासून सुरू होत आणि स्वतःकडेच येवून थांबते. जागतिकीकरणाचे परिणाम झाल्याने इथली मुल्य व्यवस्था बदलली, संस्कृतीत व्यामिश्रता आली. स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला. जरी स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाची छाप जरी सोडत असल्या तरी दुसऱ्या बाजूला स्त्रीकडे वस्तू म्हणून बघण्याची भोगवादी वृत्ती अधिक प्रमाणत वाढत चाललेली दिसते. महानगरात वेश्याव्यवसाय उघडपणे चालतो. काही मुली स्वताच्या मर्जीने या व्यवसायात येतात तरी काहीजणांना फसवून इथे आणून सोडले जाते. लैंगिक अत्याचार, बलात्कार, खून , चोरी, दरोडा, गुंडगिरी, दहशतवात, असुरक्षितता याचं प्रमाण महानगरीय जीवनात अधिक प्रमाणात दिसते.

उदरनिर्वाहाचा प्रश्न सुटावा म्हणून लोकांचे लोंढे महानगराकडे येतात. प्रचंड वेगाचे शहर अशी महानगराची ओळखच झालेली आहे. पंचतारांकित संस्कृतीच्या झगमगाटाचे आकर्षण वाढू लागले, परिणामी लोकसंख्येत वाढ होवू लगली. महानगरात एकाबाजुला गगनचुंबी इमारती, पंचतारांकित हॉटेल्स, तसेच मूलभूत साधनसुविधा असेलाला नव मध्यमवर्ग आणि सुखवस्तू कुटुंबात जगणारा श्रीमंत वर्ग आहे. तर दुसऱ्या बाजूला झोपडपट्टीत, फुटपाथवर, पुलाखाली निवारा शोधणारी माणसेही महानगरांत आहेत. अश्या माणसांना कुठल्याही

साधनसुविधा मिळत नाहीत. एक एक दिवस जगण्यासाठीचा संघर्ष करावा लागतो. महानगरात जागेचा प्रश्न हा सगळ्यात मोठा प्रश्न आहे. महानगरात एकत्र कुटुंब पद्धतीचा अभाव असतो, सामुदायिक भावनेची संकुचीतता असते, आर्थिक विषमताही महानगरांत जाणवते. सामाजिक, आर्थिक, मानसिक असे अनेक प्रश्न येथे आहेत आणि हेच महानगरीय वास्तव अनेक लेखकांनी आपल्या साहित्यातून रेखाटले आहे.

महानगरातील मानवी जीवन विविधांगी आहे. भिन्न भिन्न संस्कृतीचे लोक महानगरात राहतात. वरीष्ठ ते कनिष्ठ अश्या वेगवेगळया स्तरातील माणसे या महानगरीय समाज व्यवस्थेचा भाग आहे. महानगरातील व्यक्ती स्वतःच अस्तित्व सिद्ध करण्यासाठी झटत असतात. माणसांचं जगणं अविरत चालणाऱ्या यंत्रणासारखं झालेल आहे. याचाच परिणाम माणसामाणसातील नाते संबंध विस्कटले जात आहेत. नात्यामध्ये ताणतणाव दिसून येतात. सामुदायिक भावनेचा अभाव जाणवतो. आधुनिकतेच आणि पारंपरिकतेच मिश्रण महानगरांत दिसते. महानगरीय जीवनात पैशाला फार महत्व प्राप्त आलेले आहे. जो तो अधिक पैसा कमावण्याच्या नादात चांगल्या वाईट मार्गाचा अवलंब करत असतो. महानगरामध्ये माणसामाणसा मधला भेद, मानसिक ताणतणाव, अमानुषता, चिंता, क्रौर्य, ढासळणारी नैतिक मूल्य हे महानगरीय वास्तवाचा भाग आहे.

## २.४ 'भिन्न' कादंबरीतून दिसून येणाऱ्या महानगरीय जाणिवा.

मराठी साहित्यक्षेत्रात १९९० नंतरचा कालखंड परिवर्तनाचा महत्वचा टप्पा आहे. जागतिकीकरण, अर्थिक उदारीकरण, आणि खाजगीकरणामुळे समाजात जी स्थित्यंतर घडू लागली, तसेच जे नवीन बदल होत गेले त्यांच्या परिणामांचे वास्तवरूपी स्वरूप कविता महाजनांनी आपल्या 'भिन्न' या कादंबरीतून मांडले आहे. कविता महाजनांनी 'भिन्न' या कादंबरीतून व्यापक असा विषय कवेत घेतला आहे. या कादंबरीला महानगरीय पार्श्वभुमी लाभलेली असली तरी ग्रामीण शहरी भागातील समस्यांचे चित्रण ही कादंबरी करते. अलीकडच्या काळात समाजात पारंपरिकता विरूद्ध आधुनिकता असा जो संघर्ष जाणवतो तो या कादंबरीतही दिसून येतो.

" धाव बाई धाव. पाच सदतीसची लोकल चुकू द्यायची नाही. चुकू देऊन चालणारच नाही. पुढचं सगळं वेळापत्रक विस्कटेल. परवडणार नाही ते. त्यापेक्षा धाव. या तीन लहान गल्ल्या पार कर, मग वळसा घाल, आयकर

भवनाला ओलांडून पुढे ये, भुयारी मार्गाच्या पायऱ्या उतर, झपझप पार कर भुयार, पायऱ्या चढ, बघ, चार नंबरच्या प्लेटफॉर्मवरच लागते ना गाडी नक्की, येईलच काही सेकंदात, इतक्यात धापा टाकू नको, ते सगळं गाडीत चढल्यावर, ती धडधड वळतेय बघ रुळांवर, पदर खोच, पर्स लटकव गळयाला, आलं लेडीज कंपार्टमेंट, मार उडी अचूक, वेग बदलू नको, झेपाव खिडकीकडे, दुसऱ्या दारातून येणाऱ्या बाईला अडखळू नको, बस."(पृ. ९)

उपरोक्त उदाहरणातून लेखिकेने महानगरीय जीवनातील कमवत्या स्त्रीची धावपळ अधोरेखित केली आहे. घड्याळाच्या काट्यासारख्या धावणाऱ्या त्यांच्या जिवनाचे दर्शन घडविले आहे. घरातलं सगळं आवरून बायकांची लोकल पकडण्याची घाई, मुंबईच्या लोकलमधील जीवघेणा प्रवास आणि या सगळ्यात त्यांची होणारी घुसमट लेखिका चीत्रित करते. लोकलच्या प्रवासात स्त्रीयांच्या मनातील कोंडलेली वाफ गप्पांमधून बाहेर पडते. रेल्वेमधील स्त्रीयांच्या डब्यातील त्यांच्या मनातील दबलेले भाव, चावट विनोद, चेष्टा यांच्या रूपातून प्रकट होते. मुंबईच्या लोकलमधे रोज लाखो प्रवासी प्रवास करत असतात, किड्या मुंग्यासारखी स्टेशनवर गर्दी असते, जागेसाठी भांडणे होत असतात. मुंबईत लोकलला लाईफ लाईन समजली जाते. मुंईकरांसाठी लोकल ट्रेन ही त्यांच्या जगण्याचा अविभाज्य भाग झालेली आहे.

रचीता ही मुंबईच्या एका क्लबमध्ये जीमइन्स्ट्रक्टर म्हणून काम करते, तिथे विविध जाती धर्माच्या स्त्रिया येतात. तर त्यात काही स्त्रिया अशाही असतात की ज्या आपला नवरा बाहेर कुठे जावू नये म्हणून बाह्य व्यक्तिमत्त्व खुलवणाऱ्या गोष्टी, व्यायाम, मेकप इत्यादी गोष्टी करत असतात. आंतरिक सौंदर्यापेक्षा शरिरनिष्ठ जगण्याला आलेले महत्व इथे लेखिका चित्रित करतात. जिममध्ये आलेल्या स्त्रियांच्या खुल्या मनोगतातून लेखिका व्यक्तिकेंद्रित जीवनव्यवस्थेसंदर्भात वेगाने बदललेल्या संस्कृतिक परिवर्तनाचे वर्णन करतात. आज दिखावू प्रतिष्ठा खुप महत्वाची वाटते, नैतिक मूल्ये आज नष्ट होत आहेत. या मूल्यांची जागा उपभोगवादी प्रवृत्तीने घेतली आहे. हे वास्तवदर्शी चित्रण कविता महाजन इथे मांडतात.

" परवा एक मस्त नवी साईड लाँच झालीय. खुल्ला ऑनलाईन डेटिंग करता येतं. मंग?" ( पृ. १०९) लेनीना आणि प्रतीक्षा यांच्या संवादातून बदललेली संस्कृती आणि मुल्यात्मक्ता ढासळलेली दिसून येते. माणसांच्या जगण्यात आलेल्या व्यक्तिकेंद्रितेमुळे माणसाला गर्दीतला एकांत जाणवतो आणि जीवनातील ही

पोकळी भरून काढण्यासाठी कामभावनेची इच्छा प्रबळ होते, आणि माणस या गरजा पूर्ण करण्यासाठी अनेक बऱ्या वाईट मार्गांचा अवलंब करतात. यातूनच वर्चुअल सेक्स, ऑनलाईन डेटिंगसारख्या संस्कृती महानगरात जन्माला आल्या.

" म्युझिकचा दणदणाट. लाल हिरवे निळे पिवळे प्रकाश वर्तुळ करत सरकत हरवत मीटत उघडत नाचत होते. थेकवर दोनच कपल्स होती. चार बिअर घेऊन कट्ट्याला टेकलो सारे, नाचणाऱ्या कपल्सची माप काढत." ( पृ. ११०) या प्रसंगातून मुंबईत नवं पाश्चात्य संस्कृतीचा झालेला स्वीकार दिसून येतो. मुंबईसारख्या शहरात औद्योगिक प्रगती जरी होत असली तरी मुलभूत सांस्कृतिक – नैतिक मूल्यांचा ऱ्हास होत आहे. डिस्को क्लब, बार, ड्रिंक्स, ऑनलाईन डेटिंग, मुक्त शारीरिक संबंध, या सगळयातून भोगवादी वृत्ती दिसून येते. चंगळवादी, भोगवादी वृत्तीला महानगरे खतपाणी घालतात. 'भिन्न' कादंबरीतून खाजगिकरणामुळे आलेली चंगळवादी वृत्ती, उदारीकरणामुळे बदललेले जीवनस्तर, तसेच जागतिकीकरणामुळे परदेशियांच बाजार व्यवस्थेत होणारे आक्रमण आशा सामाजिक घटनांचे चित्रण कविता महाजन करतात.

'भिन्न' कादंबरीतून महानगरातील तृतीयपंथी, लेस्बियन, होमो यांचेही जग लेखिकेने व्यापक अनुभवातून मांडलेले आहे. आज लैंगिक अस्तित्वाचा स्वीकार खुलेपणाने महानगरांत होताना दिसतो. उदाहरणार्थ " माझ्या फ्रेंडसर्कलमध्ये एक होमो कपल आहे. अगदी कुल आणि कम्फर्टेबल असतात ते आमच्यात आणि आम्ही त्यांच्यात. मजेत चेष्टामस्कऱ्याही चालतात. बिन लग्नाची सोबत राहणारी जोडपी आहेत, लग्न करून मुलं नकोत असा निर्णय घेतलेली जोडपी आहेत, लेस्बियनस आहेत... किती तऱ्हा!" ( पृ.३०६)

जून्यापिढीच्या आणि नव्या पिढीचा जीवनविषयक दृष्टिकोन पूर्णता वेगळा आहे. आजच्या पिढीला ज्या सुखाच्या कल्पना दिसतात तर त्याच कल्पना काही माणसांना विभत्सक वाटतात. ग्रामीण संस्कृतीच्या तुलनेत महानगरात डेटिंग संस्कृतीचा स्वीकार खुलेपणाने केला जातो. बार, बियर, पार्टी, क्लब हे त्यांच्या रोजच्या जगण्यातल्या गोष्टी आहेत. उदाहरणार्थ "मी म्हटलं, हो. आणि नव्यांचा प्लेझर आणि एन्जॉयमेंटच्या कल्पनादेखील जुन्यांना स्वीकारता येत नाहीत. जे नोकरीतल्या निष्ठेचं, ते स्त्री-पुरुष संबंधांमधल्या निष्ठेचं. प्रेमाच्या न् सेक्सच्या कल्पनाही बदलल्या आहेत. सेक्स म्हणजे मजेपुरती गुंतवणूक असते अनेकदा. तात्पुरती. प्रेम ही

गंभीरपणे करायची गोष्ट मानली जाते, पण त्याचा संबंध सेक्सशी जोडलाच जातोच अस नाही. आणि या उलट सेक्सचाही प्रेमाशी. प्रेम प्रेमाच्या जागी, सेक्स सेक्सच्या, लग्न लग्नाच्या, मैत्री मैत्रीच्या. त्या त्या गोष्टी, त्यातल्या अपेक्षा पूर्ण करणारी माणसं भेटली की केल्या जातात. त्यांची एकमेकांत गल्लत नाही केली जात “ ( पृ. ३०७) अशा विचारांचे समर्थन महानगरात दिसते. या मुळे आधुनिक नातेसंबंधातील ताणतणाव, वाढते विवाहबाह्य संबंध, मुक्त शरीर संबंध महानगरीय जीवनात सऱ्हासपणे दिसून येतात. तसेच माणसांचे वस्तुकरण झालेले दिसून येते. महानगरातील नातेसंबंधात भावनिक गुंतवणूक कमी आणि व्यावहारिकपणा जास्त दिसून येतो.

मानवी वाहतूक हा गंभीर प्रश्न महानगरांत भेडसावतो. एकप्रकारचे असुरक्षित वातावरण महानगरांत वाढत जाताना दिसते. “मानवी वाहतूक अनेक गोष्टींसाठी होते हो. आणि ती फक्त बायकांची नसते. त्यात पुरुष... लहान मुलंदेखील असतात. भीकमागण्यासाठी, वेठबिगारीसाठी, मानवी अवयवांचा व्यापार करण्यासाठी, विकृत खेळांसाठी त्यांना शारीरिक बळजबरी, फसवणूक, हिंसा आणि इतर लबाडीच्या मार्गाने स्थलांतरित केलं जातं.” (पृ. १५६) महानगरातील विदारक आणि वास्तवस्थीती लेखिका मांडतात. भौतिक सुखाच्या हव्यासापोटी कोणत्याही मार्गाने पैसे कमावण्यासाठी केलेली धडपड यातून समाजात असलेल्या मूल्यांच्या ऱ्हास होतो. आपल्या स्वार्थासाठी दुसऱ्या माणसाचाही जीव घ्यायला माणसे मागेपुढे बघत नाही.

“ बिनधास्त लिही रचिता... आणि बोलतही जा न घाबरता. अनेकांना तर जागाच नसतात बोलायलासुध्दा. अगं... समुपदेशकाकडे अनेक माणसं निव्वळ मोकळ बोलता यावं, म्हणून जातात; हे माझं एक निरीक्षण आहे.” ( पृ. २३०) या लेनिनाच्या आणि रचीताच्या संवादातून महानगरांतील एकटेपणाचा अनुभव येतो. इथली माणस गर्दीतील एकटेपणा अनुभवतात, आजूबाजूला इतकी माणसे असूनही साध बोलायला या माणसांकडे वेळ नसतो. महानगरात माणसांचेच यंत्रिकरण झालेले आहे. ही माणसे जितकी वरवरन उत्साही दिसत असतात तितकीच आतून ती कोसळत असतात. सामान्य मध्यमवर्गीय माणूस आपल मध्यमवर्गीय जीवन टिकविण्यास सतत धडपडत असतो. महानगरात लाखो संख्येने लोकांचे लोंढे येतात त्यामूळे स्पर्धात्मकता वाढते, पोटापाण्याचा प्रश्न सुटावा म्हणून चोरी, दरोडा, वेश्यां व्यवसायाकडे लोक वळतात. महानगरात प्रचंड गर्दी आहे पण त्या गर्दीला ओळखीचा चेहरा नाही. महानगरात एकटेपणा आहे, जगण्यातील निरर्थकता, निराशा आणि उदासिनताही आहे. त्यामूळे महानगरांत दिवसेंदिवस डिप्रेशनचे रुग्ण वाढत आहेत.

" नेटवर ढिगानं पोरं भेटतात, पण त्या चिवळ्याना सगळं शिकवत बसावं लागतं. हे कोण करणार उपद्व्याप ? त्यापेक्षा जिगोलो बरे अशावेळी, असं वाटलं. पैसा टाकला की काम झालं." ( पृ. ३४६) महानारातील पुरुषवेश्याचही चित्रण आलेले आहे. आपली लैंगिक इच्छा शमविण्यासाठी स्त्रियाही अनैतिक मार्गाचे अवलंबन करताना दिसतात. लेनीना आणि जिगोलोच्या संवादातून अनेक गोष्टी उलगडत जातात. " महिन्याला किती बायकांना भेटतोस? मी विचारलं. निदान अठरा ते वीस." "सगळया वयाच्या बायका असतात. अगदी कॉलेजमधल्या मुलीही असतात... त्यांना अनुभव घेवून बघायची उत्सुकता असते." ( पृ. ३४९). उपरोक्त उदाहरणातून मूल्य भ्रष्टता दिसते. आजची तरुण पिढी लैंगिक वासनेचीशिकार झालेली आहे.

'भिन्न' कादंबरीतून लेखिका महानगरीय स्त्रियांचे एडाग्रस्तविषयीचे आणि लैंगिक जीवनासंबंधीचे अनुभव मांडते. तसेच कामाठीपुरासारख्या रेड लाईट एरियेच चित्रण आलेलं आहे. महानगरातील वैश्याव्यवसायचे दाहक वास्तव कविता महाजन मांडतात. माणसांची वाढत चाललेली भोगवादी वृत्ती, बदललेली नैतिक मूल्ये, स्त्रीला वस्तू म्हणून बघण्याचा दृष्टिकोन, आधुनिक नातेसंबंधातील वाढते संघर्ष, पंचतारांकीत हॉटेल आणि क्लब संस्कृती, व्यसनाधीन गेलेली माणस, मानसिक ताण, जुन्या आणि नव्या पिढीतील विचारांचे संघर्ष त्यामुळे ढासळती कुटुंबव्यवस्था, नव्या पिढीचे जीवनविषयक बदललेले तत्त्वज्ञान, स्त्री – पुरुष संबंध, वाढती व्यभिचारी वृत्ती, विवाहबाह्य संबंध, लैंगिक इच्छापूर्ण करण्यासाठी वाट्टेल त्या थराला जाणे, लैंगिक इच्छा शमावण्याशी जिगोलोचा वापर, लहान मुलांचे लैंगीक शोषण, तृतीपंथीयांचे जीवन, आत्मकेंद्रीतता, एकटेपणा या बदलत्या जाणिवा आपल्याला महानगरीय जीवनामध्ये दिसून येतात.

या कादंबरीतील मुख्य पात्रे रचीता, लेनिना, प्रतीक्षा यांचे भावविश्व महानगरीय आहे. एडसग्रस्ता स्त्रियांना मदत करणाऱ्या संस्थेत त्या काम करत असतात त्यामुळे महानगरातील विविध स्तरातील जीवनानुभव त्यांनी घेतलेला असतो. या कादंबरीत लेखिकेने बकाल स्थितीतील झोपडपट्टी ते सुखलोलुप फ्लॅट संस्कृतीचे दर्शन घडवले आहे. तसेच पात्रांच्या मुखी संमिश्र भाषा ही आलेली आहे. गतिमानता हा महानगरीय जीवनाचा भाग झालेली आहे आणि या प्रचंड वेगामुळे जगण्यातील स्पर्धात्मकता ही वाढलेली आहे. त्याचबरोबर संस्कृती लोप पावते आहे आणि विकृती दिवसेंदिवस वाढतच चालली आहे याचा प्रत्यय या कादंबरीतून येतो. 'भिन्न' कादंबरीतून महानगरातील संमिश्र भाषा संस्कृती दिसते. तसेच समाजातील विविध स्तरातील लोकांचे चित्रणही इथे

लेखिका करतात. लेखिकेने  कादंबरीत महानगरातील वेगवेगळ्या उपसंस्कृतीचे दर्शन घडवून कादंबरीला बहुस्तरीयता प्राप्त करून दिलेली आहे.

**२.४.१ महानगरातील एड्सचा प्रश्न**

कविता महाजनांनी 'भिन्न' कादंबरीतून महानगरातील एड्सग्रस्तांचा विषय व्यापक्तेने मांडलेला आहे. एचआयव्ही एड्स हा महानगरातील गंभीर आजार आहे ज्याची संख्या दिवसेंदवस वाढतच जात आहे. जन्माला आलेल्या मुलापासून ते वयस्कर माणसापर्यंत या आजाराचे रुग्ण आहेत. आणि विशेषकरुन पुरुषांपेक्षा स्त्रियांना एड्स होण्याची शक्यता अधिक असते. वेश्यव्यवसाय करणाऱ्या अनेक बायकांना या रोगाची लागणं झालेली असते त्याचबरोबर अनेक बायकांना त्यांच्या नवऱ्यामुळे हा आजार होतो यात खुद्द रचिता शिर्के या कादंबरीची नायिका आहे. तीला तिच्या नवऱ्यामुळें एड्स होतो. तिला नोकरीवरून काढण्यात येते. सोसायटीत तिची बदनामी होते, अमानुष वागणूक तिला दिली जाते.

महानगरात एड्स ग्रस्तांची संख्या अधिक आहे, झोपडपट्टी ते उच्चभ्रू सुखवस्तूत लोळणाऱ्या अनेकांचा यात समावेश आहे. देह विक्रि करताना काँडमचा वापर करत नसल्याने अनेक समस्या उद्भवतात. आणि अशा एडसग्रस्त माणसांना उपचारही नीट मिळत नाहीत. शारीरिक त्रास तर असतोच पण त्याच बरोबर मानसिक त्रासही होतो. एड्स ग्रस्तांना समाज वाईट नजरेने पाहतो, तुच्छतेची वागणुक देतो, समजाबरोबरीने घरचेही वाईट वागणुक देतात. अनेकांना घरच्याबहेरही काढल जाते. त्याचबरोबर ती व्यक्ती जर नोकरी करणारी असली तर तीला नोकरीवरून काढल जाते. उदाहरणार्थ " एच. आय. व्ही. टेस्ट पॉझिटिव्ह आली. मग नोकरीतून काढलं. त्यानंतर सोलापूरला लॉजवर जायला लागले धंदा करायला. तिथंही पोलिसांचा त्रास सुरू झाला. कितीवेळा तुरुंगात गेले. तुरुंगातही पोलीसांखाली झोपायला लागायचं... कधी साहेबांच्या घरी जावं लागायचं... मग पुण्याला आले गणपतीच्या दिवसांत... नंतर तिथून मुंबईला... आवडत नाही मला हे करायला... घाण वाटत खूप... म्हणून दारू पिते... त्याशिवाय गिऱ्हाईक घेताच येत नाही मला... इलाज नाही... घरी पैसे पाठवावे लागतात... ती संथपणे सांगत होती. डोळे निर्विकार." ( पृ. ३७५) या लेनिना आणि सुमनच्या संवादातून एडाग्रस्तांच समाजातील स्थान

अधोरेखित केले आहे. एड्स संदर्भातील अनेक गैरसमज पसरलेले आहेत एकत्र काम केल्याने किंवा नुसत्या स्पर्शातून एड्सचा संसर्ग होत नसतो तर त्याला अनेक कारणे आहेत.  अनेकदा रुग्ण स्वतः एड्सला जबाबदार नसतो, तर अनेकवेळा दुसऱ्याच्या चुकीमुळेसुध्दा या विषाणूचा संसर्ग होत असतो. सुमन ही एम्. एससी मायक्रोबायोलॉजी पर्यंत शिकलेली आहे. एड्स झाल्यानंतर तिचे स्वतःचे आईवडील तिला  या धंद्यात ढकलतात कारण काय तर लहान दोन भावांची शिक्षणं पुर्ण व्हावी आणि तीलामात्र घरात स्थान नसत तिच्याकडे फक्त पैशांपुरता संबंध ठेवला जातो. आणि सुमान एच आय व्ही पॉझिटिव्ह असल्यकारणाने तिचाशी संबंध येत असलेल्या अनेकांना एड्सची लागण होते.

एडसग्रस्त माणसांना खुप भयानक अशी वागणूक दिली जाते. जर आईबरोबर मुलंही पॉझिटिव्ह असेल तर मुलाच काही बर वाईट करण्यात येते नाहीतर असच कचराकुंडीत फेकले जाते. महानगरात एड्सग्रस्तांची संख्या अधिक प्रमाणत आहेत यात फक्त वेश्याच नाही तर उच्चशिक्षित लोकांचा, तृतीयपंथीयांचा, गृहिणीचाही मोठया संख्येने सामावेश आहे. महानगरातील वाढत्या एच. आय. व्हीं एड्स रुग्णामुळे त्या माणसावरच नाही तर सामाजिक, सांस्कृतीक व नैतिक अंगावरही याचे परीणाम झालेले दिसतात. एड्सच्या समस्यांचा संबंध समाजातील मूल्यात्मकतेशी जोडलेला आहे. महानगरीय स्त्रियांचा विनाशाकडे होणारा प्रवास लेखिकेने दर्शविलेला आहे.

### २.४.२ महानगरांतील वेश्याव्यवसाय

कविता महाजनांनी 'भिन्न' कादंबरीतून वेश्याव्यवसायचे विस्तृत असे चित्रण केलेले आहे. अनेक सामाजिक आर्थिक परिस्थीती वेश्याव्यवसायाला कारणीभूत ठरते. महानगरात या व्यवसायात उच्चशिक्षित तसेच अशिक्षीत स्त्रियांचा सहभाग आहे. असुरक्षित वातावरणातही माणसे वावरत असतात. पोटापाण्याचा प्रश्न सुटावा म्हणून अनेक स्त्रिया हे काम स्वीकारतात. तर काहींना घर चालावं म्हणुन त्यांचे नवरेच आणून इथे सोडतात आणि नंतर घेवून जातात एवढी विदारक स्थिती महानगरांत आहे. तर काहींना फसवून या व्यवसायात आणून सोडले जाते तर काहीं 'ईझी मनी' च्या ओढीतून या व्यवसायात वळलेली असतात.

" तोवर ती नेपाळी समोर येऊन बसलेली. इथल्या बहुसंख्य मुलीप्रमाणे हिलाही कोवळया वयात पळवून आणल होतं. इथ मुंबईत आणुन विकलं. बरीच वर्षं धंधा करतेय." (पृ. ६७) या नेपाळी मुलीप्रमाणेच असंख्य मुली या कमाठीपुरात आलेल्या आहेत. या वेगवेगळया भागातील, प्रदेशातील मुली आहेत.

" आषाढीपासून फील्डवर उतरायचं ठरवलं. आषाढी, कार्तिकी, माघी, चैती अशा चार वाऱ्या होतात. प्रत्येकवेळी साधारण दोन लाख वारकरी येतात. या सुमारास इथं धंधा करायला बाहेरगावाहून पुष्कळ मुली येत असतात. पुण्यातून येतात, सांगलीहून खुप येतात. नगरहूनही येतात. नंतर याच्या उलटही होतं. म्हणजे गणेशोत्सवात इथल्या पुष्कळ मुली पुण्याला जातात." ( पृ. ८१). उपरोक्त उदाहरणातून कविता महाजनांनी सभ्यतेचे मुखवटे ओढून काढून माणसाच्या आत दडलेल्या विकृतीचे चित्रण केले आहे. वारी, गणेशोत्सवानिमित्त वेश्यां जास्त लागतात, आपली वासना शमविण्यासाठी अनेक माणसे वेश्यावस्तीत जातात. एकिकडे देव देव करायचे, धर्मकांडे करायची आणि दुसऱ्या बाजूला स्त्रियांचा उपभोग घ्यायचा. सभ्यतेच्या मुखवट्याआड दडलेली वासानावृत्ती लेखिका इथे चित्रीत करतात. माणसांच्या जीवनात पोकळी निर्माण झाली की अनेक लैंगिक विकृत्या जन्माला येतात.

स्त्रियांचा भोगवस्तू सारखा वापर तर होतच असतो. शिवाय जन्माला आलेल्या मुलीपासून ते वयस्कर बाईपर्यंत कोणीही सुरक्षित नाहीत, अत्याचारांचे प्रमाण वाढतच चालले आहे. लैंगीक इच्छा शमविण्यासाठी त्यांचा वापार केला जातो. या रेड लाईट एरियाच्या मुलांसाठी शिक्षणाची सोय नाही. त्यात जर लहान मुली असल्या तर त्यांचं लैंगीक शोषण केलं जात. या वेश्याचं शोषण करणाऱ्यांमध्ये गिऱ्हाईक, दलाल, धगड, भडवे, घरवाले आणि पोलिस असतात. पोलिससुध्दा तुरुंगात डांबून त्यांचा फायदा घेवून नंतर काम करतात. त्याशिवाय एड्स सारखा आजार आणि गुप्त रोगांची लागण त्यांना होत असते. अत्यंत दाहक अश्या वातावरणात त्या जगत असतात. महानगरात एड्ससारखा आजार खूप जलद गतीने पसरतो. महानगरात वेश्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होतो, जोपर्यंत त्याचं शरीर सुदृढ आहे तो पर्यंत त्यांना किंमत आहे त्यांच्या आयुष्याचच वस्तुकिकरण झालेले आहे.

### २.५ कविता महाजनांच्या 'ब्र' कादंबरीतून दिसून येणाऱ्या महानगरीय जाणिवा.

कविता महाजन यांच्या 'ब्र' कादंबरीतून खेड्यापाड्यातील तसेच मुंबईसारख्या महानगराचे चित्रण आलेले आहे. प्रफुल्ला ही या कादंबरीची केंद्रबिंदू आहे. तिच्या माध्यमातून लेखिकेने महानगरीय जीवन जाणिवांना उजाळा दिलेला आहे. महानगरातील लोकलच्या प्रवासात आलेले अनुभव, फ्लॅट संस्कृती, नाते संबंधातील ताणतणाव, व्यभिचार, स्त्रीकडे पाहण्याचा उपभोगवादी दृष्टीकोन, नैतिक मूल्यांची घसरण, मानसिक ताण इत्यादी अनेक विषय आलेले आहेत.

महानगरीय जीवनात असलेली गतिमानता आणि त्यामुळे माणसाच्या जगण्याला आलेला प्रचंड वेग, त्यामुळे येणारे मानसिक दडपण आणि त्यातून उद्भवणाऱ्या अनेक प्रश्नाचं चित्रण ही कादंबरी करते. महानगरीय जीवनात जरी व्यक्ती स्वातंत्र्याला अधिक वाव असला तरी माणूस म्हणून होणारी त्यांची वाढ दिवसेंदिवस घटतच असते. प्रफुल्ला ही या कादंबरीची नायिका घटस्फोटित असते. घटस्फोटासारखा विषय महानगरात काही नवीन नाही. विवाहबाह्य संबंध महानगरात अधिक प्रमाणात दिसून येतात आणि या सगळ्यातून जाताना एका स्त्रीचा होणारा मानसीक कोंडमारा आपल्याला दिसून येतो. या आधुनिक नातेसंबंधांचा स्वीकार करत असताना प्रफुल्लाच्या माध्यमातून महानगरांतील अनेक स्त्रियांचा संघर्ष इथे लेखिका मांडतात. हा संघर्ष पारंपरिकते विरूद्ध आधुनिकता असा आहे. आपण ज्या भागात राहतो, जिथे आपण लहानाचे मोठे होतो तिथल्या संस्कृतीचे, विचारसरणीचे आपल्या जडणघडणीवर परिणाम होत असतात आणि इथूनच नव्या मूल्यांचा स्वीकार कराताना विचारांचा संघर्ष जाणवतो.

तिचा नवरा तिला घटस्फोट देवून अंजली नावाच्या बाईशी लग्न करतो. खरतर लग्नापूर्वीच त्याचे अंजलिकडे येणेजाणे होते. आपली बायको ही आपली खाजगी मालमत्ता आहे आपण तिला कशीही वापरू शकतो, तिला तुच्छ वागणूक देणे, तिचा मानसिक शारीरिक छळ करणे ही मानसिकता अजूनही पुरुषांची आहे. ही मानसिकता फक्त ग्रामीण भागातच दिसून येत नाही तर उच्चशिक्षित लोकात, महानगरातसुध्दा दिसून येते.

" नवऱ्याला नको होतं. परवडत नाही शहरात जास्त मुलं. आजकाल काही लोक तर एकही नको म्हणतात." या उपरोक्त उदाहरणातून महानगरात वाढत्या महागाईमुळे, बदलत्या राहणीमानामुळे मुले परवडत नाही. मुले म्हंटले की भावनिक गुंतवणूक व जबाबदारी आली. हिच जबाबदारी महानगरांत जीवन जगत असताना

होणाऱ्या ओढताणीमुळे नको असते. तशीच महानगरातील आर्थिक अस्थिरता दिसून येते. महानगरातील जीवन हे जरी झगमगटान व्यापलेले असले तरी तेथील लोक हे बऱ्याच प्रमाणात मध्यमवर्गीय जीवन जगत असल्याने पोटाची खळगी भागवणे ही जशी ग्राम जीवनातील समस्या आहे त्याचप्रमाणे ती महानगरातली ही आहे.

महानगरीय जीवनात मध्यमवर्गाचे उच्चवर्गीयांकडे सरकरण्याचा अतोनात प्रयत्न दिसतो. सुखलोलुप जीवन जगण्याची घडपड दिसते. प्रफुल्लाला एक मुलगा असतो तिचा नवरा तिला आणखी मूल होवू देत नाही, तिला अबॉर्शन देखील कराव लागल हे महानगरीय जीवनाच वास्तव आहे. लेखिकेने प्रफूल्लाच्या माध्यमातून महानगरीय वास्तव रेखाटले आहे.

‘ ब्र’ कादंबरीतून महनगरीय जीवनात व्यक्तिकेंद्रितेमुळे निर्माण झालेली पोकळी दिसून येते, आणि ही पोकळी भरून काढण्यासाठी ही माणसं स्वतःला कामामध्ये एवढं झोकून घेतात की दुसरा कसला विचारच करायला त्यांना वेळ नको असतो. यंत्रासारखी ही माणसे वावरत असतात. यात खुद्द कादंबरीची नायिका ‘प्रफुल्ला’ आहे. विस्कटलेल्या नातेसंबंधांमुळे जीवनात आलेली निराशा आणि त्यांची होणारी मानसीक कोंडी दिसते. अनेक वेळा सत्य माहीत असून स्वीकारण्याची मनाची तयारी नसते यामुळे पळवाटा ही माणस शोधत असतात.

प्रफुल्लाचा मुलगा तिच्या नवऱ्या सोबत राहतो आणि कितीतरी वर्षांनी अभ्यासाला निवांत वेळ मिळावा म्हणून मुंबईत प्रफुल्लाकडे येतो, आईची माया आहे म्हणून नाही तर त्याची सोय व्यवस्थित व्हावी उलट तीच्याकडे पैशांची भाषा करतो. “ मम्मी, बी प्रॅक्टिकल... तुझ्यासोबत राहून काय करू? व्हॉट इज द युज? काय उपयोग आहे मला तुझा? आणि शेवटी कुठेही राहिलो, तरी पैसे तर डॅडीज देणार ना? फालतू इमोशनल होऊ नकोस. उगाच नाही डॅडी तुला सोडून अंजली आंटीकडे गेले... हाऊ बोअर यु आर... ती कितीतरी बरी आहे तुझ्यापेक्षा. तुझ्यासारखे मूर्ख प्रश्न विचारत बसत नाही. शंभर जागी अडवत नाही. आम्हाला काय हवं असतं ते तिला त्या त्या वेळी नेमकं समजतं, सांगावं न लागता.” ( पृ. ६४) या उदाहरणावरून नात्यामध्ये आलेली व्यवहारता दिसून येते. माणसांची वृत्ती बदलत चाललेली आहे, आणि माणसामधल्या असंवेदनशील वृत्तीतही वाढ होत आहे. आधुनिक जीवन जगत असताना आई मुलांच्या तसेच इतर नातेसंबंधविषयीचा बदलेला दृष्टिकोन दिसून

येतो, ज्याच्याकडे अधिक पैसा त्याला अधिक किंमत दिली जाते. ग्रामीण भागातील घरामधून दिसणारी सुसंकृत सहकार्याची वृत्ती, आदरभाव, आपुलकी, विश्वास, आनंद, प्रेम, सहज उत्कटतेने शहरातल्या घरात कुठेतरी अभावानेच आढळते, शहरातली घरे, फ्लॅट ही केवळ एक सोय असते काही काळापूर्ती केलेली.

प्रफुल्ला, सुमित्रा, रेवती ही पात्रे मानसिक ताणातून जात असतात. रेवती तर स्वावलंबी असते, घर सांभाळते, नोकरी करते पण तिच्या नवऱ्याची पैश्याची हाव काही कमी होत नाही सतत पैशा मागे धावणे आणि या पैशांच्या हव्यासापोटी आपली माणसं आपल्यापासून किती दूर जातात याची साधी जाणीवही त्याला होत नाही. माणसांची पैशांची भुक सतत वाढत जाते, महानगरांतील एक दाहक वास्तव म्हणजे इथे भावनांना किमंत राहत नाही, जो तो आपलाच विचार करत असताना दिसतो. माणसामध्ये एक संकुचीतपणा आलेला दिसतो.

हेच सुमित्राच्या बाबतीत दिसून येते पैशावरून सतत वाद होत असतात, सुमित्राने आंतरजातीय प्रेमविवाह केल्याने तिची घरची मंडळी तिला दुरावलेली, तिला एक मुलगा होता त्याच्या भवितव्यासाठी ती हे नात निभावत होती. तिचा नवरा व्यभिचारी होता. बाहेर अनेक बायकांसोबत त्याचे शारीरिक संबंध होते. घरी सुध्दा त्याला मुलींचे फोन यायचे. महानगरात मूल्यव्यवस्था ढासळताना दिसते. विवाह बाह्य संबंध, स्त्रीकडे बघण्याचा उपभोगवादि दृष्टिकोन, नातेसंबंधातील वाढते तणाव हे महानगरातील रोजचे प्रश्न आहे. या सगळयातून आयुष्याला एक निरर्थकता येते. काही माणसं या परिस्थितीतून स्वतःला गोळा करून कणखर बनत असतात तर काही आतुन खचत जातात.

सुमित्राच्या वाट्याला जे आयुष्य आले त्यातून तिच्या आयुष्याला अर्थहिंनता आली. ती स्वतःवरचा आत्मविश्वासच गमावून बसली, एक प्रकारची पोकळी आयुष्यात निर्माण झाली. सुरवातीला नवऱ्याबरोबर समुपदेशकाकडे गेली पण नात्यातील गुंता दिवसेनदिवस वाढतच गेला. सूमित्राने एवढ मानसिक ताण घेतले की तिची तब्येतही दिवसेंदिवस बिघडायला लागली. नैराश्या तिच्या भोवती दिवसेन दिवस वाढत जायची. मानसोपचार तज्ज्ञांकडे तिला नेण्यात आले पण तिने एकही औषध घेतले नाही. जगण्याची इच्छाच तिची नाहीशी झालेली आणि शेवटी ती रेल्वेखाली येवून आत्महत्या करते. महानगरात एवढी माणसे असतात, सतत गर्दीत

वावरत असतात पण एकटेपणाची भावना कायम मनात सलत राहते. काही माणसे तर या नैराश्याच्या फेऱ्यात अडकून चक्क वेडी होतात.

महानगरात एकत्र कुटुंब पद्धतीचा अभाव असतो, आईवडील मुलांना पाळणाघरात सोडून कामाला जातात. खुप धकाधुकीच जीवन एकंदर महानगरात अनुभवत असतो. दिवसभर कामाच्या व्यापात तिथल्या स्पर्धेला, कटकटीला सामोर जायचं, नंतर लोकलमध्ये गर्दीत लोंबकळत प्रवास करायचा नंतर घराची आवराआवर स्वयंपाक यातच दिवस संपतो. या कादंबरीत फ्लॅट संस्कृतीचे दर्शन आलेलं आहे. मध्यमवर्गीय जिवनाचे दर्शन यातून आपल्याला घडत. वाढती  चंगळवादी वृत्ती, माणसांची असंवेदनशील वृत्ती आपल्याला दिसून येते.

### २.५.१ महानगरातील आधुनिक जीवनातील संघर्ष

कविता महाजनांनी ‘ब्र’ कादंबरीतून ग्रामीण आदिवासी भागाबरोबरच महानगरीय जीवनाचे चित्रण केले आहे. आधुनिकीकरण, यांत्रिकीकरण झाल्याने महानगरात माणसाला वस्तूचे स्वरूप आलेले आहे. स्पर्धात्मकता वाढत आहे, आणि जो तो जास्त पैसे कमावण्याच्या मागे लागतो. आणि हेच महानगरतील प्रखर वास्तव कविता महाजन मांडतात. ‘ ब्र’ कादंबरीतील प्रफुल्ला, सुमित्रा, रेवती ही पात्रे मानसिक ताणातून जात असतात. मानसिक दृष्ट्या खचलेली ही माणसे आहेत. ज्यांना व्यक्त व्हायचय, आपल्या माणसांची त्यांना गरज आहे, ही माणसं भावनिक मानसिक आधार शोधताना दिसतात. गर्दीतला एकटेपणा त्यांना जाणवतो. अवती भवती खुप माणस आहेत. पण आपल म्हण्यासारख कुणीच नाही.

मानसिक ताण, नैराश्या या महानगरातील गंभीर समस्या आहेत. स्वतःचाच स्वतःशी चाललेला हा संघर्ष आहे. पैशांना आलेल्या अती महत्वामुळे नातेसंबंधात अनेक प्रश्न निर्माण होतात, तणावग्रस्त आयुष्य वाट्याला येते त्याचबरोबर विवाहबाह्य संबंधही असतात. चंगळवादी वृत्ती वाढत जात आहे. ‘ ब्र’ कादंबरीतील शहरी भागातील पात्रे मध्यमवर्गीय कुटुंबातील आहे. ज्यांच्यापुढ्यात आर्थिक प्रश्न तर आहेच त्यासोबत मानसिक प्रश्नही अधिक आहेत. या पात्रांची मनस्थिती खचली गेलेली आहे, हे महानगरीय जीवन जगत असताना त्यांची घुसमट

होत आहे, भावनांचा कोंडमारा झालेला आहे. चेहऱ्यावर आनंदी मुखवटा लावून दुटप्पी आयुष्य ही माणसं जगत असतात. आत्मकेंद्रिपणा, स्वार्थिवृती, असंवेदनशीलता महानगरांत वाढत चालली आहे.

महानगरात नातेसंबंध जागतिकीकरणाने धूसर झाल्याचे दिसून येतात. पूर्वी नाती टिकून ठेवली जात होती पण आज आपल्या स्वार्थापोटी नातेसंबंध उधळून लावले जातात, आपल्या स्वार्थासाठी इतरांना दुखावले जाते. जागतिकीकरणाने उध्वस्त केलेल्या नातेसंबंधाचे एक प्रतिबिंब या कादंबरीतून दिसून येते.

महानगरात नैतिक मूल्य हरवली जात आहे, प्रफुल्लाचा मुलगा तिच्याकडे पैशांची भाषा बोलतो, हे आधुनिक नाते संबंधातील प्रश्न आहेत जिथे आई आणि मुलाच नात अतूट मानल जात होत त्यात नात्यांना व्यवहाराचा स्वरूप आलेलं आहे. जर आपल्याला फायदा असेल तर ती गोष्ट आपण करतो. इथे भावनांना महत्व नाही. आज तंत्रज्ञानामुळे माणसे जवळ आलेली आहे पण मनाने तेवढीच दूर गेलेली आहेत. तसेच सुमीत्राच्या बाबतीत सुमेध वागतो, आपली बायको मानसिक तणावातून जात आहे याची कल्पना असूनही तो तिच्याशी बोलून तीच मन हलक करण्याचं प्रयत्न करत नाही. उलट तिच्याकडे लक्षच देत नाही. जेव्हा ती आत्महत्या करते तेव्हाही बातमी कळताच आपण कसा या गोत्यात अडकणार नाही याचीच काळजी त्याला जास्त असते. शेवटी तो तिला वेडी ठरवून मोकळी होतो.

महानगरात माणसांच्या जिवनाला आलेल्या यांत्रिकी स्वरूपामुळे माणूस भावनाशून्य बनत चालला आहे. माणसाच्या आयुष्याला निर्विकारता प्राप्त झालेली आहे. या जीवनप्रवासात तो स्वतःला हरवून बसतो. माणसांची असंतुष्टित वृत्ती वाढत चालली आहे.

समारोप

१९९० नंतर जी परिवर्तने झाली त्याचे पडसाद साहित्यक्षेत्रातही उमटले. सगळीकडे जागतिकीकरणाचे वारे वाहू लागले. खाऊजा धोरणाचा स्वीकार झाला. खुल्या अर्थव्यवस्थेचे परिणाम समाजमनावर झाले. खेड्यापाड्यातील लोक शहराकडे वळले. याच काळात बरीच स्थित्यंतर झाली. या सगळ्या प्रक्रियेत खेड्यांचा शहरांकडे आणि शहरांचा महानगरांकडे विकास सुरू झाला. महानगरात लोकसंख्या प्रचंड वेगाने वाढत गेली.

वैज्ञानिक प्रगती आणि तंत्रज्ञानामुळे महानगराचा जसा विकास होत होता तसाच त्याचा अधोगतीकडेही प्रवास होत होता. महानगरात गर्दी, स्पर्धा, एकटेपणा, गतिमानता यांना महत्त्व आले आणि याचेच वास्तविक दर्शन घडवणारे लेखन कविता महाजनांनी ‘भिन्न’ आणि ‘ब्र’ कादंबरीतून केले आहे. व्यक्ती आणि समाजावर झालेले महानगरीय जीवनाचे पडसाद त्यांच्या या कादंबरीतून दिसून येतात. कविता महाजन यांच्या ‘भिन्न’ व ‘ब्र’ कादंबरीतून महानगरांतील वर्तमानकालीन वास्तव रेखाटले आहे.

निष्कर्श

1. १९९० नंतर झालेल्या मुक्त अर्थव्यवस्थेमुळे सामाजिक, सांस्कृतीक, आर्थिक, आणि राजकीय स्वरूपातही बदल झाले तसेच याच काळात बरीच स्थित्यंतर झाली.
2. जागतिकीकरण, औद्योगिकीकरण आणि खाजगीकरणाचे पडसाद जसे समाजमनावर झाले तसे ते साहित्यक्षेत्रातही झाले.
3. १९९० नंतरच्या काळात शहरीकरणाला वेग आला, आणि याच प्रभावातून महनगरियकरणाच्या प्रक्रियेला सुरुवात झाली.
4. महानगर हे उद्योग व्यवसायाचे, रोजगाराचे तसेच वैज्ञानिक प्रगती आणि तंत्रज्ञानाचे केंद्रबिंदू आहे.
5. महानगरीय जीवनात असुरक्षितता, व्यामिश्रता, मूल्यभ्रष्टता, भयग्रस्तता, व्यक्तीकेंद्रितता जाणवते.
6. कविता महाजनांनी ‘भिन्न’ कादंबरीतून व्यापक अस महानगरीय सामजिक वास्तवतेच दाहक रूप मांडलेल आहे.
7. ‘भिन्न’ कादंबरीतून महानगरांतील लैंगिक व्यवहाराचे भीषण स्वरुप लेखिका मांडतात.
8. महानगरातील एड्ससारखा विषय कविता महाजन ‘भिन्न’ कादंबरीतून मांडतात.
9. कविता महाजनांनी ‘ब्र’ कादंबरीतून महानगरीय संवेदना व्यक्त झालेल्या आहे. महानगरात गर्दीतला एकटेपणा आणि त्यातून येणारी नैरश्या यावर त्या भाष्य करतात.

10. 'ब्र' कादंबरीत लेखिकेने महानगरातील धकाधुकीच्या जीवनामुळे माणसाला आलेला मानसिक ताण आणि बदलत्या आधुनिक संबंधांचा आढावा घेतला आहे.

**संदर्भ सूची**


1. संपा. खोले, विलास. "गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी." लोक वाङ्मयगृह, २००२.
2. वले, वासुदेव. " जागतिकीकरणाचा मराठी भाषा व साहित्यावरील प्रभाव." प्रशांत पब्लिकेशन,२०१४.
3. संपा. हेरोळे, गजानन. "नव्वोदत्तर मराठी कथा." गोदा प्रकाशन, औरंगबाद, फेब्रुवारी २०१८.
4. संपा. कोत्तापल्ले, नागनाथ. "जागतिकीकरणानंतरचे मराठी साहित्य." सायन पब्लिकेशन, एप्रिल २०१७.

# प्रकरण ३

# कविता महाजन यांच्या ‘भिन्न’ व ‘ब्र’ कादंबरीतून दिसून येणाऱ्या स्त्रीवादी जाणिवा

# कविता महाजन यांच्या ‘भिन्न’ व ‘ब्र’ कादंबरीतून दिसून येणाऱ्या स्त्रीवादी जाणिवा

**प्रस्तावना**

१९६० नंतर मराठी साहित्यात विविध सहित्याप्रवाहांचा उदय झाला त्यात ग्रामीण,आदिवासी, दलित तसेच स्त्रीवादी अश्या काही प्रवाहांचा उल्लेख महत्वाचा ठरतो. पाश्चात्य देशात ‘स्त्रीवाद’ या संकल्पनेचा उदय स्त्रियांनी स्वतःच्या हक्कासाठी केलेल्या चळवळीतून झाला. स्त्रीवाद ही विचारप्रणाली पाश्चात्यकडूनच भारतात आली. पाश्चात्य स्त्रीवाद वीचारप्रणालीनेच स्त्रिवादाचा भक्कम पाया भारतात घातला.

स्त्रीवाद ही व्यापक संकल्पना असून स्त्रीयांच्या चळवळीमधून तीचा उदय व विकास झालेला दिसतो. १९७५ नंतर प्रामुख्याने स्त्रीवादी साहित्याची चळवळ सुरु झाली. स्त्रीवादी चळवळ ही फक्त स्त्रीयांच्या प्रश्नापूर्ती मर्यादीत नसून पुरुषांची मानसिकता बदलण्याचा प्रयत्न होता. पुरुषसत्ताक व्यवस्थेत स्त्रीला मिळालेले दुय्यम स्थान, स्त्रियांवरील अन्याय, अत्याचार, स्त्रियांचे मूलभूत हक्क नाकारणे, व्यक्तिगत स्वातंत्र्य हिरावणे अश्या गोष्टींना स्त्रीवाद विरोध करतो.

मराठी साहित्यात स्त्रीकेंद्री जाणिवांना केंद्रस्थानी ठेवून गौरी देशपांडे, अंबिका सरकार, सानिया, गीता साने इत्यादी लेखिका लेखन करतात याचं प्रवाहातील महत्वाची लेखिका म्हणजे कविता महाजन या आहेत. प्रस्तुत प्रकरणात स्त्रीवादाची संकल्पना मांडून कविता महाजन यांच्या ‘भिन्न’व ‘ब्र’ कादंबऱ्यातून दिसून येणाऱ्या स्त्रीवादी जाणिवांचा शोध घेण्यात आलेला आहे.

## ३.१ स्त्रीवाद संकल्पना स्वरूप व वैशिष्टये

स्त्रियांनी सामाजिक, आर्थिक आणि राजकीय हक्कासाठी दिलेल्या लढ्यातून स्त्रीवादाचा जन्म झालेला दिसतो. स्त्रीवाद पुरुषांना दोष देत नसून पुरुषसत्ताक व्यवस्थेला दोषी मानतो. पुरुष आणि स्त्री समानतेच्या विचारप्रणालीला पाठींबा देतो. स्त्रीचा माणूस म्हणून विचार करतो. स्त्रीवादी विचारधारेला स्त्रीच्या अस्तित्वाचे,

'स्व ' चे होणारे शोषण मान्य नाही. स्त्रीवाद हा शब्द इंग्रजीतील फेमिनिझम या शब्दाचे भाषांतर आहे. स्त्रीवादाचा विचार करताना समानता ह्या मूल्यांचा विचार गांभीर्याने केला पाहिजे

परंपरागत चालत आलेल्या विचारसरणीमुळे, मूल्य कल्पनांमुळे स्त्री म्हणजे नाजूक, हळवी, आज्ञाधारक, अशी काहीशी स्त्री प्रतिमा आपल्या समोर उभी राहते. मानवी समाजव्यवस्थेत स्त्रीला सतत दुय्यम स्थान मिळालेले आहे. पूर्वीपासून स्त्रियांवर अनेक बंधन लादली जात आहेत, त्यामूळे एक चौकट बध्द आयुष्य तिच्या वाट्याला आलेले आहे. 'चूल आणि मूल' एवढ्या पूर्तीच स्त्रियांचे आयुष्य मर्यादीत होते. स्त्रियांनी घर सांभाळायचं आणि पुरुषांनी कमवून आणायचे यामुळे स्त्रियांनी कितीही कष्टाची काम जरी केली तरी त्यांना मोबदला मिळत नसे आणि त्यांचे कामही नगण्य धरले जायचे यामुळे त्यांना दुय्यम लेखले जावू लागले तसेच याला अनेक घटक कारणीभूत आहेत. आपल्याकडील लिंगभेदावर आधारीत समाजरचना, पितृसत्ताक कुटुंब पद्धती, जात, धर्म, वर्ग आणि प्रस्थापित व्यवस्था या सगळयातून स्त्रियांवर अनेक बंधन लादली गेली. स्त्रियांच्या देहाविषयक पावित्र्याचा कल्पना आणि त्याबरोबरच आईपणाला मिळालेले नैतिक मूल्य यातून स्त्रीला सतत दुय्यम लेखले गेले.

धर्म, रूढी, परंपरा, संस्कृति यांच्या नावाखाली पुरुष प्रधान संस्कृतीने स्त्रियांना कमी लेखले, त्यांचे हक्क डावलले गेले, आपले होणारे शोषण त्यांनी निमूटपणे सहन केले. विसाव्या शतकात त्यांना आपल्या हक्कांची जाणीव झाली. स्त्रियांनी जागतिक पातळीवर आपल्या हक्कासाठी संघटना सुरू केली. स्त्रीमुक्ती चळवळी उभारल्या गेल्या. सीमॉन द बोव्हार, एलिझाबेथ गॅस्केल, एमिली ब्रॉटी व शार्लट गिलमान, व्हर्जिनिया वुल्फ या लेखिकानी स्त्रीवादाची जागतिक पातळीवर पायाभरणी केली.

स्त्रीवादी प्रवाह जरी मराठी सहित्यात १९६० नंतर आला असला तरी आपल्या भारतीय परंपरेत संत कवयित्रीपासून स्त्रीवादाची बीजे दिसतात. ' भक्तिविजयात मुक्ताबाईचा एक प्रसंग खूप बोलका आहे. ती नागव्याने आंघोळ करत असता तिला भेटायला चांगदेव येतो. तिला नागवे बघून चांगदेव तोंड फिरवितो, तेव्हा मुक्ताबाई त्याला 'निगुरा' म्हणते. एवढा मोठा योगी म्हणवत असला स्वतःला, तरी तो गुरूकडून काहीच शिकला नाही असे ती त्याला म्हणते.' तसेच संत जनाबाई यांच्या अभंगातुनही स्त्री जाणिवा व्यक्त झालेल्या आहेत.' डोईचा पदर आला खांद्यावरी l भरल्या बाजरी जाईन मी l' विद्रोही स्वर त्यांच्या अभंगातून जाणवतो.

स्त्रीवादाचा जेव्हा विचार होतो त्यावेळी स्वातंत्र्य, समता, आणि बंधुता ही समजव्यवस्थेची महत्त्वाची तत्व आहेत. पुरूषप्रधान संस्कृतीने स्त्रियांना या तत्वापासून वंचित ठेवले आहे. स्वातंत्र्याच्या समानतेच्या दृष्टीने स्त्रियांचा विचार झालेलाच नाही. अशा परंपरागत चालत आलेल्या मुल्यविचाराला, अन्यायकारक बाबींना स्त्रीवाद विरोध करतो. आजची स्त्री स्वातंत्र्य असणे, तिला तीच्या विचारांची बैठक असणे महत्वाचे आहे. लैंगीक भिन्नता असली तरी माणूस म्हणून समानतेचा दर्जा मिळावा इतपत पुरुषाइतकी स्त्रीही कर्तुत्ववान आहे.

स्त्रीवाद ही समाजपरिवर्तन घडवणारी सांस्कृतीक आणि राजकीय जाणिव आहे. स्त्रीवाद ही विचारप्रप्रणाली पुरूषप्रधान संस्कृतीच्या विरोधात नसून स्त्री – पुरूष समानतेचा ती पुरस्कार करते. स्त्रीला दुय्यम स्थान दिल्या गेलेल्या व्यवस्थेशी ती संघर्ष करते. समाजव्यवस्थेची पुनर्बांधणी व्हावी या विचारप्रणालीला स्त्रीवाद पाठींबा देतो.

### ३.२ पाश्चात्य स्त्रीवाद

इंग्लंड, फ्रान्स आणि अमेरिका या देशात झालेल्या मतदानाच्या चळवळीमुळे पाश्चात्य स्त्रीवाद ही संकल्पना आकाराला आलेली आहे. मध्यमवर्गीय आणि कष्टकरी स्त्रियांनी आपल्याला समान मतदानाचा अधिकार, संपत्ती, शिक्षण आणि समान कायदा मिळावा म्हणून ही चळवळ उभारली होती. या चळवळीतून पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रियांना मिळणाऱ्या दुय्यमत्वाची त्यांना जाणिव झाली.

पाश्चात्य देशात स्त्रियांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाल्यानंतर, स्त्रीमुक्ती आणि स्त्रीहक्क या विषयी अधिक विचारमंथन सुरू झाले. इंग्लंड आणि अमेरिकेमध्ये १९७०-८० च्या दरम्यान साहित्य, प्रकाशन संस्था, चर्चासत्रे, विद्यापिठीय अभ्यासक्रम यांच्याद्वारे स्त्रीवादी चळवळीने नवे मंथन वैचारिक क्षेत्रात सूरू केलेले दिसून येते. शैक्षणीक क्षेत्रात स्त्रीविषयक अभ्यासाला व संशोधनाला १९७० च्या सुमारास अमेरिकेमध्ये स्वतंत्र स्थान प्राप्त झाले.

पाश्चात्य देशातील विचारवंत लेखीकांनी लिहिलेल्या मौलिक ग्रंथानी स्त्रीवादी विचारांचा भक्कम पाया घातल्याचे दिसते. या पाश्चात्य विचारवंतांनी मांडलेल्या विचारातून स्त्रीवादी चळवळ अधिक प्रेरक ठरली.

स्त्रीविषयक वैविध्यपूर्ण पैलू या विचारवंतांनी मांडले आणि स्त्रियांना स्वतःच्या अस्तित्वाची, हक्काची, स्त्री – पुरूष समानतेची जाणिव करुन दिली. या चळवळीतून अनेक लेखीकानी, विचारवंतानी स्त्रीवादाची मांडणी केलेली आहे.

मेरी वुलस्टोन क्रॉफ्ट या लेखिकेने 'A vindication of rights of the women' (१७९२) या ग्रंथात त्यांनी स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा विचार प्रथम मांडला. त्यांनी स्त्रीयांच्या हक्कांविषयी आवाज उठविला, स्त्रियांना पुरुषाप्रमाणे योग्य शिक्षण आणि चांगली वागणुक मिळाली तर त्या एक उत्तम नागरिक बनणार असे प्रवर्तक विचार तत्कालीन कालखंडामध्ये त्यांचे होते. १७९२ मध्ये लिहिलेल्या त्यांच्या पुस्तकातील विचार खऱ्याअर्थाने स्त्रीवादी विचारांच्या इतिहासाचा प्रारंभ होता.

जॉन स्टुअर्ट मिल यांनी 'The subjection of women' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात त्यांनी पुरुषाबरोबर महिलांनाही मतदानाचा समान हक्क आहे आणि तो हक्क स्त्रियांनाच का नाकारला गेला. त्यांनाही आपले हितसंबंध ठरवण्याचा अधिकार आहे असे अनेक प्रश्न त्या उपस्थीत करतात. स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळालाच पाहिजे अशा विचारसरणीचा त्या पुरस्कार करतात.

व्हर्जिनिया वुल्फ यांनी 'A Room of one's own' हे पुस्तक लिहिले आहे. स्त्री सौंदर्यशास्त्राच्या लेखनाची सुरुवात करणाऱ्या त्या पहिल्या लेखिका होत्या. त्यांनी आपल्या पुस्तकातून लैंगीक राजकारणाचे प्रभावी स्वरूप मांडले आहे. पुरुषी स्त्रियांवर अनेक बाबतीत अवलंबून असतात, तरीही स्त्रियांवर अधिकार गाजवतात याचेही त्या वर्णन करतात. १९२९ मध्ये त्यांचें हे पुस्तक प्रकाशित झालेले आहे.

सिमॉन द बोव्हा यांनी ' second sex' हे पुस्तक लिहीले. त्या फ्रेंच स्त्रीवादी लेखिका आहेत. त्यांनी पुरुषप्रधानतेला, स्त्रीला दिलेल्या गौणत्वाला विरोध केला आहे. या पुस्तकात त्या म्हणतात कोणी बाई म्हणून जन्माला येत नाही, पण नंतर ती ' बाई ' बनवली जाते, म्हणजे केवळ लिंगवैशिष्ट्यामुळे एखाद्या व्यक्तीवर बाईपणाच्या कल्पना लादल्या जातात. त्यांनी 'second sex' या पुस्तकातून पुरुषीवर्चस्व, स्त्रीला दिले गेलेले दुय्यमत्व, तिचे माणूस म्हणून नाकारलेले अस्तित्व, तिच्यावर लादली गेलेली बंधने, स्त्री – पुरूष समानता याविषयी त्या स्त्रीवादी भूमिका मांडताना दिसतात.

केट मिलेट यांनी 'sexual politics' हे पुस्तक लिहीले. १९७० मध्ये लिहिलेल्या या पुस्तकाने वैचारीक वादळ उठविलेले दिसते. त्यांनी समाजव्यवस्थेच्या मुळाशी पुरूषी वर्चस्व आहे हे स्पष्टपणे सांगितले. केट मिलेट यांनी स्त्री – पुरूष लैंगिकतेविषयी लेखन केलेले आहे.

### ३.३ 'भिन्न' या कादंबरीतील स्त्रीवाद व स्त्री जाणिवांचे स्वरूप

कविता महाजन यांच्या 'भिन्न' कादंबरीला महानगरीय पार्श्वभुमी लाभलेली आहे. १९९० नंतरच्या कालखंडात स्त्रियांच्या वैचारीकतेत बदल झालेले आहे. स्वत्वाचा शोध त्या घेताना दिसतात, तसेच या कादंबरीतील स्त्रियांना स्वतःच्या अस्तित्वाची जाणिव आहे. स्त्रियांचा स्वतःकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलेला असून स्वतःला त्या माणूस म्हणून पाहताना दिसतात. पुरुष हा सतत स्त्रीवर वर्चस्व गाजवत आलेला आहे. स्त्रीही त्याची हक्काची अधिकाराची वस्तू असल्याप्रमाणे तिला वापरल जात. पुरुषी वर्चस्व भावनेचा तीटकार 'भिन्न ' कादंबरीत दिसून येतो. स्त्रियासुध्दा पुरुषांप्रमाणे नोकरी करतात, त्या मिळवत्या झाल्या आहेत. घर आणि नोकरी दोन्ही जरी व्यवस्थित सांभाळत असल्या तरी त्यांना अजूनही व्यक्ती म्हणून सन्मानाचे स्थान मिळालेले नाही. स्त्रिया जरी सुशिक्षित स्वावलंबी जरी असल्या तरी त्यांना कायम दुय्यम लेखल जात. कुटुंबाप्रती असलेल्या तिच्या जबाबदाऱ्यांची तिला सतत जाणिव केली जाते, यातून कमावत्या स्त्रियांचं घरातील नेमक स्थान काय, असे प्रश्न उपस्थित होतात.

कविता महाजनांनी रचिता शिर्के, प्रतीक्षा कमल, आणि लेनिना या तीन मुख्य पात्रांच्या पात्रमुखी निवेदनातून ' भिन्न ' कादंबरी साकारलेली आहे. ही समुहलक्ष्यी कादंबरी आहे. या कादंबरीतील रचिता शिर्के ही संसारी स्त्री आहे. कमावती असली तरी तीला सतत दुय्यम वागणूक मिळालेली आहे. रचिता बऱ्याचवेळेला स्वतःशीच शिव्या पुटपुटत असते यातून लेखिकेने स्त्रीमनातील अंत: स्फोट दर्शविला आहे. रचिता नवऱ्याच्या बाहेरख्यालीपणामुळे एड्ससारख्या दुर्दम्य आजाराला बळी पडते. लेखिकेने रचिताच्या माध्यमातून बदलत्या पुरुषप्रधान कुटुंबव्यवस्थेचे वास्तवदर्शी स्वरूप मांडले आहे. आज स्त्रियांना व्यक्तिस्वातंत्र्य मिळालेलं आहे, पहिजे ते शिक्षण घेण्याची मुभा मिळालेली आहे तर दुसऱ्या बाजूला त्यांना त्यांच्या उपयोजनापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न

केला जातो. आजची स्त्रीजरी सुशिक्षित असली, जरी तीला तीच्या आवडीचे कपडे घालायला, पहीजे ती वेशभूषा करायला स्वतंत्र मिळाले असले जरी स्त्रियांवर पूर्वीच्या मानाने कमी बंधने लादली गेली अथवा नष्ट झाली अस जरी म्हंटल तरी हे बंधनाचे स्वरूप केवळ वरवर बदलले आहे आणि स्त्रियांना मर्यादीत स्वरुपात समता आणि स्वातंत्र्य प्राप्त झाले.

" बायकांनी बैठकीत येऊन बसलेलं नानांना चालायचं नाही... बायकांसाठी पुढच दार वर्ज्य. टिव्ही बैठकीत होता, तसाच दुसरा मधल्या डायनिंग रूममध्ये सुध्दा होता. घरातही...नानाचं ठाम मत... मुलीनी शिकायचं ते लग्न ठरेपर्यंत आणि शिकलेल्या मुलग्यांना शिकलेल्या मुली लागतात म्हणून. शिकलेल्या मुली का लागतात, तर चार लोकांना बायकोला तत्कालीन सभ्य संकेतानुसार वावरता यावं, पुढे होणाऱ्या पोरांचे गृहपाठ त्यांना घेता यावेत न् घरचे हिशोब सांभाळता यावेत न् तसा वेळ आलाच, तर काही नोकरीचाकरी देखील करता यावी म्हणून." हे रचीताने केलेले तिच्या माहेरच्या परंपरानिष्ठ कुटुंबाचे वर्णन आहे. यातून स्त्रीयांना कश्याप्रकारे सतत कमी लेखल जात होत आणि तुच्छतेची वागणुक दिली जायची, तसेच पुरूषी वर्चस्वयावर लेखिका प्रकाश टाकतात.

रचितावर वयाच्या सहाव्या सातव्या वर्षी वडिलांच्या मित्राकडून बलात्कार झालेला असतो. तीला बलात्कार म्हणजे काय हे ही त्या वयात कळत नाही. उलट त्यांच्या मित्रांचे त्रासदायक वागणे ती वडिलांना सांगते पण वडील तीच बोलण दुर्लक्ष करतात. याचा तिला मानसिक धक्का बसतो, त्या नकळत्या वयात तिला आधाराची गरज होती, घरच्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे तिचा वडिलांकडे बघण्याचा दृष्टिकोनच बदलून गेला. या झाल्या प्रकारातून या मनोव्याथेतून सुटण्यासाठी ती आत्महत्याचाही प्रयत्न करते पण तो प्रयत्न अयशस्वी ठरतो. या रचिताच्या प्रसंगातून लेखिकेने बलात्कारित स्त्रियांची मनोव्याथा रेखाटली आहे. या कादंबरीतून सांसारिक स्त्री मनाची कोंडी फोडून लेखिकेने त्यांच्या आगतिकतेचे भावपूर्ण चित्रण केले आहे. विवाह ही स्त्री – पुरुषांच्या जीवनातील महत्त्वपुर्ण घटना असते. याच्या माध्यमातून समाजात लग्न झालेल्या जोडप्यांना कामभावनापूर्तीला मान्यता मिळते. या कादंबरीची नायिका रचिता आणि तीचा नवरा विठ्ठल यांच्या नात्यात कृत्रिमता असते, कर्तव्य म्हणून शरीर संबंध ठेवले जातात आणि नात्यात समाधानाचा भागच संपल्यामुळे ही माणस दुसरीकडे वळतात हे वास्तवदर्शी चित्रण लेखिका करतात. रचिता या व्यक्तिरेखेतून लेखिका असंख्य मध्यमवर्गीय स्त्रियांच्या नवऱ्याकडून वाट्याला आलेले दुःख मांडते.

या कादंबरीतील नायिका आत्मशोध घेत आहेत. त्यातील प्रतीक्षा ही एक नायिका आहे. ती एक अविवाहित तरुणी आहे. जिचा लग्नव्यवस्थेवर विश्वास नाही. पारंपरिक जीवन जगणाऱ्या मारवाडी समाजातून ती आलेली असते. ती चाकोरीबद्ध जीवन नाकारते, पारंपरिक प्रतिमांना ती छेद देते. तिच्या वडिलांनी केलेल्या व्याभिचारामुळे ती वडिलांचं नाव नाकारून आईच नाव लावून ‘ प्रतीक्षा कमल ‘ अशी आपली ओळख बनवते. ती पुरुषीव्यवस्था नाकारते. जो समाज व्यावहारिक वृत्ती आणि व्यापार व्यवसायासाठी ओळखला जातो अश्या समाजातून येवून सुध्दा आपलं व्यवसायक्षेत्र ती वेश्यावस्तीत समाजकार्यकर्ता म्हणून निवडते. स्त्री ही एक व्यक्ती आहे तिलाही व्यावसायिक क्षेत्राच्या निवडीसंदर्भात व्यक्तिस्वातंत्र्य आहे. स्त्रियांनी काही ठराविक स्वरूपाच्या नोकऱ्याच कराव्या अशी समाजाची अपेक्षा असते. कविता महाजन प्रतिक्षाच्या व्यक्तिरेखेतून जे स्वातंत्र्य व्यावसायिक क्षेत्राच्या निवडीसंदर्भात पुरुषांना दिले जाते ते स्त्रियांना का नाही दिलं जातं या संदर्भात प्रश्न उपस्थित करताना दिसते.

प्रतीक्षा आणि तिची मामी यांच्यातील एक महत्त्वाचा संवाद “ असच असत ना मामी, तर मग दोन्ही ऑपरेशनच्यावेळी, प्रत्येक मोठ्या आजारपणात तुला माहेरी का जाव लागल ? तुझे सासरचे लोक काळजी घेवू शकत नव्हते तुझी? आणि खर्चही मग अर्थातच माहेरच्यानीच केला असेल ना ? आणि म्हातारपणी तुझं नक्की काय स्थान असेल या घरात, ते सांगू शकतेस का तू खात्रीनं?” यातून स्त्रियांचं कुटूंब व्यवस्थेत नेमक स्थान काय यावर विचार करण्यासारखे आहे.

प्रतिक्ष्याच्या पात्रमुखी निवेदनातून लेखिकेने वेश्यावस्तीत होणारे स्त्रियांचे शोषण, अन्याय अत्याचार, एड्सग्रस्त महिलांना दिली जाणारी वागणुक चित्रित केली आहे. लेखिका या समाजातील शोषितांकडे माणूस म्हणून पाहायला सांगतात. देहविक्री करणाऱ्या स्त्रिया या परिस्थितीच्या चक्रात अडकून या धंद्यात आलेल्या असतात. धंदा करणे किंवा न करणे हे त्यांच्या मर्जीवर अवलंबून नसते. आजारपणातही त्यांना धंदा करावा लागतो. एड्स सारख्या आजाराचा धोका वेश्याना जास्त असतो. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीला आपल्या मालकीची समजली जाते. तीचा जबरदस्तीने उपभोग घेतला जातो. “ एक – दो बार, तो उसी रात पुलिस की रेड पडी थी l बारा चौदा लडकियोंको उठा के ले को गया l उनको छुडाने के वास्ते कितना पैसा खर्च किया l … ली को छोडा हरामीयोंने वो फातिमा तो बच्ची थी l खुबसुरत है बोलके सबको वोईच मंगती थी l इक रातमें आठ पुलिसवाले

चढे उसपे !..." ( पृ. १६५) शासनव्यवस्थाही स्त्रियांना गृहित धरते. समाजाची सुरक्षितता आणि संरक्षण हे आद्यकर्तव्य असलेल्या पोलिसांकडूनच असली नीच कृत्य होतात, तिथे सामान्य जनतेकडून काय अपेक्षा ठेवावी. या वस्तीतील स्त्रीयांना व्यक्ती म्हणुन बघितलेत जात नाही, ती एक उपभोगाची वस्तू अशीच तिची तुलना केली जाते.

" अरे यार... भिन्न असतात, म्हणून असमान असले पाहिजेत असं कुणी सांगितलय? लिंग ही गोष्ट जैविक, शारीरिक असते – पण लिंगभाव तर जैविक नसतो ना. लिंगभाव ही एक सामाजिक गोष्ट आहे. याचा विचार कोण आणि कधी करणार? आणि मुळात, प्रश्न पडले तरच माणूस विचार करेल ना...!" (पृ. ११९) लेनिना आणि प्रतिक्षा यांच्या संवादातून लेखिकेचा स्त्री समानते विषयी व्यापक दृष्टिकोन दिसून येतो.

लेनिनाचा पुरुषद्वेष्टेपणा स्त्रीवादा संदर्भात वेगळेच रूप समोर ठेवतो. तिचा लग्नसंस्थेवरून उडालेले विश्वास, तसेच पुरुषाकडून होणारे स्त्रियांचे शोषणे यामुळे पुरुषा विषयी तीटकार तिच्या मनात उत्पन्न होतो. लेनिनाला पुरुषांच्या लिंगावर लाथ मारण्याचे स्वप्न, तसेच शारीरिक गरजा भागवण्यासाठी तिने केलेला जिगोलाचा वापर अशी कृती आक्रमक अश्या विचारातून येते. भिन्न कादंबरीतून समाजातील विविध स्तरातील स्त्रियांच्या लैंगिक व्यवहाराचे जग कविता महाजनांनी चित्रित केले आहे. या कादंबरीतून स्त्रियांच्या पारंपरिक प्रतिमेला लेखिकेने ठोकर मारली आहे.

### **३.४ कविता महाजन यांच्या 'ब्र' कादंबरीतून दिसून येणाऱ्या स्त्रीवाद व स्त्रीवादी जाणिवा**

'ब्र' ही कविता महाजनांची आत्मकथानात्मक कादंबरी आहे. या कादंबरीतून राजकीय जीवनात कार्यरत असलेल्या आणि स्वतःचं अस्तित्व शोधू पाहणाऱ्या आदिवासी स्त्रीयांची संघर्षगाथा चित्रित केलेली आहे. ही कादंबरी कविता महाजनांच्या अनुभवातून साकार झालेली आहे. 'ब्र' कादंबरी अन्यायाविरुद्ध 'ब्र' उच्चारणारी म्हणजेच आवाज उठवणारी आहे.

"गप्प बस ...नाहीतर..." या धमकीला न घाबरता उच्चारलेला शब्द म्हणजे 'ब्र'. या कादंबरीची नायिका प्रफुल्ला या नायिकेने, एक सर्वसाधारण गृहिणीने हा 'ब्र' उच्चारला. कौटुंबिक निराशेतून बाहेर पडून, इतरांचे प्रश्न

सोडविण्याचा प्रयत्न केला. कादंबरीची नायिका प्रफुल्ला हिची वैयक्तिक सुख-दुःख, डोंगराळ भागातल्या आदिवासी बायकांच्या कहाण्या आणि स्वयंसेवी संस्थामधल्या घडामोडी अशा तीन स्तरांवर 'ब्र' या कादंबरीचा पट रचला गेला आहे. विविध प्रसंगांमधून कादंबरी उलगडत जाते. सुरवात वडगावच्या प्रवासातून होते, तेथील जीवन, निसर्ग, समस्या, लोक, वृत्ती-प्रवृत्ती इत्यादी गोष्टींची सूक्ष्म मांडणी दिसते. बायकांच्या घरी जाऊन, त्यांना एके ठिकाणी बोलावून प्रफुल्ला जाणून घेण्याचा प्रयत्न करते. सर्वसाधारण गृहिणीपासून, आत्मनिर्भर, प्रगल्भ अशा समाजसेविकेपर्यंत प्रफुल्लाचा प्रवास यात वर्णन केलेला आहे. प्रफुल्ला स्वतःच्या बाबतीत कठोर भूमिका स्वीकारते जेव्हा ती तिच्या नवऱ्याला बंडखोरपणे उत्तर देते, की आपला घटस्पोट झालाय त्यामुळे माझ्या खाजगी आयुष्यात लक्ष घालण्याची जरूरी नाही. 'ब्र' कादंबरीत राजकारण, आर्थिक ओढगस्ती, नात्यांची गुंतागुंत, मनाची उलाघाल आणि सामाजिक दडपण या खाली घुसमटलेल्याना धाड़साने उच्चारलेला 'ब्र' आणि त्याचे बरे वाईट परिणाम दाखविणारी मर्मभेद कादंबरी. एक साधारण गृहिणी ते पूर्ण वेळ कार्यकर्ती अशा एकीचा सुरु झालेला प्रवास बाईच्या नजरेने निरागसपणे पाहिलेले जग चित्रित होताना दिसते. एकाप्रकारे आदिवासी भागातल्या अनुभवांचा अहवाल येथे स्पष्ट होताना दिसतो. स्वयं सेवी संस्थांमधीले राजकारण आणि स्त्री-पुरूष संबंधांमधील राजकारणही या कादंबरीत दिसते. हे लेखन महानगर, शहर, खेडेगाव आणि आदिवासी वाड्यापर्यंत सर्वांना सामावून घेते.

'ब्र' म्हणजे आवाक्षर. 'ब्र' उच्चारणे कधीही सोपे नसतेच. भींगरूटीएचा दृष्टांत, दृष्टांतपाठ संदर्भासाठी सुरवातीलाच देतात याचा अर्थ गांधीलमाशी कीटकीस दंश करून आपल्या घरात कोंडून ठेवते. गांधीलमाशी आपल्याला खाणार, या भीतीने कीटकीस तिचे सतत स्मरण होते. तिच्या या चिंतेनेच तिला पंख फुटतात व ती गांधीलमाशीचे रूप धारण करते.

ज्याना 'ब्र' उच्चारता आला त्या सर्व जीभांना. असे समर्पणयुक्त वाक्य त्या लिहितात. शहरी आणि ग्रामीण संस्कृतीचे चित्रणही केलेले आढळते. आयुष्यात शिक्षणाला असलेले महत्त्व यात दिसून येते. राखीव जागांसाठी आदिवासी जमातीत जे राजकारण चालते त्यावरही भाष्य करणारी ही कादंबरी व त्यातून आदिवासी स्त्रियांना ज्या काही अडचणी आल्या, पुरुषी अहंकारामुळे दबावामुळे, जे काही प्रश्न उपस्थित झाले त्याविषयीचे

चित्रण आढळते. आदिवासी स्त्रीया, राजकारणात उतरल्यानंतर कौटुंबिक, सामाजिक स्तरांवरील बदल, अडचणी यांचेही चित्रण या कादंबरीत आढळते.

सामाजिक प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी सुद्धा स्वातंत्र्य नव्हते. स्त्रीयांवरील असणारा अविश्वास यात प्रकट होताना दिसतो. महिलां माहिलांमधील व्यवहारदेखील यात दिसतात. साध्या राहणीमानातला आनंदही कादंबरीत व्यक्त होतो.

आदिवासी भागांतल्या अनुभवांचा इतिवृत्तांत तसेच स्वयंसेवी संस्थांसह स्त्री पुरुष संबंधातले राजकारण टोकदारपणे आणि तेवढेच हळूवारपणे त्यानी आपल्या 'ब्र' कादंबरीत मांडलेत. माहिला सरपंच आणि त्यांच्या आयुष्यावर भाष्य करणारी ही कादंबरी आहे. 'ब्र' कादंबरीचा शेवट प्रफुल्ला स्वतःचं काम सुरु करण्याचा निर्णय स्वयं प्रेरणेने घेते.

'ब्र' कादंबरीतून कौटुंबिक, सामाजिक, राजकीय इत्यादी विषयाना स्पर्श केलेला आहे. प्रफुल्लाच्या जीवनातील चढउतार आणि त्यामुळे तिची झालेली अवस्था पण त्यातून तिला 'स्व'ची जाणीव झाल्यानंतर, तिने नवऱ्याविरुद्ध उच्चारलेला 'ब्र', दर्शविलेला विरोध, त्याच्या अधिकार वाणीला दिलेला नकार आणि स्वयं प्रेरणेतून घडलेली प्रफुल्ला असा तिचा जीवनप्रवास यात दिसतो. एक बायको म्हणून, आई म्हणून आणि शेवटी एक स्त्री म्हणून स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव तिला होते व त्यानुसार तिच्यात बदल घड़तात, ती विचाराने निर्णय घेऊ लागते. तिच्याकडे काम करणारी शांतिमावशीच्या अंगात आलेलं बळ पाहून प्रफुल्लाला वाटतं की आपण असा आवाज का उठवत नाही व त्यानंतर प्रफुल्लाही आपले बोलणे धारदार करून उत्तरे देते. तिच्यात असा बदल बारीक सारिक घटनांमधून झालेला दिसतो.

आदिवासी भागांत काम करताना त्या स्त्रीयांच्या वाट्याला आलेली दुःखे, त्यांचे प्रश्न, समस्या इत्यादीवर ती रितसर भाष्य करते. कादंबरीची सुरवात एका संस्थेतर्फे, वडगावातील ग्रामपंचायतीवर निवडून आलेल्या स्त्रीयांच्या संदर्भात अभ्यास प्रकल्पानिमित्ताने प्रवास करते.

. स्त्रीच्या अस्तित्वाचा, तिच्या खरेपणाचा कस यात पाहायला मिळतो. प्रत्येक शब्दातून विचारांची प्रखरता जाणवते. शहरी आणि ग्रामीण संस्कृतीचं दर्शन घडतं. "केवळ ती बाई आहे म्हणून तुम्ही असा

अविश्वासाचा ठराव खोटेपणा करून आणणं अयोग्य आहे, असं म्हणाल्या" यावरून एका स्त्रीविषयी काय विचार असतील याचेही चित्रण दिसून येते. स्त्रीयांच्या शैक्षणिक बाजूवरही भर दिलेला आहे. पुरुषी सत्ताकेंद्री स्वभाव चित्रित केलेला आहे. आदिवासी आणि त्यात स्त्री म्हणून घेतला जाणारा गैरफ़ायदा याविषयीदेखील ते भाष्य करताना दिसतात. संसारी बाईचे जीवन आणि मातृत्व यातला संघर्षही वर्णन केलेला आहे. आदिवासी भागांत किंवा शहरी भागांत देखील कौटुंबिक स्वास्थ्य नाही अशी तक्रार व्यक्त होताना दिसते. प्रफुल्लाच्या स्वतःच्या जीवनात चालेल्या घडामोडींचा जर आढावा घेतला तर नैतिकतेला बाधा आणणाऱ्या घटनाही तिच्या आयुष्यात घडलेल्या दिसतात. सामाजिक प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी सुद्धा स्वातंत्र्य नव्हते. आदिवासी समाजातच नव्हे तर कौटुंबिक जीवनातही स्त्रीयांवर दाखविला जाणारा अविश्वास यात प्रकट झालेला आहे. स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील, स्वातंत्र्योत्तर कालखंडातील स्त्रीयांचे तुलनात्मक चित्रही रेखाटलेले आहे. साध्या राहणीमानातला आनंदही अनुभवातून लेखिका व्यक्त करताना दिसतात. नवऱ्याला सतत बारीक सारिक गोष्टी सांगणारी प्रफुल्ला शेवटी कशी स्वावलंबी व निर्णयक्षमता विकसित केलेली दिसते तेही यातून दिसते. बायका राजकारणात उतरल्या नाहीत कारण बायकांकडे केवळ बाई म्हणून पाहण्याची संकुचित वृत्ती दिसते. त्यात आदिवासी समाज व त्याचबरोबर त्यांच्या पोट जातीतिल असलेले लग्नासंबंधीचे विचारही त्यात् वेगळया पद्धतिने मांडलेले आहेत. लग्नाला समाजाची सवय असा शब्द प्रयोग केलेला आढळतो. वारली सारख्या विविध समाजाचे चित्रण आणि विचार यात मांडलेले आहेत. आर्थिक परिस्थितिमधे तुलना यात केलेली दिसून येते.

आदिवासी भागांतल्या बायका असूनदेखील त्यांचे परखड़ विचार दिसतात, "जर बायांनीच आऊत हाकायचे तर नवरे कशाला करायचे?" वगैरे सारखी वाक्य यात दिसतात. ज्यातून ग्रामीण भागांत राहून देखील, अशिक्षित असली तरी त्यांचे असे विचार स्त्रीकेंद्री आहेत हे स्पष्ट होताना दिसते. आदिवासी भागांत गरोदर बाईचे होणारे हाल वगैरे याचेदेखील सूक्ष्म चित्रण यात केलेले आढळते. बऱ्याच आरोग्यविषयक समस्या, वगैरे विषयही या कादंबरीत आलेले आहेत. एक बाई, पत्नी आणि आई असा प्रवास यात वर्णन केलेला आहे. एक अबला म्हणून प्रफुल्लाला दिली जाणारी वागणूक, वास्तविक ती शिकलेली असते, नोकरीही करत असते. परंतु नवऱ्याच्या धाकापुढे ती काहीही करू शकली नाही. पण नंतर मात्र तिने आवाज उठवला. अशा विविध प्रसंगांतून कादंबरी स्त्रीवादाचा पुरस्कार करते आणि स्त्री जाणिवाही व्यक्त करते.

**समारोप**

कविता महाजन यांच्या ‘ भिन्न’ व ‘ब्र’ कादंबरीतून स्त्रीवादी जाणिवा दिसून येतात. त्यांचे लेखन पारंपरिक चौकटीला छेद देते. जागतिकीकरणानंतर जरी स्त्री सुशिक्षित स्वावलंबी झाली असली तरी तीला पुरुषसत्ताक व्यवस्थेत कायम दुय्यम लेखल गेले. स्त्री ही उपभोगाची वस्तू अशीच काहीशी मानसिकता दिसून येते. महानगरातील स्त्रियांना आपल्या हक्कांची समानतेची जाणिव आहे. कविता महाजन यांच्या लेखनातून आलेल्या स्त्रियांना आत्मभान आहे. स्त्री हक्काची जाणीव आहे.

निष्कर्ष

1. स्त्रीवाद ही संकल्पना जरी पाश्चात्य स्त्री चळवळीतून आपल्याकडे आली असली तरी स्त्रीवादी विचारसरणीची मुळे आपल्याला संत साहित्यातून दिसून येतात.
2. स्त्री – पुरुषात जरी लैगिंक भिन्नता असली तरी स्त्रियाही पुरुषाइतक्याच कर्तुत्ववान आहेत, त्यामूळे पुरुष सत्ताक व्यवस्थेत स्त्रियांना दिलेले दुय्यम स्थान स्त्रीवादी विचारप्रणाली नाकारते.
3. स्त्रीवाद स्त्री – पुरूष समानतेची मागणी करतो.
4. कविता महाजन यांच्या ‘भिन्न’ व ‘ ब्र’ या कादंबऱ्या स्त्रियांकडे बघण्याची नवी दृष्टी प्रदान करतात.
5. कविता महाजन यांच्या दोन्ही कादंबऱ्यातून पारंपरिक स्त्री प्रतिमेला छेद दिलेला आहे.
6. महानगरीय जिवनात स्त्रियांना आपल्या हक्कांची जाणीव आहे.
7. महानगरीय जिवनातील स्त्री ही आत्मनिर्भरतेकडे वळणारी आहे.
8. महानगरीय स्त्री ही आधुनिक विचारांना स्वीकारणारी आहे.

**संदर्भ सूची**

1. भागवत, वंदना. “ स्त्रीवाद साहित्य आणि समीक्षा” डायमंड पब्लिकेशन, डिसेंबर २०१८.

2. भिरूड, प्रमिला. “मराठी कादंबरी : स्त्रीयांचे योगदान” स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००३.

3. संपा. ढेरे, अरुणा “ स्त्री – लिखित मराठी कादंबरी (१९५० ते २०१०)” पद्मगंधा प्रकाशन, २०१३.

4. धोंगडे, अश्विनी. “स्त्रीवादी समीक्षा – स्वरूप आणि उपयोजन” दिलीपराज प्रकाशन, १९९३.

5. देशमुख, अरुणा. “स्त्रीवाद : साहित्य आणि संस्कृती” आकंशा प्रकाशन, २०१०.

# प्रकरण ४

# कविता महाजन यांच्या ‘भिन्न’ व ‘ब्र’ कादंबरीचे वाङ्मयीन मुल्यमापन

# कविता महाजन यांच्या 'भिन्न' व 'ब्र' कादंबरीचे वाङ्मयीन मुल्यमापन

**प्रस्तावना**

कविता महाजन या नव्वदनंतरच्या कालखंडातील एक महत्त्वाच्या लेखिका आहेत. त्यांची ' ब्र' ही कादंबरी २००५ साली प्रकाशित झाली तर 'भिन्न' ही कादंबरी २००७ साली प्रकाशित झालेली आहे. त्यांच्या दोन्हीं कादंबऱ्या वास्तववादी स्वरूपाच्या आहेत, समाजातील समस्या ग्रस्त विषयांना त्यांनी हात घातलेला आहे. समाजातील गंभीर प्रश्नांना त्यांनी या दोन्हीं कादंबऱ्याच्या माध्यमातून वाचा फोडली आहे.

कथानक, भाषाशैली, वातावरण निर्मिती, व्यक्तीचित्रण, नेवेदन इत्यादि कादंबरीचे महत्वाचे घटक आहे. कादंबरीच्या घटकानुसार कविता महाजन यांच्या 'भिन्न' व 'ब्र' कादंबरीचे वाङ्मयीन मुल्यमापन प्रस्तूत प्रकरणात करण्यात आलेले आहे.

## ४.१ कविता महाजन यांच्या ' भिन्न' कादंबरीचे वाङ्मयीन मुल्यमापन

### ४.१.१ कथानक

कविता महाजन यांच्या 'भिन्न' कादंबरीला महानगरीय पार्श्वभूमी लाभलेली आहे. मुंबईसारख्या महानगरात या कादंबरीचे कथानक घडते. आशयसुत्रांची विविधता या कादंबरीला लाभलेली आहे. 'भिन्न' या कादंबरीत रचित शिर्के, प्रतीक्षा कमल, लेनीना या प्रमुख व्यक्तिरेखा आहेत.

एकूण पाच भागात 'भिन्न' कादंबरी विभागलेली आहे. कादंबरीतील पहिल्या आणि तिसऱ्या भागात रचित शिर्के यांचा जीवन प्रवास रेखाटला आहे. रचित शिर्के यांच दिवसेंदिवस वाढत जाणारं आजारपण, त्यामुळे सततची औषधे आणि कमावती स्त्री असल्याने नेहमीचा करावा लागणारा लोकलचा प्रवास या सगळ्यात तिचा कोंडमारा झाला आहे. रचिताच्या वाढत जाणाऱ्या आजारामुळे तिच्या मनात अनेक शंका उद्भवतात आणि त्यांचं निरसन करण्यासाठीं 'सोबत' नावाच्या एका स्वयंसेवी संस्थेत जावून ती एड्सची चाचणी करते. चाचणी झाल्यानंतर तेथील समुपदेशकाशी केलेल्या चर्चेतून तिच्या गतजीवनाविषयीची माहिती समोर येते. रचिता सहा

सात वर्षांची होती तेव्हा तिच्या वडिलांच्या मित्राने तिच्यावर वारंवार बलात्कार केला. वडिलांनी तिच्यावर अविश्वास दाखवला, पुढे कॉलेजमध्ये गेल्यानंतर एका मवाली मुलाच्या प्रेमात ती पडते, त्याच्याशी तिचे शारीरिक संबंध येतात. तिच्या घरच्यांना हे प्रकरणं कळल्यानंतर तीचे विठ्ठलसोबत मनाविरुद्ध लग्न लावून दिले जाते. लग्नानंतर रचिताला नवऱ्याचा बाहेरख्यालीपणा समजतो, त्याचे अनेक बायकांशी संबध असायचे. विठ्ठलचे आणि रचिताचे संबंध तेवढे चांगले नव्हते. त्यांना दोन मुलं आहेत त्यांची नावं अस्मिता आणि जितू. रचिताचा तिच्या नील नावाच्या मित्रासोबत एका रात्री शारीरिक संबंध येतो या गत आयुष्यातील घटनां ती समुपदेशकाला सांगते. रिपोर्ट्स आल्यानंतर रचिताला एड्स झाल्याचं समजते. या आजारामुळे तिला नोकरीला मनाविरुद्ध राजीनामा द्यावा लागतो, तूच्छता सहन करावी लागते. तिच्या आयुष्यातील सहा सात महिन्यांचे वर्णन या भागात येते.

कविता महाजनांनी 'भिन्न' कादंबरीच्या दुसऱ्या भागात प्रतीक्षा कमल यांचे जीवन रेखाटले आहे. ती एक अविवाहित तरुणी आहे. पारंपरिक जीवन जगणाऱ्या मारवाडी समाजातून येवून सुध्दा ती स्वयंसेवी संस्थेत काम करण्याचे ठरवते आणि नंतर स्वयंस्फूर्ती प्रेरणेने वेश्यावस्तीत स्वतःची संस्था काढते. प्रतीक्षाच्या माध्यमातुन लेखिकेने एड्सग्रस्तांचे विविध स्तर आणि त्यांच्या समस्या हा विषय केंद्रस्थानी ठेवून लेखन केले आहे. वेश्यावस्तीतील स्त्रियांचे आरोग्यविषयक समस्या, एकूण महानगरांतील एच आय व्ही पॉझिटिव्ह स्त्रियांची मनोव्यथा इथे लेखिका मांडतात. एच आय व्ही संदर्भात पसरलेले गैरसमज त्या दूर करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. प्रतीक्षाच्या माध्यमातून लेखिकेने स्वयंसेवी संस्थेत चालणाऱ्या राजकारणावर देखील प्रकाश टाकला आहे.

प्रतीक्षा ही स्वावलंबी स्वतंत्र विचारांची आहे, ती तिच्या वयाच्या दुप्पट वय असलेल्या जे. डी नावाच्या व्यक्तीच्या एकतर्फी प्रेमात पडते. जे. डी तीला नकार देतो आणि तो नकार पचवणे तिला अवघड होते. यातून तिच्या आयुष्याला नैराश्य घेरत राहते. पुढे ती लेनीनासोबत डिस्को – क्लबमध्ये जाते. तिथे मधधुंद होऊन नाचतात, शरीरसुख घेतात आणि इथेच तिची ओळख राहुलशी होते. पुढे प्रतीक्षाच्या मॉ चे निधन होते, नातेवाईक लग्न कर म्हणून पाठीला लागतात, राहुलच एका अपघातात मृत्यू होतो त्यामुळे तिच्या दुःखात आणखी भर पटते. तिची जगण्याची इच्छाच संपुन जाते आणि ती आत्महत्या करते.

कादंबरीच्या तिसऱ्या भागात रचिता शिर्केविषयी पुन्हा तपशील येतो. एच आय व्ही एड्स झाल्याकारणांने तिला तिच्या मनाविरुद्ध राजीनामा द्यावा लागतो. ती ‘ सोबत ‘ च्या संस्थेत उपचारांसाठी जात असते. त्यामुळे तिथल्या डॉक्टरांशी, रुग्णाशी, संस्थेच्या व्यवस्थापकांशी ओळख होत जाते. समुपदेशन, समुपदेशक, रुग्णांचे अनुभव यातून तिला एड्स बाधित व्यक्तीबद्दल त्यांच्या कुटुंबाबद्दल खूप काही माहिती मिळते. रचिताला एच आय व्ही एड्सचा संसर्ग झाल्यानंतर समाजात अवहेलना सहन करावी लागत होती. त्यात तीच आजारपण वाढतच जात होते. तिची मुलगी अस्मिता आणि मैत्रीण विभा, विनिता तिची काळजी घेत होती. मध्येच ती भ्रमिष्टा सारखी वागत होती. तीच शारीरिक आणि मानसिक दुखण वाढतच जात होते. तिचा नवरा विठ्ठल एच.आय.व्ही पॉझिटिव्ह असल्याकारणाने आत्महत्या करतो. तिच्या नवऱ्यामुळे तिला एच. आय. व्हीचा संसर्ग होतो. रचीताला एड्स झाल्यानंतर ती विभाच्या मदतीने स्वतःच आत्मचरित्र लिहिण्याच ठरवते. जेणेकरून तिच्यासारख्या असंख्य एड्सग्रस्ताना जगण्याचे बळ मिळेल. रचीता कणखरपणे मृत्युला सामोरी जाते.

कविता महाजनांनी कादंबरीच्या चौथ्या भागात लेनीनाच जीवन रेखाटले आहे. लेनीना एडस् विषयी काम करणाऱ्या ‘सोबत’ नावाच्या संस्थेत कार्यकर्ती आहे. लेनीना जशी बिंधास्त आहे तितकीच ती हळवी आणि संवेदनशीलसुध्दा आहे. लेनीना मार्फत स्वयंसेवी संस्थेत चालणार राजकारणही दिसून येते. लेनीनाही स्वतंत्र विचारांची स्त्री आहे. लग्नसंस्थेवर तीचा विश्वास नाही. महाविद्यालयात असताना लेनिना अजय मोघे नावाच्या एका तरुणाच्या प्रेमात होती. तो खूप परंपरानिष्ठ विचारांचा होता. लग्नानंतर आपल त्याच्याशी आणि त्यांच्या कुटुंबाच्या पारंपरिक विचारांशी नाही पटणार हे वेळेस ओळखून तिने लग्नाला नकार दिला. ती स्वतंत्र विचारांची आहे. डेटिंग संस्कृतीचा ती पुरस्कार करते. महानगरातील आजच्या पिढीचे प्रतिबिंब तिच्यात दिसते. प्रतिक्षाच्या निधनानंतर लेनिना जे. डी च्या सल्ल्यावरून प्रतीक्षाच सेंटर चालवण्याची जबाबदारी स्वीकारते. लेखिका लेनिनाला केंद्रस्थानी ठेवून तिच्या मार्फत समाजातील वेंश्यांची स्थिती, एच. आय. व्ही पॉझिटीव्ह माणसांची स्थीती, समलिंगी संबंधांकडे बघण्याचा व्यापक दृष्टिकोन, तसेच महनगरात नवमूल्य आणि नवनैतीकतेची मूल्य स्वीकार करून जगू पाहणारी तरुणपिढीचही चित्रण आलेले आहे. लेनीना प्रतीक्ष्याच्या सेंटरची पुर्ण जबाबदारी स्वीकारते आणि तीच एड्स विषयक काम चालूच असते, याच दरम्यान तिच्या आयुष्यात प्रसाद ( मोहक) नावाचा मुलगा तिला लग्नाची मागणी घालायला येतो. ती विवाहसंस्थेवर विश्वास नसल्याचे त्याला सांगते. तीच्या मनात

पुरूषप्रधान संस्कृती विषयी अतिशय चीड होती हे तिच्या वक्तव्यातून जाणवते. मोहकला तिचा स्पष्टवक्तेपणा, तीच्यात असलेला खरेपणा आवडतो आणि तो तिच्या प्रेमात पडतो. हळू हळू मोहकविषयी लेनिनाचे विचार बदलायला लागतात आणि तीही त्याच्या प्रेमात पडते, मोहकचा शांतपणा, स्त्रीविषयक असलेला आदर यातून लेनीनाचे पुरुषाविषयी असलेले गैरसमज दूर होतात. मोहक लग्नसंबधाबद्दलचे विचार तीला पटवून देतो आणि ती मोहकचा जोडीदार म्हणून निवड करते.

'भिन्न' कादंबरीच्या पाचव्या भागात कविता महाजनांनी समारोपाचे परिशिष्ट दिलेले आहे. या भागात निवेदनासाठी तृतीय पुरूषी निवेदनपद्धती वापरलेली आहे. यात वेगवेगळया स्वयंसेवी संस्थांच्यासंदर्भात वृत्तपत्रामधील लेख दिले आहेत. तसेच एडस् विषयक विवध मासिके आणि वृत्तपत्रातील कात्रणे दिली आहेत. 'झुंज एड्सशी ' हे रचीता शिर्के हिच्या मरणोत्तर प्रकाशित झालेल्या आत्मचरित्राचे परीक्षण दिलेले आहे.

**४.१.२ वातावरणनिर्मिती**

कविता महाजन यांच्या 'भिन्न' कादंबरीला मुंबई महानगराची पार्श्वभुमी लाभलेली आहे. या कादंबरीत चित्रित केलेले 'मुंबई' हे महानगर या कादंबरीचा अविभाज्य भाग आहे. मुंबईच्या गतीमानतेच चित्रण त्या करतात. लोकलचा जीवघेणा प्रवास, लाखो प्रवासी, लेडीज स्पेशल कंपार्टमेंट, बायकांचे चीवड विनोद, कमावत्या स्त्रियांची धावपळ, तिथली अमाप गर्दी या वास्तव अनुभवांचं चित्रण लेखिका करतात. “ धाव बाई धाव. पाच सदतीसची लोकल चुकू द्यायची नाही.” ( पृ. ०९) या रचिता शिर्केच्या मनोगतातून तिथली धावपळ दिसून येते. लेखिकेने वातावरणनिर्मितीतून मुंबईचं वास्तवदर्शी चित्रण केलेले आहे.

तसेच मुंबईतली जीम संस्कृती, डिस्को, बार, क्लब, पार्ट्या या बदलत्या संस्कृतीच चित्रण लेखिका करतात. कविता महाजन यांचे लेखन बदलत चाललेल्या काळाशी सुसज्ज आहे.

**४.१.३ भाषाशैली**

कविता महाजन यांच्या ‘भिन्न’ कादंबरीचे स्वरूप सामाजिक आणि सांस्कृतीक आहे. महानगरीय बोली बरोबरच, प्रादेशिक, ग्रामीण बोलीचा वापर करणारी पात्रेही या कादंबरीत आहेत. तर उच्चशिक्षित शहरी पात्रांच्या तोंडी इंग्रजी, हिंदी, मराठी, भाषा आलेली आहे. महानगरातील बहुमिश्र स्वरूपाची भाषा या कादंबरीत येते. मुंबई महानगरातील भाषा तिथल्या वर्गानुसार बदलत जाते. कादंबरीची भाषा लालित्यपूर्ण आहे तशीच ती काव्यात्मकही आहे. त्यांच्यातील काव्यप्रतिभेचा आविष्कार नकळत त्यांच्या लेखनात उतरतो. ही काव्यात्मक्ता कधी संवादाच्या ओघातून येते तर कधी निवेदनाच्या माध्यमातून जाणवते.

“ भक्क पांढऱ्या पोकळीत  आपण एकट्या उभ्या आहोत, असं वाटतं. आसपास कुणीच नाही, काहीच नाही. एक अफाट रिकामेपण सर्वदूर पसरून राहिलेल्या अंतराळासारखं... पण पुर्ण रिकामं.”  ( पृ.२०२) त्यांनी लिहिलेल्या या ओळीत काव्यात्मक्ता भरून राहिलेली आहे. त्यांच्या लेखनात काव्यात्मक्ते बरोबर प्रतीमांचाही वापर केल्याचे दिसून येते.

‘भिन्न’ कादंबरीची भाषा काव्यमय तर आहेच पण विशिष्ट्य प्रसंगी राजकीय, सामाजिक विसंगतीवर नेमकेपणाने बोट ठेवते. त्यांच्या कादंबरीत भाषेचे दुहेरी रूप दिसून येते. प्रसंगी हळवी वाटणारी भाषा एका विशिष्ट वळणावर कठोर, आक्रमक दिसुन येते. कविता महाजनांनी कादंबरीतील पात्रांच्या भावभावनांचे दर्शन सुचक पद्धतीने घडविले आहे. या कादंबरीतील स्त्री प्रमुख व्यक्तिरेखा रचीता, प्रतिक्षा, लेनिना यांचे भावविश्व सूचकपणे रेखाटले आहे. रचीता या पात्राच्या माध्यमातून आलेले संवाद आणि स्वगतातून निवेदनाला काव्यात्मक्ता प्राप्त होते.

त्यांनी कादंबरीत काळाशी सुसज्ज अशी भाषा वापरली आहे. त्यांच्या भाषेत उत्कटपणा जाणवतो. कादंबरीतील भाषेत सहजता आहे, कविता महाजन जेव्हा मानसिक अवस्था चित्रीत करत असताना पात्रांच्या भावभावनांचे, आंतरीक घालमेलीचे चित्रण सहजपणे वाचकांसमोर ठेवतात. भिन्न कादंबरीतील संवाद परिणामकारक आहेत. भिन्न कादंबरीच्या भाषेत जिवंतपणा जाणवतो, प्रसंगाला जिवंत करायचे सामर्थ्य त्यांच्या लेखनात आहे.

त्यांनी केलेल्या वर्णनात चित्रमयता आहे, तिथली फ्लॅट संस्कृती, जिम संस्कृती, स्वयंसेवी संस्था तसेच रेड लाईट एरियाच चित्रण करण्यासाठीं त्यांनी केलेला भाषेचा वापर तिथल्या परिस्थितीचे वास्तवदर्शी चित्रण करते.

लेखिकेने प्रतीमा, अलंकार, म्हणी, वाक्प्रचारांचा उपयोग कादंबरीत केला आहे. लेखिकेने इंग्रजी शब्दांचा वापर कादंबरीत अधिक प्रमाणात केलेला आहे. कादंबरी वाचताना कुठेच भाषेत कृत्रिमता निर्माण झालेली दिसत नाही. 'भिन्न' कादंबरीतून महानगरीय जीवन जाणिवा तर व्यक्त होतातच त्याचबरोबर ग्रामीण भागातील माणसाच्या जाणिवाही या कादंबरीतून प्रकट होतात. त्यांनी कादंबरीत महानगरातील बोलीचा वापर गांभीर्याने केलेला आहे. मुंबई भागातील संमिश्र संस्कृतीचे प्रतिनिधित्व करणारी ही भाषा आहे. त्यांनी केलेला भाषेचा सहज वापर लक्षणीय ठरतो. लेखिकेने भिन्न कादंबरीत भाषिक दृष्टया नविन प्रयोग केलेला आहे. पारंपरिक लेखनाच्या चौकटीत 'भिन्न' कादंबरीची भाषा बंदिस्त नाही.

### ४.१.४ निवेदन पद्धती

कदंबरीचा महत्वाचा घटक म्हणजे निवेदन पद्धती हा आहे. 'भिन्न' कादंबरी कविता महाजन यांनी पाच भागात विभागलेली असून पहिल्या चार भागात त्यांनी प्रथम पुरुषी निवेदन पद्धतीचा वापर केला आहे. रचिता शिर्के, प्रतीक्षा कमल, लेनीना या तिन्ही प्रमूख स्त्री व्यक्तिरेखा स्व निवेदन करतात. पहिल्या आणि तिसऱ्या भागात रचीता शिर्केच मनोगत आलेले आहे तर दुसऱ्या भागात प्रतीक्षा कमल आपली कथा स्व निवेदनातून मांडत आहे आणि चौथ्या भागात लेनिनाच स्व कथन आलेले आहे.

या प्रमूख व्यक्तिरेखांच्या माध्यमातून लेखिकेने मुंबई महानगराचं वास्तविक स्वरूप आणि संस्कृतिच चित्रण केलेले आहे. तसेच कादंबरीतील उपकथानकही या प्रमुख पात्रांच्या निवेदनातून उलगडत जाते. 'भिन्न' या कादंबरीतील आशयविश्र्व खुप समृध्द आहे त्याचबरोबर संमिश्र स्वरूपाचेही आहे. लेखिकेने अनेक घटना-प्रसंगातून निर्माण झालेली उपकथानके यांना एकत्रकरून कादंबरीची निर्मिती केली आहे. या कादंबरीत संमिश्र स्वरूपाची उपकथानके आलेली आहे.

या कादंबरीत निवेदक तिन्ही स्त्री व्यक्तिरेखा आलेल्या आहेत ( रचिता, लेनिना, प्रतिक्षा ). या निवेदिकांच्या माध्यमातून मुंबईच्या जीवनशैलीच, राहणीमानाच, महानगरातल्या संस्कृतीच वस्तादर्शी चित्रण येते. तसेच मुंबईच्या रेड लाईट एरियाचही चित्रण लेखिका निवेदनातून करते. अनेकवेळा कादंबरीचं वाचन करत असताना जाणवते की जरी या तिन्ही व्यक्तिरेखा आत्मनिवेदन करत असल्यातरी लेखिका आपले मत मांडत असताना स्वतंत्र भूमिका साकारते, निवेदिका ऐवजी लेखिकाच उभी असल्याचे जाणवते त्यामूळे निवेदनात तटस्थपणा राहत नाही.

लेखिकेने कादंबरीच्या पाचव्या भागात तृतीय पुरूषी निवेदन पद्धतीचा वापर केलेला आहे. लेखिका या भागात रचिता शिर्के एड्सच्या आजाराने मरते तसेच तिने लिहिलेले आत्मचरित्र तीच्या मृत्यू पश्च्यात प्रकाशित होते याचे वर्णेन केलेले आहे.

### ४.१.५ व्यक्तिचित्रण

कविता महाजन यांच्या ‘भिन्न’ कादंबरीतील व्यक्तिचित्रण रूढ कादंबऱ्यातील व्यक्तिचित्रणापेक्षा अनेक अंगांनी वेगळे आणि वैशिष्ट्यपुर्ण आहे. कविता महाजनांनी मानवी स्वभावाचे अनेक कंगोरे आपल्या लेखनातून सखोलपणे चित्रित केलेले आहे. त्यांच्या ‘भिन्न’ कादंबरीतून येणाऱ्या व्यक्तीरेखा महानगरांतील विविध स्तरातील, व्यवसायातील आहे. त्यांनी व्यक्तिचित्रण करत असताना व्यापक सहानुभावातून केलेले आहे. ‘भिन्न’ कादंबरीतून लेखिकेने पारंपरिक नैतिकतेला छेद दिलेली आहे. उच्चभ्रू सुखवस्तुत राहणाऱ्या माणसापासून ते पोटापाण्यासाठी धंदा करणाऱ्या अनेक माणसांचे वास्तवदर्शी चित्रण लेखिका करतात. ‘भिन्न’ कादंबरीतील व्यक्तिचित्रण करत असताना लेखिका फक्त त्यांचे शरीरवर्णन करत नाहीत तर त्या पात्रांचे स्वभावलेखनही करतात, त्यांच्या वर्तमान जगण्यातील संदर्भ देवून त्या पात्रांचे अंतरंग आणि मानसिकता वाचकासमोर ठेवतात.

#### ४.१.५.१ भिन्न’ कादंबरीतील स्त्री-व्यक्तिरेखा

**रचिता शिर्के**

रचिता ही मध्यमवर्गीय मराठी कुटुंबातील स्त्री आहे. ती सुशिक्षित, विवाहित व कमावती आहे. महानगरातील मध्यमवर्गीय कुटूंबातील शहरी गृहिणीचे प्रतिनिधित्व ती करते. घराचा डोलारा सांभाळत नोकरीही करते. अत्यंत धावपळीचं आयुष्य ती जगते. रचिताचा जन्म परंपरानिष्ठ कुटुंबात झालेला असतो. तीच्या घरात वडिलांची (नानांची) हुकूमशाही चालत असते. वयाच्या सहाव्या सातव्या वर्षी तिच्यावर तिच्या वडिलांच्या मित्राकडून बलात्कार होतो आणि तीचे बालपणच संपून जाते. तीचे वडील तीलाच दोष देतात. त्याना आपल्या प्रतिष्ठेची जास्त काळजी वाटत असते. रचिता अनेकदा आत्महत्या करण्याचाही प्रयत्न करते. लेखिका रचीताच्या माध्यमातून बलात्कारित व्यक्तीच्या मनस्थितीचे चित्रण करतात. रचितासारख्या कितीतरी मुली कोवळया वयात लैंगिक वासनांच्या बळी ठरतात.

वडीलांच्या वागण्याचा परंपरानिष्ठ जगण्याचा राग रचीताला आहे, तसेच तिच्या नवऱ्याच्या दुटप्पीपणाचाही राग तीच्या बोलण्यातून, संवादातून व्यक्त होतो. तीच्या नवऱ्याचा खोटेपणा तिला आवडत नाही. ती जरी आधुनिक जीवन जगत असलीतरी परंपरेची बंधन अजूनही तीच्या पायात अडकलेली आहेत. ती वर्तमानकालीन समाजातील अश्या स्त्रियांचे प्रतिनिधित्व करते की ज्या नवऱ्याची चूक असूनही आपल्या मुलांकरिता त्याच्याचुका मागे सारून खंबीरपणे त्याची साथ देतात, मनात कितीही तिरस्कार असला तरी मुलांकडे पाहून दुर्लक्ष करतात आणि आपल्या मुलांना एक चांगले आयुष्य मिळावे म्हणून सतत प्रयत्नशील असतात.

रचिताच्या व्यक्तिरेखेतून लेखिका महानगरांतील वास्तवतेची जाणिव करुन देतात, एच आय व्ही एड्स पॉझिटिव्ह माणसांना होणारे शारीरिक आणि मानसिक त्रास, तसेच समाजात होणारी त्यांची अहवेलना, आणि या सगळयात त्यांची होणारी मानसीक कोंडी लेखिका चित्रीत करतात. रचीताला तिच्या नवऱ्यामुळे एच आय.व्हीची लागण होते. आणि तीच आयुष्यच एकाएकी बदलून जाते. तिच्याकडे बघण्याचा समाजाचा दृष्टीकोन बदलतो. तीला नोकरीवरून काढण्यात येते, आणि अचानक बसलेल्या या धक्क्यामुळे आयुष्यात नैराश्या येते मात्र ती पुन्हा स्वतःला एकवटून उभी राहते. रचिता सारख्या असंख्य स्त्रिया स्वतःची काहीही चूक नसताना एच आय व्ही

सारख्या गंभीर आजारांना बळी पडतात. रचीताच्या जीवंत व्यक्तिरेखेतून एड्सग्रस्त व्यक्तींचे दुःख चित्रित केले आहे.

कविता महाजन यांनी रचिताच्या व्यक्तिरेखीमार्फत महानगरातील वर्तमानकालीन सुशिक्षित, स्वावलंबी आणि शहरी स्त्रियांच्या जीवनात आलेल्या दुःखाचे वर्णन केले आहे. पुरुषप्रधान व्यवस्थेत पुरुषी वर्चस्वामुळे अनेक स्त्रिया एड्ससारख्या आजाराला बळी पडलेल्या आहेत. रचिताचा शेवटी मृत्यू होतो पण ती खंबीरपणाने सत्य स्वीकारते, ती परिस्तिथीपुढे हात टेकवत नाही तर त्यातूनही ती नव्याने सकारात्मकतेने जीवन जगण्याचा प्रयत्न करते आणि एडसग्रस्त माणसांना जगण्याची प्रेरणा देते.

**प्रतिक्षा कमल**

प्रतिक्षा कमल ही ‘भिन्न’  कादंबरीतील दुसरी महत्वाची स्त्री व्यक्तिरेखा आहे. प्रतिक्षाच्या माध्यमातून लेखिकेने महानगरातील स्वतंत्र विचारांच्या आधुनिक स्त्रीचे व्यक्तिमत्त्व रेखाटले आहे. ती महानगरातील वर्तमानकालीन युवा पिढीचे प्रतिनिधित्व करते. तीच्या व्यक्तिरेखेतून लेखिकेने समाजात स्त्रीयांवर लादलेल्या अनेक चुकीच्या परंपरा, रीतिरिवाज, रूढी- संकेत यांना नकार दिलेला आहे. तसेच आपल्या वडिलांचे नाव टाकून आपल्या आईचे नाव ‘प्रतिक्षा कमाल’ असे ती लावते. परंपरानिष्ठ जगणे ती नाकारते. ती जीवनाकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहते. तृतीयपंथी, होमो, लेस्बिअन, वेश्यां या सगळयाकडे ती माणूस म्हणून समान दृष्टीतून पाहते. तीच्या व्यक्तिमत्त्वातून लेखिका समाजातील नव्यामूल्यांचा आणि नवनैतिकतेचा विचार मांडतात.

प्रतिक्षा ही अविवाहित तरुणी आहे, तसेच ती स्वावलंबी आहे. ती आपल्या स्वतंत्र घरात आपल्या आईसोबत राहते. खूप संवेदनशील असे तीचे व्यक्तिमत्त्व आहे. लहानपणी तीचे वडील तिला आणि तीच्या आईला सोडून जातात, नंतर तिला तीच्या वडिलांच्या बाहेरख्याली स्वभावाबद्दल समजते. याचे तीच्या बालमनावर खोलवर परिणाम होतात. आपण ज्या परिस्थितीत लहानाचे मोठे होत असतो, त्या कोवळ्या वयात आलेले अनेक बरवाईट अनुभव आपल्या आयुष्याची जडणघडण करत असतात, बालमनावर झालेल्या वाईट

घटनांचे आघात दीर्घकाळ माणसाच्या मनपटावर राहतात. आपल्या आई-वडिलांचा नातं खूप जवळून पाहिल्याने तीचा लग्नसंस्थेवरील विश्वास उडतो.

प्रतीक्षा स्वतःची स्वयंसेवी संस्था चालवते, तीच्या माध्यमातून लेखिकेने स्वयंसेवी संस्थामधील राजकारणालाहि उजाळा दिलेला आहे. वेश्यावस्तीत ती वेश्यांसाठी काम करते, त्यांना आरोग्यविषयक माहिती देते, वाढत जाणाऱ्या एडस् संदर्भात जनजागृती करते. अनेक स्त्रीयांना मदतीचा हात पुढे करते. स्त्रीयांना आत्मनिर्भर बनवण्याचा प्रयत्न करते. लेखिका इथे समाजाच्या हितासाठी जगणाऱ्या, अनेक सामाजिक कार्यकर्तीचे व्यक्तिमत्त्व तीच्या माध्यमातून रेखाटले आहे.

प्रतिक्षा ही आजच्या तरुणाईचे एक प्रतीक आहे. आपल्या वयाच्या दुप्पट माणसावर ती एकतर्फी प्रेम करते आणि प्रेमात मिळालेला नकार ती पचवू शकत नाही. यातून तिला नैराश्या येते, आणि ती आत्महत्या करते. महानगरात वर्तमानकालीन स्थितीत युवा पिढीत नैराश्यता वाढत जात आहे. महानगरात माणसांची गर्दी असूनही एकटेपणाची भावना सतत जाणवत असते आणि यातून अपुरेपणाची जाणिव, निराशावादी दृष्टी, असहाय्यता, हाताशा व आत्महत्येची तीव्र इच्छा होत असते. अनेकदा वरवर सगळ चांगल चाललय अस दाखवणारी माणस आतून कोलमडून गेलेली असतात, अशीच प्रतीक्षा आहे सगळयाशीं नीट वागणारी प्रतीक्षा स्वतःशी मात्र अकृत्रिम वागते, स्वतःच्याच विचारांच्या कोशात जगते, अनेकदा आत्महत्येची इच्छा तीव्र होते आणि ती स्वतःला संपवण्याची कृतीही करते. इंटरनेटवर जावून आत्महत्या कशी करायची याचा शोध घेते, स्वतःला त्रास करते, स्वतःला छळते. प्रतिक्षाच्या गोंधळलेल्या मनस्थितीचे चित्रण या कादंबरीत येते. आज मानसीक रुग्णांची संख्या वाढत जात आहे ही खरे म्हणजे चिंताजनक परिस्थीती आहे.

**लेनिना**

'भिन्न' कादंबरीतील लेनीना ही तिसरी प्रमुख व्यक्तिरेखा असून तिच्या माध्यमातून लेखिकेने महानगरातील सुशिक्षित, आत्मनिर्भर आणि आधुनिक विचारांच्या स्त्रीचे चित्रण केलेले आहे. ती एक सामाजिक कार्यकर्ती आहे, स्त्रीमुक्तीची छाप 'भिन्न' कादंबरीतील नायिकेवर पडलेली आहे. स्त्रीच्या स्वत्वाची तिला जाणिव

आहे, स्त्रियांच्या हक्कांसाठी तसेच स्त्रीला एक माणूस म्हणून मूल्य प्राप्त व्हावी यासाठी पुढाकार घेणारी अशी ही व्यक्तीरेखा आहे.

समाजाने लादलेल्या रूढी परंपरा ती नाकारते, तसेच तीला घातलेल्या मर्यादा आणि बंधने ती झुगारते. ती मेहनती, जिज्ञासू आहे, एड्सग्रस्त माणसांसाठी आणि वेश्यांना चांगले आयुष्य जगता यावे म्हणुन ती सतत कार्यशील असते. रचिताचा वरवर जरी बिनधास्त स्वभाव दिसत असला तरी ती खूप संवेदनशील आणि हळवी आहे. ती स्पष्टवक्ता आहे, परंपरेचे संस्कृतीचे ओझे ती वाहत नाही, निखळ स्वच्छंदी आयुष्य जगण्याचा प्रयत्न करते.

स्त्री – पुरुष समानतेचा ती पुरस्कार करते, पुरूषप्रधान संस्कृतीची, पुरुषांच्या वर्चस्ववादि भूमिकेची तिला चीड आहे. तिचा लग्नसंस्थेवर विश्वास नाही. तीला मुक्त नातेसंबंध हवेत त्यात मानसीक गुंतवणूक नको असते, शरीराची एक गरज म्हणुन ती लैंगिक संबंधाकडे बघते, आपल्या शारीरिक गरजा भागवण्यासाठी व्हायब्रेटर, जीगोलोचा ( पुरुष वेश्या) वापर करते. तसेच डिस्को, बार ,क्लब, पार्ट्या अश्या वरपांगी गोष्टीत एकटेपण विसरण्यासाठी स्वतःच मन ती रमवत असते.

लेनिनाच्या व्यक्तिरेखेतून लेखिकेने महानगरांतील अनेक समस्यांचे चित्रण नकळतपणे केलेले आहे. लग्न, कुटुंब, मुलं व सेक्स याविषयी तिचे मत आक्रमक आहे. ती पारंपरिक विचारांना छेद देते आणि नवनैतिक मूल्यांचा स्वीकार करते. लेनीनाच्या माध्यमातून लेखीका समाजातील ढासळत चाललेली मुल्ये व नव्या आणि जुन्या पिढीतील विचारांचे संघर्ष रेखाटते, तसेच नातेसंबंध विषयी पारंपरिक दृष्टिकोन तिला मान्य नाहीत. काळाबरोबर चालताना माणसांनीं नवी मूल्य अंगिकारावी तसेच कालच भान व्यक्त करणारी तिची व्यक्तिरेखा आहे.

**विभा**

‘भिन्न’ कादंबरीतील विभा ही व्यक्तीरेखा रचिताच्या निवेदनातून साकार झालेली आहे. विभाही रचिताची जवळची मैत्रीण असते. नवऱ्याच्या सततच्या मारझोडाला कंटाळून आणि लैंगिक विकृतीला कंटाळून आपल्या आईकडे कायमची राहण्यासाठी जाते आणि नवऱ्याला घटस्फोट द्यायचा ठरवते. तिचा नवरा तीच्या शरिरासोबत

नको ते चाळे करायचा जे तीला नकोस वाटायचे आणि नकार दिला तर मारझोड केली जात होती. वीभाच्या माध्यमातूनही पुरुषी वर्चस्वामुळे स्त्रियांचे होणारे शोषण लेखिका अधोरेखित करते. महानगरातच नव्हे तर ग्रामीण भागातसुध्दा स्त्रियांचे स्वतःच्या नवऱ्याकडून लैंगीक शोषण होते, स्त्रियांना नवऱ्याची खाजगी मालमत्ता असल्यासारखे वापरले जाते. आपली परंपरानिष्ठ विवाहसंस्था स्त्री पुरुषांना लैंगिकतेचा अधिकार देते.

वीभाचा मानवकेंद्री दृष्टिकोनावर लेखिका भर देतात, समाजात माणुसकी आज रसातळाला जात आहे, सगळीकडे स्वार्थापोटी आपल्या हितासाठी नातेसंबंध ठेवले जातात, आणि एकदा काम निघाले की त्या माणसाला आपोआप बाजूला सारले जाते तर विभासारखी माणस आजही ह्या समाजात आहेत की जी दुसऱ्यांच्या हितसंबंधांचा विचार करतात. रचिताला एड्स झाल्याचे समजल्यावरही तीच्या दृष्टिकोनात काहीच फरक पडत नाही, ती तीची शेवट पर्यंत काळजी घेते. विभा ही गौण स्त्री व्यक्तिरेखा आहे.

**विनिता**

विनिता ही व्यक्तीरेखा महानगरांतील मध्यमवर्गीय, सुशिक्षित, कमावत्या गृहिणी आहे. ती बँकेत नोकरीला असते बँकेतील एका तरुणांसोबत घरच्या विरोधात जावून ती आंतरजातीय विवाह करते. तीच व्यक्तिमत्त्व रचिताच्या निवेदनातून खुलत जाते. विनिताच्या माध्यमातून लेखिकेने एड्सग्रस्तांकडे बघण्याचा आधुनिक दृष्टिकोन मांडलेला आहे.

**अस्मिता**

कादंबरीत अस्मिता ही रचिताची मुलगी आहे. तिचं वय सोळाच्या आसपास आहे, तिचा स्वभाव समजूतदार आणि प्रेमळ आहे. आपल्या आईच्या कष्टांची तिला जाणीव आहे. ती रचीताला तीच्या आजारपणात मानसीक आधार देते. वडीलांच्या वागण्याविषयीही तिला जाणीव आहे. रचिताला एड्स झाल्याचे समजल्यावर तिच्या मैत्रिणी तीची हेटाळणी करतात, तिला त्रास देतात,  शेजारी बहिष्कार करतात तरी धीराने परिस्थितीला

सामोरे जाते, तिचा स्वभाव कणखर आहे. रचिताला एड्स झाल्याचे कळल्यावरही ती संकुचित दृष्टीने तिच्याकडे पाहत नाही. ती तिच्या आजारपणात तिला मानसिक आधार देते.

**( माँ ) कमल**

प्रतिक्षाची माँ ही गौण स्त्री व्यक्तिरेखा असून प्रतिक्षाच्या निवेदनातून ती साकारते. पुरुषव्यवस्थेत भरडली गेलेली ती एक स्त्री आहे. ती मारवाडी समाजातील परंपरानिष्ठ कुटुंबातून ती आलेली आहे, ती दिसायला साधारण असल्याने नवऱ्याकडून सततचे टोमणे, अहवेलाना सहन करावी लागायची. नवऱ्याचा बाहेरख्यालीपणा ती मुकपणाने सहन करते.

कमल ही व्यक्तीरेखा सहनशील आहे, तिच्यात सोशिकपणा आहे. हा सोशिकपणा पारंपरिक व्यवस्थेने लादलेला आहे. आणि ती अशाच परंपरानिष्ठ भारतीय स्त्रीचं प्रतिनिधित्व करते.

**४.१.५.२ भिन्न कादंबरीतील पुरूष व्यक्तिरेखा**

**विठ्ठल**

माणसाच्या जगण्यात आलेला खोटेपणा, वरपांगीपणा, दिखावू प्रतिष्ठा, माणसांचा दुटप्पी स्वभाव लेखिका विठ्ठलच्या माध्यमातून चित्रीत करतात. विठ्ठल हा राचीताचा नवरा असतो, अनेक बायकांशी त्याचे शारिरीक संबंध असतात. घरात आणुन ठेवलेल्या मोलकरणीलाही तो सोडत नाही. आपल्या वासनापूर्तीसाठी अनेक स्त्रियांचा तो वापर करतो. पुरुषप्रधान व्यवस्थेतील विठ्ठल हा पारंपरिक पुरूष प्रतीमा घेवून समोर येतो. स्त्रियांना तो कायम दुय्यम लेखत आलेला आहे. मुलीच्या शिक्षणाची जबाबदारी तो नाकारतो आणि रचीतावर सोपोवतो तर मुलाच्या ॲडमिशनसाठी डोनेशन भरून गुणवत्ता नसतानाही मेडिकलला पाठवतो. समाजात अजूनही मुलगा आणि मुलीमध्ये केला जाणारा भेदभाव लेखिका चित्रीत करतात. आज जग कुठल्याकुठे पोहचल, स्त्रिया अंतराळावर जावून पोहचल्या तरी काही घरांमध्ये अजूनही स्त्री – पुरुषांमध्ये भेद केल्याचे दिसून येते.

विठ्ठलच्या बाहेरख्यालीपणातून त्याला एड्सचा संसर्ग होतो आणि त्याच्यामुळे रचितालाही एड्सची लागण होते. त्याच्या स्वभावात काहीच बदल होत नाही. माणसापेक्षा त्याला पैसा महत्वाचा वाटतो.

**ॲड जे. डी. वाडेकर**

जे. डी ही पुरूष प्रधान व्यक्तिरेखा आहे. ते सोबत या स्वयंसेवी संस्थेचे संस्थापक आहेत. जे.डी हे प्रामाणिकपणे स्त्रीयांच्या समस्या दूर करण्यासाठी कार्य करत असतात. त्यांचे आदर्श व सकारात्मक असे व्यक्तिचित्रण आलेले आहे. ते विवाहित आहेत आणि त्याबरोबर आपल्या कुटुंबाशी एकनिष्ठ आहेत. प्रतीक्षा त्यांच्या एकतर्फी प्रेमात पडते ते तीला नकार देतात. ती चुकीच्या अनिष्ठ परंपरांना मानत नाही. ते स्त्रियांना माणूस म्हणून बघतात आणि समानतेची वागणुक देतात.

त्याबरोबर तृतीपंथी, होमो, लेस्बिअन, वेश्या या सगळ्यांना माणूस म्हणुन बघतात. त्याचं अत्यंत संयमशील अस व्यक्तिमत्त्व आहे. ते संस्थेसंदर्भात अत्यंत विचारपूर्वक निर्णय घेतात, या संस्थेसोबत अनेकजणांचे आयुष्य जुळलेले आहे याची त्यांना पुरेपूर कल्पना आहे. वैचारिक प्रगल्भता असलेली ही व्यक्ती आहे. ते सामाजात काहीतरी चांगले बदल व्हावे यासाठी त्यांची होणारी तळमळ दिसून येते.

**मोहक ( प्रसाद )**

‘भिन्न’ कादंबरीतील मोहक ही महत्त्वाची व्यक्तिरेखा असून प्रथम लेनीनाला लग्नाची मागणी घालताना दिसून येते. मोहक हा समंजस, कष्टाळू आणि सकारात्मक विचारांचा आहे. स्त्रियांन विषयी त्याच्या मनात आदर आहे, त्याला भारतीय संस्कृती आवडते. तो जरी परंपरेला आणि मूल्यांना धरून जगत असला तरी तो त्याच्यात पुरुषी वर्चस्वपणाची भावना नाही. तो स्त्रियांना समान लेखतो. संवेदनशील असे त्याचे व्यक्तिमत्त्व आहे.

त्याचा लग्नसंस्थेवर, प्रेमावर विश्वास आहे तो आपल्या विचाराने लेनिनाचे हृदयपरिवर्तन करतो आणि तीला पटवून देतो की सगळेच पुरूष सारखे नसतात. तो पैशांपेक्षा नात्याला जास्त किंमत देतो. मोहकचे लेनिनावर

प्रेम होते,  त्याचबरोबर तिची मानसीक अवस्था आणि भावनिक गुंतवणूक तो समजून घेतो, तिला तो भावनीक आधार देतो मोहक हे व्यक्तिमत्त्व खुल्या विचारांचे आहे, तो आपले निर्णय दुसऱ्यांवर लादत नाही तर पुढच्या व्यक्तीला स्वतःचे निर्णय घेण्याचे स्वतंत्र देतो. एक आदर्श व्यक्तिमत्त्व मोहक या पात्राच्या माध्यमातून लेखिकेने रेखाटले आहे.

## ४.२ ‘ ब्र’ कादंबरीचे वाङ्मयीन मुल्यमापन

### ४.२.१ कथानक

कविता महाजन यांची ‘ब्र’ ही पहिली कादंबरी असून २००५ साली प्रकाशित झालेली आहे. ‘ब्र’ ही कादंबरी वास्तवातील महत्त्वाच्या विषयाला हात घालते. या कादंबरीची नायिका प्रफुल्ला आहे. स्त्रीला केंद्रस्थानी ठेवून हे लेखन केलेले आहे. ‘ब्र’ कादंबरीतून लेखिकेने स्त्रीयांच्या सामाजिक प्रश्नांना हात घातलेला आहे, त्यांनी समकालीन समाजवास्तव निर्भिडपणे मांडले आहे. तसेच या कादंबरीचे कथानक महानगरांत, खेड्यात, आणि आदिवासीं पाड्यात घडते. १९९२ साली त्र्याहत्तरावी घटनादुरूस्ती झाल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राखीव जागा स्त्रियांसाठी निर्माण झाल्या आणि राखीव जागांवर आदिवासीं क्षेत्रात ग्रामपंचायतीवर स्त्रिया निवडून येवू लागल्या आणि बऱ्याच प्रमाणात अविश्वासाचे ठराव महिला सरपंचावर घालण्यात येवू लागले आणि त्यांना राजीनामा द्यावा लागायचा. या वस्तुस्थितीची पाहणी करून अहवाल लेखन करण्यासाठीं ‘ प्रगत’ या आदिवासी महिलांसाठी काम करणाऱ्या संस्थेमार्फत प्रफुल्लाची नीवड करण्यात येते. ती प्रगत या संस्थेत काम करत असते. अहवाल लेखन करण्यासाठीं तीला महाराष्ट्रातील अनेक आदिवासी पड्याना भेट द्यावी लागते आणि या निमित्ताने तीचा आदिवासीं स्त्री जीवनाशी तीचा परिचय होतो. या कादंबरीत  अन्यायग्रस्त आदिवासी स्त्रीयांच्या कहाण्या लेखिकेने मांडल्या आहेत.

या कादंबरीची नायिका प्रफुल्ला ही घटस्फोटित असते. तीचा नवरा अंजली नावाच्या बाईशी दुसरे लग्न करतो. प्रफुल्लाला एक मुलगा असतो. संसाराच्या विपरीत अनुभवातून ती जात असते. घरात तीला काडीचीही किंमत दिली जात नाही उलट शिव्या, मारझोड केली जाते. प्रफुल्ला ही सहनशील वृत्तीची आहे. घटस्फोट

झाल्यानंतर सुद्धा तीचा नवरा तीला स्वतःची खाजगी मालमत्ता असल्यासारखा वापरतो. तीचा मुलगा तीच्या नवऱ्यासोबत रहायला जातो. घरात ती आणि शांतामावशी दोघेच राहतं असतात. घटस्फोट झाल्यानंतर सुमेधच्या सांगण्यावरून ती प्रगत या संस्थेत काम करण्याचा निर्णय घेते आणि अहवाल लेखन करण्यासाठीं तीला अनेक आदिवासी पड्याना भेट द्यावी लागते आणि इथूनच तीच्या आयुष्याचा नव्याने प्रारंभ होतो, लेखिकेने प्रफुल्लाच्या माध्यमातून आदिवासी पाड्यातील स्त्री जीवन रेखाटले आहे.

आदिवासी भागात काम करत असताना आदिवासी महिलांचे राजकारण आणि त्या भागात स्वयंसेवी संस्थांचे चाललेले कामकाज याविषयीची अधिक माहिती मिळते. या प्रवसात तिला मुकणेबाई, कडूबाई, शेवली बाई, चान्नी, चांदणी अशा अनेक आदिवासी स्त्रियांचा कहाण्या कळतात. आदिवासी स्त्री संघर्ष आणि कुटुंब व्यवस्थेतील स्त्रियांचे स्थान यावरही लेखिका प्रकाश टाकतात. आदिवासी क्षेत्रात स्त्रियांना हाताशी धरून राजकारण खेळले जाते, त्यांना राखीव पदावर निवडून आणले जाते पण प्रत्येक्षात मात्र या स्त्रिया ग्रामपंचायतीची एक पायरी देखील चढत नाही आणि कोणी पुढाकार घेतला तर त्यांच्यावर अविश्वासाचे ठराव घालतात आणि सरपंचपदावरून राजीनामा द्यायला सांगतात. पुरुषांच्या हातातील कटपुतळयासारखा त्यांचा वापर करून घेतला जातो.

आदिवासी भागातील हा प्रवास तिचा आंतरिक विकासाचा टप्पा ठरतो. तिच्या स्वत्वाचा शोध तिला लागतो, हा एकूण प्रवास तिचा भयमुक्तत होण्याचा प्रवास आहे. या कादंबरीतून लेखिकेने स्त्रीवादी जाणिवांना ही उजाळा दिलेला आहे. कितीतरी आदिवासी महिलांच्या जगण्यात तीला तिचे प्रतिबिंब दिसते. यातून तिचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो स्वतत्वाचे भान तिला गवसते आणि कणखरपणा येतो.

प्रफुल्ला महाराष्ट्रातील ३७ जिल्ह्यामधील ४७ आदिवासी जमातीतील वस्त्यांना भेट देते. प्रफुल्लाच्या निवेदनातून महानगरीय जीवनही उलगडत जाते. रेवती आणि सुमित्रा या दोन्ही प्रफुल्लाच्या खास मैत्रिणी होत्या रेवतीचा मृत्यू रेल्वे अपघातात होतो तर सुमित्रा आत्महत्या करते आणि त्याचबरोबर सुमेधच दुटप्पी स्वभावाच वर्णनही लेखिका करतात. आदिवासी भागात प्रवास करताना तिची भेट डॉ. दयाळांशी होते, ते

आदिवासी भागातील लोकांसाठी आरोग्यविषयक सेवा पुरवत होते. त्यांचे प्रभावी असे व्यक्तिमत्व होते. डॉ. दयाळांबद्दल तीला आकर्षण वाटत असते आणि तिच्या मनातील मानसिक आंदोलनही लेखिका चित्रीत करतात.

प्रफुल्ला सुमेधच्या दांभिकपणामुळे 'प्रगत' या संस्थेमधली नोकरी सोडते आणि स्वतंत्रपणे काम करण्याचे ठरवते. कादंबरीत प्रफुल्लाच्या जीवनकहाणीबरोबरच अनेक स्त्रियांची कथानकेही मांडली आहे.

एखाद्या व्यवस्थेविरुद्ध किंवा प्रसंगाविरुद्ध आवाज उठवल्यानंतर अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते त्यासाठीच 'ब्र' हि कादंबरी लक्षणीय ठरते. 'ब्र' याचा अर्थ विरोध, नकार असा होतो. ज्यावेळी स्वत्वाची जाणीव होते त्या वेळेला आपले प्रस्थापित स्थान लक्षात आल्यानंतर ज्या गोष्टींचा अडथळा वाटतो त्याच्या विरुद्ध भाष्य करणे म्हणजे 'ब्र' उच्चारणे.

### ४.२.२ वातावरणनिर्मिति

कविता महाजन यांची 'ब्र' कादंबरीचे कथानक द्विस्तरिय भागात घडते. एकात तिचे वैयक्तिक जीवन आलेले आहे तर दुसऱ्यात तिने अनुभवलेले खेड्या पाड्यातील आदिवासींचे जीवन आलेले आहे. स्थलकाळानुरूप भाषेचा वापर करून लेखिकेने वातावरणनिर्मिती साधलेली आहे. महानगरीय जीवन चित्रीत करत असताना तिथल्या लोकलचा प्रवास, धकाधुकीच आयुष्य, गतिमानता चित्रीत केलेली आहे तर खेड्यापाड्यातील चित्रण करत असताना तिथले निसर्गवर्णन, फुले- पाने माती यांच्या बदलत्या रंगछटा यांचे चित्रण करून आदिवासी भागातील वातावरणाला जिवंतपणा दिलेला आहे. तसेच संमिश्र भाषेमुळे कादंबरीचे वाङमयीन वैशिष्टये दिसून येतात.

### ४.२.३ भाषाशैली

कविता महाजन यांच्या 'ब्र' कादंबरीत संमिश्र स्वरूपाची भाषा येते. 'ब्र' कादंबरीला महानगरीय तसेच ग्रामीण भागातील खेड्यापाड्यातील पार्श्वभुमी लाभलेली आहे. वेगवेगळया आदिवासी जमातींच्या बोलीभाषेचा

वापर लेखिकेने केलेला आहे त्यामूळे कादंबरी जिवंत स्वरूपाची वाटते. कविता महाजनांनी ‘ ब्र’ कादंबरीत वापरलेले संवाद वास्तवदर्शी आणि परिणामकारक ठरतात. लेखिकेने महानगराचे चित्रण करताना प्रमाणभाषेचा उपयोग केलेला आहे तर आदिवासींचे सांस्कृतीक विशेष अधोरेखित करण्यासाठीं बोली भाषेचा वापर केलेला आहे. त्यांच्या लेखनात सहजता आहे. कुठेही भाषा अकृत्रिम स्वरूपाची वाटत नाही. आदिवासी बोलीतील शब्दसंपदा, उखाणें, म्हणी, लोकगीते, या सगळयांचा कलात्मक पद्धतीने वापर करण्यात आलेला आहे.

“ आणि आता

हा अंतहीन प्रवास

निरर्थक प्रश्नाच्या नापिक जमिनीवरून

मैलोनमैल ओसाड…” ( पृ. ८)

त्यांच्या लेखनात काव्यात्मक्तही भरून राहिली आहे. उपरोक्त ओळी वाचताना एखाद्या कवितेसारख्या वाटतात, गहन चिंतनशील असा व्यापक अर्थ त्यांच्या लेखनातून अभिप्रेत होतो. त्यांच्या लेखनात एक लयबद्धता आहे. त्यांनी लेखन करत असताना तिथल्या लोकगीतांचाही लेखनातून आविष्कार घडवला आहे. आधुनिक काळातील प्रश्न लोकगीतांचा आधार घेवून लेखिका मांडताना दिसतात.

“ आम्ही डोंगराच्या आदिवासी नारी रं या सरकारा

एक जबाब विचारतो तुला रं या सरकार ‘ ( पृ. १२)

कविता महाजन यांच्या ‘ ब्र’ कादंबरीतून भाषिक वेगळेपण जाणवते. आदिवासी पाड्यातील भाषेचे सहजतेने दर्शन घडवलेले असून त्यांची संस्कृतीही, राहणीमान यांचे चित्रण केलेले आहे.

त्याचबरोबर सर्वेक्षण, चर्चासत्रातील निबंध, नोंदी प्रश्नावली, लेख, अहवाल, टिपणे, आकडेवारी यासारखे औपचारिक लेखन स्वयंसेवी संस्थेचे कामकाज दाखवण्यासाठी अशा नमुने कादंबरीत लेखिकेने समाविष्ट केलेले आहेत.

### ४.२.४ निवेदनपद्धती

'ब्र' कादंबरीत कविता महाजन प्रफुल्ला या नायिकेच्या माध्यमातून प्रथम पुरुशी निवेदन पद्धतीचा वापर करतात. प्रफुल्ला शहरी मध्यमवर्गीय जीवनाच चित्रण करताना प्रमाणभाषेचा उपयोग करते. " पाचोळ्याला विलक्षण रंग होता. जांभळ्या रंगाची सुकलेलीशी छटा तर मी फक्त पॅलेटवरच पाहिली होती, क्वचित कपड्यांवर... पण प्रत्यक्ष नैसर्गिक रंग पहिल्यांदाच. एरवी पाचोळा म्हटलं की पिवळ्या रंगच डोळ्यांपुढे उभा राहतो. वाळलेल्या पानांचे ही किती रंग किती निराळे छोटा असतात हे ध्यानातच घेतलं जात नाही." उपरोक्त उदाहरणातून त्यांचे चित्रकार असण्याचे संदर्भ निवेदनात अनेकदा चित्रीत होतात. त्यामूळे कलादृष्टिनेही निवेदन शैली संपन्न असल्याचे जाणवते.

अनेक घटना प्रसंगांची गुंफण करत असताना आदिवासितील विवीध जमातींशी संवाद साधताना लेखिकेने वापरलेले संवादात्मक कौशल्य अवर्णीय आहे. त्यांच्यातील सर्जनशील कलावंतामुळे निवेदनात प्रतिमा प्रतीकांचा वापर करण्यात आलेला आहे.

### ४.२.५ व्यक्तिचित्रण

कविता महाजन यांची 'ब्र' कादंबरीतील व्यक्तिचित्रण वास्त्वतेशी साधर्म्य साधणारी आहे. त्यांनी या कादंबरीतून व्यक्तिमत्त्वाचे वेगवेगळे पैलू मांडलेले आहे. माणसांच्या अंतरंगाचा शोध त्यांनी घेतलेला आहे. आदिवासी भागातील आणि महानगरीय भागातील माणसांचे वास्तवदर्शी जिवन रेखाटलेले आहे. त्यांनी स्वानुभवातून व्यक्तिचित्रण रेखाटलेली आहेत.

**प्रफुल्ला**

प्रफुल्ला हि 'ब्र' कादंबरीतील मुख्य व्यक्तिरेखा आहे. ती महानगरांतील मध्यमवर्गीय कुटुंबातील शहरी गृहिणीचे प्रतिनिधित्व करते. तिच्या व्यक्तिरेखेतून कविता महाजनांनी पारंपरिक विचारांना धरून चालणाऱ्या

भारतीय स्त्रीची प्रतिमा रेखाटलेली आहे. स्वतःच्या जीवनावर ओढवलेल्या प्रसंगातून तावून सुलाखून निघाल्यानंतर एका विशिष्ट घटनेने तिच्या आयुष्यात वेगळे वळण येते. या घटनेतून तिच्यातील आत्मप्रेरणा निर्माण झाली आणि प्रफुल्लाची दुसरी बाजू दिसून येते. सुरवातीला हळवी असलेली प्रफुल्ला स्व अनुभवातून खुप काही शिकते, आणि कणखर बनते. ती घटस्फोटीत असते संसारात आलेल्या विपरीत अनुभवातून तीची मानसीक कोंडी झालेली असते. ती कामामध्ये स्वतःला झोकून घेते जेणेकरून तीला विचार करायला वेळच मिळणार नाही. आहे त्या परिस्थितीपासून दूर पळण्याचा ती प्रयत्न करते.

प्रफुल्ला खुप हळवी, संवेदनशील आहे. ती दुसऱ्या स्त्रियांचे प्रश्न समजून घेते आणि त्यांची मदत करते. दुसऱ्या संस्कृतीचा तिला आदर आहे. प्रफुल्ला ही व्यक्तिरेखा समाजातील अशा स्त्रियांचे प्रतिनिधित्व करते की ज्या स्व अनुभवातुन शिकलेल्या असतात. प्रफुल्लाचा जीवनाकडे बघण्याचा सुरवातीचा संकुचित दृष्टीकोन दिसून येतो, आणि स्वानुभवातून ती कणखर बनते. प्रफुल्ला महानगरांतील मध्यमवर्गीय कुटुंबातील अशा स्त्रियांचे प्रतिनिधित्व करते की जी नवऱ्याच्या सुखासाठी स्वतःच संपूर्ण आयुष्य वाहतात, घरघुती हिंसेच्या बळी पडतात, मुलांचे संगोपन नीट व्हावे म्हणुन नोकरी सोडतात आणि प्रसंगी नवऱ्याला हातभार लावण्यासाठी नोकरीही करतात तरीही घरच्या चौकटीत तीची किंमत शून्य ठरवली जाते. तीच्या व्यक्तिरेखेतून कविता महाजनांनी पारंपरिक भारतीय स्त्रीची प्रतिमा रेखाटलेली आहे. आपल्या भारतीय समाजव्यवस्थेत नवऱ्याला परमेश्वराचे स्थान देण्यात आलेले आहे आणि नवऱ्याच्या वर्चस्वभावनेमुळे अनेक स्त्रियांची स्वप्ने मातीमोल होताना दिसतात. त्यांच्या वाट्याला चौकटबद्ध आयुष्य येते

जेव्हा प्रफुल्लाला स्वची जाणिव होते, तेव्हा ती आपल्या हक्कासाठी लढते, स्वत्रंपणाने काम करते, आणि कितीतरी स्त्रियांना प्रेरणा देते.

**सुमित्रा**

सुमित्रा ही प्रफुल्लाची मैत्रीण असते. सुमित्राच्या व्यक्तिरेखेतून महानगरीय जीवनांतील ताणतणाव, नातेसंबंधातील गुनतागुंते, मुंबईत जीवन जगत असताना झालेली मानसिक कोंडी आणि या सगळयातून येणारे

नैराश्यता याचे चित्रण लेखिका करतात. सुमित्राचा आंतरजातीय प्रेम विवाह झालेला असतो. लग्नाला विरोध असल्या कारणाने घरची मंडळी तिच्यापासून दुरावतात.

महानगरीय जीवनात तीला एकलकोंडी जाणवते, नवऱ्याकडून समजूतदारीची जी अपेक्षा असते तीही पुर्ण होत नाही. उलट नवऱ्याचा दुटप्पी वर्तन उगडकिस येते. मुलाकडे बघून ती आपल जीवन रेटत असते. तीची मानसीक अवस्था दिवसेंदिवस खुप खचतच  जाते आणि ती आत्महत्येचा पर्याय निवडते. जीवनात आलेल्या व्यक्तिकेंद्रिततेमुळे आणि जाणवणाऱ्या एकटेपणामुळे अनेक मानसीक प्रश्न निर्माण होतात. शरीराला जखम झाली तर तीचे योग्यपद्धतीने उपचार तरी करता येतात पण मानाला झालेल्या जखमेचे जर योग्यवेळी उपचार झाले नाही तर ती जखम चिघळत जाते. कविता महाजन यांनी सुमित्रा या व्यक्तिरेखेतून स्त्रियांच्या मानसीक अवस्थेचे चित्रण केले आहे.

**रेवती**

रेवती ही प्रफुल्लाची बालपणाची मैत्रीण असते,  ती स्वावलंबी असते. घर आणि काम दोन्ही सांभाळत ती तारेवरची कसरत करतच महानगरातील जीवन जगत असते. तीचा नवरा तिला समजून घेण्याइतपत संवेदनशील नसतो. सतत पैशांची भाषा करत असतो. तिच्या नवऱ्याच्या अती हव्यासापोटी त्यांच्या नातेसंबंधात ताणतणाव निर्माण होतात. रेवती ही स्वच्छंदी आयुष्य जगणारे असते. आहे त्यात समाधान मानणारी असते. पण नवऱ्याच्या अती हव्यासापोटी संसारातील सुख हरवून बसते. तिच्या नवऱ्यात तिला समजून घेण्याची कुवतच नव्हती. रेवती हे व्यक्तिमतत्व महानगरांतील मध्यमवर्गीय कमवत्या स्त्रीचे आणि शहरी गृहिणीचे प्रतिनिधित्व करते. जी आपल्या मुलांसाठी तसेच आपल्या कुटुंबाला एक चांगले जीवन देण्यासाठी धडपडत असते.

**शांता मावशी**

शांता मावशी प्रफुल्लाच्या घरी घरकामाला असते. त्या प्रफुल्लाशी एकानिष्ठ असतात. त्या प्रफुल्लाच्या सुखदुःखात तिच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहतात. प्रफुल्लाचा नवरा जेव्हा शांतामावशीला आपल्या दुसऱ्या बायकोकडे कामासाठी ये म्हणुन सांगतो तेव्हा त्याला ती नकार देते. शांता मवशी अशिक्षित असल्या तरी त्यांच्याकडे अन्याया विरूद्ध आवाज उठवण्याची ताकत आहे. त्यानी दाखवलेली हिम्मत बघून प्रफुल्लालाही जगण्याची उभारी येते. त्या प्रफुल्लाला जाणिव करुन देतात की तिच्यापेक्षा कितीतरी पटीने प्रफुल्लाकडे चांगले शिक्षण आहे, त्या जर स्वतःच्या पायावर उभ राहू शकतात तर प्रफुल्ला का नाही राहू शकत. शांता मावशी हे जरी गौण पात्र असले तरी त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रभावी आहे.

**सुमेध**

सुमेध हा प्रगत या संस्थेचा व्यवस्थापक असतो. सुमेधच्या व्यक्तिरेखेतून लेखिकेने दुटप्पी स्वभावाचे वर्णन केलेले आहे. सुमेध सुमित्राशी आंतरजातीय प्रेमविवाह करतो, पण तीला जातीवरून तोह सतत हिणवत असतो. अनेक बायकांशी त्याचे शारिरीक संबंध होते. एकाबाजूला स्त्रियांसाठी समाज कार्यकर्त्यांचे काम तो करत होता तर दुसऱ्या बाजूला बायकोशी व्यभिचार करत होता. आपली बायको मानसिक ताणातून जात आहे, तिची अवस्था दिवसेंदिवस बिघडत चालली आहे याची कल्पना असूनही तो तिच्याकडे दुर्लक्ष करतो. शेवटी ती आत्महत्या करते त्यावेळी सुध्दा आपण या झालेल्या प्रकारामुळे अडचणीत तर पडणार नाही आहोत याचीच काळजी त्याला जास्त आहे. माणसांमधील असंवेदनशील वृत्ती लेखिका इथे चित्रित करतात. सुमेधच्या व्यक्तिरेखेतून लेखिका दांभिक वृत्ती प्रवृत्तीवर भाष्य करताना दिसतात.

**साहेब**

साहेब हा प्रफुल्लाचा नवरा आहे. प्रफुल्लाच्या प्रथम पुरुषी निवेदनातून साहेब हे पात्र साकार होते. साहेब हे पात्र पुरुषी वर्चस्व भावनेचे प्रतिनिधित्व करते. स्त्रीला सतत दुय्यम लेखून तिचे मानसीक आणि शारीरिक शोषण केले जाते. साहेब स्वतःच्या मर्जीप्रमाणे तिला वागवत असतो. प्रफुल्लासोबत घटस्फोट घेवून अंजली नावाच्या

एका बाईशी तो लग्न करतो. आपले दुसरे लग्न झाले तरी तीच्यावरचा हक्क त्याला सोडवता येत नाही. ती त्याची स्वतःची खाजगी मालमत्ता असल्यासारखा तो तीचा वापर करतो. साहेब हे पात्र समाजातील पारंपरिक दृष्टीकोन आसलेल्या पुरुषी सत्तेच प्रतिनिधित्व करतात.

### डॉ. दयाळ

डॉ. दयाळ हे एक आदर्श व्यक्तिमत्त्व आहे. ते आदिवासी भागात लोकांच्या आरोग्यविषयक समस्या सोडवण्यासाठी काम करतात.  ते सतत आदिवासी लोकांच्या हितासाठी कार्यरत असतात. त्यांचा जीवनाकडे बघण्याचा व्यापक दृष्टिकोन आहे. ते सगळयांना समानतेची वागणूक देतात. डॉ. दयाळाच्या माध्यमातून लेखिकेचे आदर्शवादी पुरूष प्रतिमा रेखाटलेली आहे.

### समारोप

कविता महाजन यांच्या 'भिन्न' आणि 'ब्र' कादंबरीचे वाङमयीन मूल्यमापन प्रस्तुत प्रकरणात करण्यात आलेले आहे. या दोन्ही कादंबऱ्या वर्तमानकालीन वास्तव स्थितीचे वेध घेणाऱ्या आहेत. कविता महाजन यांनी जे दाहक अनुभव घेतले त्याचे चित्रण या कादंबरीतून केलेले आहे. स्त्रिजिवनाच्या भावनिक व वास्तविक अनुभवांची सांगड त्यांनी घातलेली आहे. त्यांचे लेखन कादंबरीच्या तंत्रात बसत नाही. त्यांनी आपल्या लेखन शैलीतून रुढ कादंबरीच्या तंत्राला छेद दिलेला आहे. त्यांनी भाषिक दृष्ट्याही प्रयोग केलेला आहे. त्यांच्या दोन्ही कादंबऱ्या स्त्री जाणिवांना केंद्रस्थानी ठेवून लिहीलेल्या आहे. त्यांचे लेखन पारंपरिक चौकट मोडते आणि जीवनाकडे बघण्याचा व्यापक दृष्टिकोन देते.

### निष्कर्ष

1. स्त्रीच्या अस्तित्वाला केंद्रस्थानी ठेवून कविता महाजनांनी ह्या कादंबरीचे चित्रण केलेले आहे.

2. कविता महाजन यांच्या दोन्हीं कादंबऱ्या समाजातील वास्तविकतेचा वेध घेतात.
3. कविता महाजनांच्या दोन्ही कादंबऱ्यांमधून निवेदन शैलीच्या अंगाने त्यांच्या चित्र कौशल्याचे दर्शन घडते.
4. त्यांच्या कादंबऱ्या कादंबरीच्या रुढ संकेतांचें उल्लंघन करतात. कादंबरीच्या पारंपरिक साच्यात त्यांची कादंबरी बसत नाही.
5. त्यांनी दोन्हीं कादंबऱ्यात भाषिक दृष्टया नविन प्रयोग केलेला आहे.
6. कविता महाजनांनी निर्भिडपणे लेखन केलेले आहे.
7. कविता महाजन यांनी कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय इत्यादि विषयांना स्पर्श केलेला आहे.
8. कविता महाजनांनी या दोन्ही कादंबऱ्यातून स्त्रीची एक वेगळी प्रतिमा रेखाटलेली आहे. हि स्त्री आधुनिक आहे, परंपरेची बंधने झुगारून ती स्वतः साठी जगते.
9. कविता महाजन या लेखन विषयक क्रांतीशी तसेच समाजात होणाऱ्या बदलांशी सहज नाते जोडणाऱ्या लेखिका आहेत. त्यांनी बदल स्वीकारून आणि नव्या मूल्यांचा स्वीकार करून लेखन केलेले आहे. त्यांचा जीवनाकडे बघण्याचा व्यापक दृष्टिकोन आहे. त्या ठरावीक साच्यातून जीवनाकडे बघत नाहीत.
10. कविता महाजन यांच्या लेखनातून मानवी जीवनाचा, मानवी मूल्य विचारांचा सखोलपणे वेध घेतला आहे.

**संदर्भ सूची**


1. तायडे सदानंद पुरूषोत्तम “ भिन्न: एक आकलन” अक्षर वाङमयप्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती २ ऑक्टोबर २०१८.
2. ढेरे, अरुणा. “ स्त्री – लिखित मराठी कादंबरी ( १९५० ते २०१०).” पद्मगंधा प्रकाशन,पुणे, ८ मार्च २०१३.

# प्रकरण ५

# समरोप आणि निष्कर्ष

# समारोप आणि निष्कर्ष

## ५.१ समारोप

मराठी साहित्यात १९९० नंतरचा काळ साहित्यक्षेत्रात अधिक प्रवाही आणि आश्वासक आहे. १९९० नंतर झालेल्या जागतिकीकरणाचे पडसाद मराठी साहित्यावरही उमटलेले दिसतात. नव्वदनंतर महानगरीयकरणाच्या प्रक्रियेला सुरवात झालेली दिसते. १९७५ नंतर स्त्रीवादी साहित्याचा प्रसार व्यापक पद्धतीने झालेला असून १९९० नंतरच्या साहित्यात स्त्रीवादी जाणिवा प्रगल्भ रीतीने मांडण्यात आल्या आणि याच प्रवाहाच्या एक महत्त्वाच्या लेखिका कविता महाजन आहेत. त्यांच्या 'भिन्न' आणि 'ब्र' कादंबरी लेखनातून प्रामुख्याने स्त्रीवादी आणि महानगरीय जाणिवा प्रगट होतात. या प्रबंधिका लेखनासाठी "काविता महाजन यांच्या ' भिन्न' व 'ब्र' कादंबऱ्यांचा अभ्यास" हा विषय निवडला. या विषयाचा अभ्यास एकुण चार प्रकरणात करण्यात आलेला आहे. पहिल्या प्रकरणात कादंबरी साहित्यप्रकाराची संकल्पना आणि स्वरुप स्पष्ट केलेले आहे तर दुसऱ्या आणि तिसऱ्या प्रकरणात कविता महाजन यांच्या ' भिन्न' आणि 'ब्र' कादंबरीचा महानगरीय आणि स्त्रीवाद या संकल्पनेच्या आधारे मांडणी करण्यात आलेली आहे. तर चौथ्या प्रकरणात दोन्हीं कादंबऱ्यांचे वाङमयीन मुल्यमापन केलेले आहे.

" कादंबरी : संकल्पना व स्वरुप" या पाहिल्या प्रकरणात कादंबरी या साहित्य प्रकाराच्या स्वरूप आणि संकल्पने विषयी चर्चा केलेली आहे. कादंबरी हा आधुनिक वाङमयप्रकार आंग्लसंपर्कातून जरी मराठी साहित्यात आला असला तरी मराठी साहित्यात गद्य लेखनाची परंपरा सुरवातीपासून होती. मुद्रण कला विकसित झाल्यामुळें सुरवातीच्या बहुतांश कादंबऱ्या भाषांतरित स्वरूपाच्या होत्या. कादंबरी हा साहित्यप्रकार जीवनाचा विशाल पट आपल्या कवेत घेतो. कथानक, वातावरणनिर्मिती, भाषाशैली, व्यक्तिचित्रण, निवेदन, अशा विविध घटकांनी कादंबरी हा साहित्यप्रकार गुंफलेला आहे. कादंबरीत आशयाची विविधता असते. मुख्य कथानकाबरोबरीने विविध उपकथानकाची जोड ही कादंबरीला आशयीक दृष्ट्या समृद्ध करते. कादंबरी हा साहित्यप्रकार व्याख्येत बंदिस्त करणे अवघड आहे तरी वेगवेगळया अभ्यासकांनी कादंबरीला व्याख्येत बंदिस्त करण्याचा प्रयत्न केलेला असला

तरी कादंबरी संदर्भात मांडण्यात आलेल्या व्याख्या परिपूर्ण नाही. कादंबरीतून विविधांगी अंगाचे दर्शन घडते, तिच्या विविधतेमुळे तीची एकच एक व्याख्या होवू शकत नाही.

कादंबरी हा प्रवाही साहित्यप्रकार असून काळाबरोबर तो बदलत गेलेला दिसतो आणि त्यानुसार कादंबरी लेखन तंत्रातहि बदल झालेले दिसतात मग ते आशयिक दृष्ट्या असो किंवा भाषिक दृष्ट्या असो. कालखंडानुरूप समाजात होणाऱ्या बदलांचे पडसाद कादंबरीत उमटलेले दिसतात. कादंबरी हा साहित्यप्रकार जरी कल्पित स्वरूपाचा असला तरी जीवनासंदर्भातील व्यापक अनुभवांचे कथन कादंबरीत केले जाते. कल्पना आणि वास्तवता यांचे कलात्मक संगम कादंबरीत दिसते. मराठी कादंबरीत काळानुरूप वेगवेगळया साहित्य प्रकारांचा आणि प्रवाहांचा सामावेश झालेला दिसतो. मराठी कादंबरीने मराठी साहित्यव्यवहारात आणि मराठी भाषेत महत्वाचे योगदान दिले आहे.

" कविता महाजन यांच्या 'भिन्न' व 'ब्र' कादंबरीतून दिसून येणाऱ्या महानगरीय जाणिवा" या प्रबंधिकेच्या दुसऱ्या प्रकरणात महानगरीय संकल्पना, महानगरीयकरणाची प्रक्रिया आणि महानगरीय वास्तव मांडून कविता महाजन यांच्या दोन्ही कादंबऱ्यातील महानगरीय जाणिवांचा वेध घेण्यात आलेला आहे. १९९० नंतर जागतिकीकरणामुळे महानगरीयकरणाच्या प्रक्रियेला गती मिळाली आणि शहरे उधोग तंत्रज्ञानाचे केंद्र बनले. महानगरात अमाप लोकसंख्या वाढली आणि त्याचे बरे वाईट परिणाम लोकांच्या जीवनावर झाले. महानगरीय जीवन जगत असताना सामान्य माणसे भरडली जावू लागली, महानगरीय जीवन हे गतिमान असते त्याचे बरे वाईट परीणाम सामान्य लोकांवर होत असतात. महानगरीय जीवन जाणिवांचा वेध या प्रकरणातून घेण्यात आलेला आहे.

" कविता महाजन यांच्या ' भिन्न' व ' ब्र ' कादंबरीतून दिसून येणाऱ्या स्त्रीवादी जाणिवा" या प्रबंधिकेचा तिसऱ्या प्रकरणात स्त्रीवादी संकल्पना मांडून दोन्हीं कादंबऱ्यात दिसून येणाऱ्या स्त्रीवादी जाणिवांना केंद्रस्थानी ठेवून लेखन केलेले आहे. भारतीय समाजव्यवस्थेत स्त्रियांना सतत दुय्यम स्थान दिले गेले आहे, परंपरेच्या नावाखाली बंदिस्त आयुष्य तीच्या वाट्याला आलेले आहे. स्त्रीयांना स्वत्वाची जाणिव होणे, स्वतःच्या हक्कासाठी लढणे. स्त्रीवादी विचारसरणी स्त्री – पुरूष समानतेच्या विचारला पाठिंबा देते. कविता महाजन यांच्या दोन्ही कादंबऱ्या स्त्री केंद्री आहे. स्त्री जाणीवना केंद्रस्थानी ठेवून त्यांनी लेखन केलेला आहे. त्यांच्या लेखनातून आधुनिक स्त्रीचे दर्शन

घडते. त्यांच्या कादंबरीतून महानगरांतील तशीच आदिवासीं पाड्यातील स्त्री दिसून येते. त्यांच्या कादंबरीतून स्त्रीवादी वीचारप्रणाली दिसून येते.  प्रस्तुत प्रकरणात स्त्रीवादी संकल्पनेचा आणि स्त्रीवादी जाणिवांचा वेध घेतला आहे.

" कविता महाजन यांच्या 'भिन्न' व 'ब्र' कादंबऱ्यांचे वाङममीन मुल्यमापन" या चौथ्या प्रकरणात दोन्हीं कादंबऱ्याचें वाङमयीन मुल्यमापन केलेले आहे. कादंबरीच्या घटकानुसर या प्रकरणात चर्चा करण्यात आलेली आहे.

या विषयाचा अभ्यास करण्यासाठी ऐतिहासीक संशोधन पद्धत, आणि वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. हे संशोधन करत असताना काही गृहितके मांडण्यात आली होती. त्या आधारे या विषयाचा उहापोह केलेला आहे. कविता महाजन यांच्या लेखनात आधुनिक जीवन जाणिवांचे पडसाद उमटलले दिसतात, त्याचबरोबरच त्यांच्या लेखनात स्त्रीवादी जाणिवा आणि महानगरीय जाणिवा दिसून येतात.

## ५.२ निष्कर्ष

1. कादंबरी हा आधुनिक साहित्यप्रकार मानवी जीवनाचे व्यापक अंगाने दर्शन घडवते.
2. कादंबरी या वाङमयप्रकारचे स्वरूप विविधांगी आहे. त्यामूळे या सहित्यप्रकाराची एकच एक परिपूर्ण अशी व्याख्या होवू शकत नाही.
3. कादंबरी हा साहित्यप्रकार काळानुरूप बदलत गेलेला दिसुन येतो. त्या त्या कालखंडातील बदलांचे पडसाद कादंबरीवर पडलेले दिसुन येतात.
4. कादंबरी या सहित्यप्रकाराचे निश्चित एक स्वरूप सांगता येत नाही, कादंबरीचे स्वरूप परिवर्तनीय आहे.
5. कादंबरी हा साहित्यप्रकार कल्पना आणि वास्तवता यांचे कलात्मक संगम घडवतो.
6. कादंबरीत या साहित्यप्रकारात बदलत्या काळानुसार अनेक प्रवाहांचा समावेश झालेला दिसतो.
7. कादंबरी मानवी जीवनाच्या विविध अंगाचे सखोल पद्धतीने दर्शन घडवते.

8. जागतिकीकरणानंतर महानगर हे उद्योग तंत्रज्ञानाचे मुख्य केंद्र बनले आणि महानगरीयकरणाच्या प्रक्रियेला सुरुवात झालेली दिसून येते.
9. जागतिकीकरणानंतर समाजात जे बदल घडले त्याचे पडसाद साहित्यातही जाणवू लागले.
10. महानगरात विविध स्तरातील लोक राहतात त्यामूळे महानगरांत बहुभाषिक संस्कृती दिसून येते.
11. महानगरात उपजीविकेचा प्रश्न सुटावा म्हणून अनेक प्रदेशातील, गावातील लोक शहरांकडे स्थलांतरीत होतात. महानगरातील अमाप गर्दी अनेक समस्यांना कारणीभूत ठरते.
12. गर्दीतला एकटेपण, स्पर्धात्मकता, चाढाओढ, मानवी वाहतूक, दहशत, व्यक्तिकेंद्रितता, असुरक्षितता, व्यामिश्रता, मूल्यभ्रष्टता, भयग्रस्तता या समस्या महानगरीय जीवनात जाणवतात.
13. महानगरीय जिवनात माणसाचे वस्तूकिकरण झालेले आहे.
14. महानगरातील जीवनशैलीवर नव पाच्यात्या संस्कृतीचा प्रभाव जाणवतो.
15. महानगरात जरी औद्योगिक विकास होत असला तरी महानगरात मूलभूत नैतिक मूल्यांचा आणि सांस्कृतीक मूल्यांचा ऱ्हास होत आहे.
16. महानगरात भोगवादी आणि चंगळवादी वृत्तीचे दर्शन घडते.
17. कविता महाजन यांनी ‘ भिन्न ‘ कादंबरीतून महानगरांतील एडसग्रस्तांचे भीषण वास्तव रेखाटले आहे.
18. ‘ भिन्न’ कादंबरीतून महानगरांतील लैंगिक विकृतीचे दाहक वास्तव लेखिका मांडतात.
19. स्त्रीवाद ही संकल्पना पुरुषांना दोष देत नसून पुरूष सत्ताक व्यवस्थेला ती दोष देते.
20. पुरूष सत्ताक व्यवस्थेत स्त्रीयांना सतत दुय्यम स्थान दिले गेले.
21. कविता महाजन यांच्या दोन्ही कादंबऱ्यातून परंपरागत चालत आलेल्या स्त्री प्रतिमेला विरोध केला आहे.
22. या दोन्हीं कादंबरीतून पारंपरिकता विरूद्ध आधुनिकता असा संघर्ष दिसून येतो.
23. त्यांच्या दोन्हीं कादंबऱ्या स्त्रियांकडे बघण्याची नवी दृष्टी प्रदान करतात.
24. कविता महाजन यांच्या दोन्ही कादंबऱ्या स्त्री – पुरूष समानतेचा पुरस्कार करतात.
25. कविता महाजन यांच्या ‘भिन्न’ व ‘ ब्र’ कादंबरीत आशयसुत्राची विविधता आहे.
26. कविता महाजन यांच्या ‘ ब्र’ कादंबरीतून स्त्री – पुरुष यांच्या नात्यातील राजकारण दिसते.

27. कविता महाजन यांच्या दोन्ही कादंबऱ्यातून नागर व अनागर संस्कृतीचे चित्रण अलेले आहे.
28. कविता महाजन यांनी अशयसुत्राची निवड वास्तवतेच्या जाणिवेतून केल्यामुळे आशयसूत्राला संपन्नता प्राप्त होते.
29. कविता महाजन यांच्या कादंबरीतून महानगरीय अनुभव आणि जीवनजाणिवा प्रकट होतात त्याचबरोबर ती मानवी जीवनावरही भाष्य करते.
30. कविता महाजन यांच्या लेखनातून व्यक्त झालेले जग हे मध्मवर्गिय वाचकांना धक्का देणारे आहे.
31. कविता महाजन यांच्या दोन्ही कादंबरीतून नव्या पिढीचा जीवनविषयक बदलेला दृष्टिकोन आणि जनरेशन गॅपमुळे, वैचारीक भेदामुळे कुटूंब व्यवस्थेचा ढासळलेले पाया दिसून येतो.
32. कविता महाजन यांच्या कादंबरीतून महानगरातील विविध स्तराचे, समूहाचे, बहुभाषिक संस्कृतीचे चित्रण घडते.
33. कविता महाजन यांच्या दोन्ही कादंबरीतून आविष्कार तंत्राच्या आणि भाषिक शैलीच्या दृष्टीने वेगळेपणा दिसून येतो.
34. कविता महाजन या दोन्ही कादंबरीतून भाषा आणि बोली या बाबतचे जाणीवपूर्वक प्रयोग आपल्या लेखनातून करतात.
35. कविता महाजन यांच्या कादंबरीची भाषा परंपरेत न बसणारी आहे.

**संदर्भ सूची**


1. संपा. खोले, विलास. "गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी." लोकवाङ्मयगृह प्रकाशन, २००२.
2. विभुते, शंकर. "आधुनिक मराठी कादंबरीतील सामाजिकता." सूर्यमुद्रा प्रकाशन, नांदेड, २०१५.
3. पठारे, रंगनाथ. "आजची कादंबरी : नोंदी आणि निरीक्षणे" शब्दलाय प्रकाशन, २०१४.
4. भिरूड, प्रमिला. " मराठी कादंबरी : स्त्रीयांचे योगदान." स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००३.
5. संपा. ढेरे,अरुणा. "स्त्री – लिखित मराठी कादंबरी (१९५० ते २०१०)." पद्मगंधा प्रकाशन, २०१३.
6. धोंगडे, अश्विनी. "स्त्रीवादी समीक्षा – स्वरूप आणि उपयोजन" दिलीपराज प्रकाशन, १९९३.
7. देशमुख, अरुणा. " स्त्रीवाद : साहित्य आणि संस्कृती" आकंशा प्रकाशन, २०१०.
8. संपा. पाटील, राहुल. " संशोधनमुद्रा." स्नेहवर्धन प्रकाशन, २०१६.
9. मेश्राम,सत्यवान. "नव्वदोत्तर मराठी साहित्य." २०१८.
10. संपा. पाटील, आशुतोष. " स्त्री -लिखित साहित्य संदर्भ आणि चिकित्सा"
11. संपा. गायकवाड शरद, शिंदे सुनील. "जागतिकीकरण आणि मराठी साहित्य" सनेहवर्धन प्रकाशन पुणे, २००९.
12. लांडे सुमती ' स्त्रीवाद ' शब्दालय प्रकाशन, २००७.
13. ठाकूर रवींद्र ' मराठी कादंबरी: समाजशास्त्रीय समिक्षा' दिलीपराज प्रकाशन, २००७.
14. संपा. गोरे दादा "एकविसव्या शतकातील स्त्रीयांचे योगदान " ' अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अक्षरयात्रा २०२०-२१'.
15. इनामदार. दे. श्री., भागवत विद्युत 'स्त्रीवादी मराठी साहित्य'
16. महाजन वंदना, 'मराठी कादंबरीतील स्त्रीवाद', स्नेहवर्धन प्रकाशन, २०१०.
17. १९९० नंतरच्या मराठी लेखिकेच्या कादंबरीतील स्त्रीवाद – नीता तोरणे ( phd )
18. तायडे पुरुषोत्तम सदानंद ' भिन्न : एक आकलन ' अक्षरवाङ्मय प्रकाशन, २०१८.
19. कांबळे रुपाली 'नव्वदोत्तरी स्त्रीवादी कादंबरी' २०१९.

आधार ग्रंथ


1. महाजन, कविता. “भिन्न.” राजहंस प्रकाशन प्रा. लि., जुलै २००७.
2. महाजन, कविता. “ब्र.” राजहंस प्रकाशन प्रा. लि., मे २००५.